वा-क्र. ९२८८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

19 OCT 1974
21 NOV 1974
11 DEC 1974
JAN 1975
11 FEB 1975
29 FEB 1975
3 MAY 1975
26 AUG 1975
7 MAR 1976
11 MAY 1977
2 AUG 1978
9 NOV 1978

[क्र. मा. प

RaK-0112898
IRBK-0112898

12 AUG 197

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ६९०६८ दि. 
क्रमांक ३४२ नोंद दि.

IRBK-0112898

# तिरसिंगराव

कुमार मासिकातून क्रमशः प्रसिद्ध झालेल्या कथांचा संग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ... वि ...
क्रमांक ... नोंद दि ...

आनन्द घाटुगडे

म. ग्रं. सं. ठाणे,
क्र. ...
दि. ...

सहकार प्रकाशन, पुणे २

........ दि..........
........नोंद दि..........

पैलवान तिरसिंगरावांच्या कथा कुमार मासिकातून क्रमशः प्रसिद्ध झाल्या. त्याच आज संग्रहरूपाने प्रसिद्ध होत आहेत. तिरसिंगरावांच्या अचाट पराक्रमामुळे, अतुल धाडसामुळे व त्याच्या अंगच्या अजोड सामर्थ्यामुळे ते बालजगतात अत्यंत लोकप्रिय झाले. बालगोपालांना तिरसिंगरावांचे दर्शन कुमारच्या अंकात झाले नाही तर ते अस्वस्थ होत. पत्रद्वारे तिरसिंगरावांची चौकशी करीत.

तिरसिंगरावांच्या या अपूर्व लोकप्रियतेचे रहस्य काय? अर्थात त्यांचे आकर्षक व वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व. केवळ हिंदकेसरीचा किताब मिळविणारा हा नुसता ताकदवान, पोलादी, पहाडी पुरुष नाही. सारेच पैलवान आपल्या ताकदीची चुणूक दाखवितात, पैलवानांना पराभूत करून कुस्तीचे फड जिंकतात, पण तिरसिंगरावाचे व्यक्तिमत्त्व याहून काही आगळे आहे. त्यामुळेच तिरसिंगरावांबद्दल आदर, प्रेम व आपलेपणा वाटतो. कोणावरही संकट येवो, त्याच्यामागे ते पहाडासारखे उभे राहतात. असत्याची, अन्यायाची, अनीतीची त्यांना अत्यंत चीड आहे. अशा गोष्टी त्यांना सहन होत नाहीतच, पण त्याचा नुसता भासही त्यांचे रक्त तापविण्यास कारणीभूत होतो. त्यामुळे अशा गोष्टींचा प्रतिकार ते अत्यंत तीव्रपणे करताना आढळतात. पण ‘वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि’ असा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा दुसरा पैलू आहे. त्यांचे अंतःकरण अत्यंत कोमल, निरागस आणि भाबडे आहे. फणसाप्रमाणे ओबडधोबड दिसणाऱ्या या माणसाच्या अंतःकरणात जणू मधाचे पोळे आहे. त्यांच्या उग्रपणालाही कोमलतेची आणि सहृदयतेची एक सोनेरी कडा आहे. त्यांची भाषा रांगडी आणि वागणे धसमुसळेपणाचे असले तरी मनाने हा सामर्थ्यवान पुरुष सुसंस्कृत, सदाचारी, प्रेमळ आणि विनम्र आहे. पैलवान आणि बुद्धिमत्ता हे व्यवहारात न दिसणारे समीकरण, पण तिरसिंगरावांची बुद्धिमता कुशाग्र आहे. त्यांच्या हुशारीचा आणि चलाखीचा प्रत्यय कथांमध्ये पदोपदी येतो.

पोलादी सामर्थ्य आणि लोभस व्यक्तिमत्त्व असलेला असा हा माणूस कुणाला आवडणार नाही? मुलांना तर खासच आवडेल. कारण मुलांना ज्या वृत्तीचे, गुणाचे विशेष आकर्षण असते, त्याचे प्रत्यंतर त्यांना तिरसिंगरावांमध्ये दिसते. त्यामुळे तिरसिंगराव मुलांना हवेहवेसे वाटले तर त्यात नवल कोठले?

सहकार प्रकाशन

* * *

प्रकाशक :
अ. रं. शिरवाडकर
सहकार प्रकाशन
७२७ बुधवार, पुणे २
चित्रकार :
प्रताप मुळीक

© आनन्द घाटुगडे

प्रथमावृत्ति :
भाद्रपद शुद्ध १० शके १८९१
दिनांक २० आक्टोबर १९६९

मुद्रक :
मो. स. लाटकर
श्रीसरस्वती मुद्रणालय
भोसरी, इंडस्ट्रीयल इस्टेट
पुणे २६

मूल्य : रुपये ३ : ५०

# अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| * तिरसिंगरावांचा हिसका | १ |
| * पोलिस हवालदार तिरसिंगराव | १२ |
| * सिनेमात तिरसिंगराव | २१ |
| * तिरसिंगरावांचा सुसरसंग्राम | २८ |
| * तिरसिंगराव आणि द्रौपदीवस्त्रहरण | ३७ |
| * तिरसिंगराव आणि कानाचे स्पेशॅलिस्ट | ४५ |
| * तिरसिंगराव हाँगकाँगमध्ये— | ५९ |
| * वीर हनुमान तिरसिंगराव | ६९ |
| * तिरसिंगराव नि एका अस्वलाचा शोध | ७८ |
| * समुद्रगर्भात तिरसिंगराव | ८८ |
| * तिरसिंगराव आफ्रिकेत | ९८ |
| * तिरसिंगराव आणि शिवजयंत्युत्सव | १०७ |
| * तिरसिंगरावांची गाडी | ११६ |
| * तिरसिंगरावांची काश्मीर सफर | १२४ |
| * तिरसिंगराव व पावसाळा | १३४ |

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम .................. वि ..................
.........................नोंद दि..................

# तिरसिंगरावांचा हिसका

मध्यरात्रीचा सुमार.

कोल्हापूरजवळच्या पार्कात आडबाजूला, एका गर्द झुडपाच्या आडोशाला बसून चार चोर सल्लामसलत करीत होते. त्यातल्या एकाजवळ गावठी बंदूक होती, दुसऱ्याजवळ भाला, तिसऱ्याजवळ नुसताच एक लांबलचक दोर आणि चौथ्या चोराच्या हातातल्या फरशी कुऱ्हाडीवरची पसरट धार तेवढ्या बुडुक अंधारातदेखील, उजेडाच्या पात्याप्रमाणे लक्कन हलत होती.

बहुधा कोल्हापुरातल्या कुठल्या तरी बड्या असामीच्या घरावर आज रात्री डल्ला मारायचा त्यांचा बेत शिजत असावा.



तेवढयात लांबवर अंधारातून एक ऐसपैस आकृती काळ्या सावलीप्रमाणे डुलत डुलत सामोरी येताना दिसू लागली. तिच्या पायांतल्या वहाणांचा चुरचुर असा आवाज त्या शांत वातावरणात मोठा मोठा होत, जवळ जवळ येऊ लागला.

एखाद्या मस्त हत्तीप्रमाणे भुई हादरवीत चालणारी ती आकृती, अशी हात दोन हातांच्या अंतरावर येऊन ठेपली आणि दबा धरून बसलेल्या चारी चोरांनी एकाएकी झुडपा-बाहेर येऊन त्या आकृतीला गराडा घातला.

पहिल्या चोराने पुढे होऊन त्या आकृतीच्या छाताडावर बंदुकीची नळी टेकवली. दुसऱ्याने त्याच्या कानशिलावर भाला ठेवला. तिसऱ्याने हातात कुऱ्हाड आडवी सज्ज धरली आणि चौथ्या चोराने मोठ्या शिताफीने त्याच्याभोवती दोराचा फास टाकला.

परंतु त्या बुलंद व्यक्तीवर त्याचा काडीमात्र परिणाम झाला नाही.

" का रं ? काय पायजे तुमास्नी ? "

एखादा ढग गडगडावा त्याप्रमाणे त्याने गुर्मीत विचारले.

क्षणभर त्या बेडर आवाजाने चारी चोर लटपटले. परंतु फरशी कुऱ्हाडवाल्याने लागलीच स्वतःला सावरले आणि पुढे होऊन जरा टाफरूनच म्हटले,

" ये, लै आवाज करू नगस. काय खिशात आसल नसल ते समोर टाक. आन् गप् गुमान फुडचा रस्ता धर. "

" हात तिच्या...माज्या खिशात काय आसल नसल ते पायजे हाय नव्हं तुमास्नी ? मग ही घ्या माजी पानाची चंची, ही चुन्याची डबी आनि हयो तंबाकू. "

" ये, उगंच गमजा करू नगस. समदं खिसंपासं तपासा रं त्येचं आगुदर. "

मग रोखलेली बंदूक सलामीत धरून बंदुकवाला चोर पुढं झाला आणि त्यानं बिचकत बाचकत त्याच्या सर्वांगाची झडती घ्यायला सुरुवात केली.

तेवढ्यात–

" ऑं...ऑं...

" ऑक्...ऑक्...ऑक् छीं ! ऑक् छीं ! "

मध्येच त्या व्यक्तीने सटा सटा एवढया जोरात शिंका दिल्या की ते बापडं बंदूक-वालं भेमकावलं आणि शिंकेसरशी तीन ताड लांब उडून भीतीनं थरथर कापत उभं राहिलं.

" का रं ? भिती दाखिवतोस व्हय आमास्नी ? "–फरशी कुऱ्हाडवाल्याने मग्रुरीत विचारले.

अनुक्रम ...
क्रमांक ...३४८२... नोंद दि. ...३।११।६८...

" आता यात भिती दाखवायचा काय प्रश्न आला? पन तुमचा त्यो माझी तपासणी घेणारा कवापास्नं माज्या छातीपाशी मान वाकवून हुबा राहिलाय. आनि त्येचं डुकराच्या केसागत हुब असल्यालं ह्ये वीतवीतभर केस कवापास्नं माज्या नाकपुड्यांत शिरून गुळगुळ करायला लागल्यात. मग मी तरी काय करू ? आली शिंक. तवा सटा सटा शिंकलो ! "

" बरं, बरं...म्हाईत हाय लै शाना हाईस त्ये ! "

आता भालेवाला चोर पुढे झाला आणि त्यानं त्या व्यक्तीची पुन्हा एकदा कसून झडती घेतली. परंतु खरेच त्याच्याजवळ पानतंबाखूच्या सरंजामाशिवाय, दुसरे काहीएक हाताला लागले नाही.

चारी चोर बापडे विंचू चावलेल्या माकडाप्रमाणे केविलवाणे नि हताश दिसू लागले.

" का गा ? आज दिवसभरात काय घबाड गावलं न्हाई वाटतं ? "

" आरं जा... तुज्यासारख्या सटरफटर घबाडाला कोण इचारतंय ? आज रातचं आमी लै मोठा डल्ला मारणार हाय. "—चोरांनी जरा चिरडीला येऊनच उत्तर दिले.

" कुठं डल्ला मारणार हाईसा ? "

" तुला काय करायच्या नस्त्या चांभारचौकशा ? "

" आता चांभारचौकशी का म्हन्तासा ? काय माज्या आवाक्यातली गोष्ट असली तर मी बी मदत करीन की तुमास्नी ! "

" मदत करीन म्हणतोस ? "

" व्हय. पण काय घबाड गावल त्यात मला पन वाटा मिळाला पायजे. "

चोरांनी थोडा वेळ विचार केला.

" ठीक हाय. देऊ तुलाबी वाटा. पर काम अगदी फत्ते झालं पायजे ? "

" वा राव. काम म्हंजे अगदी नंबरी वन हुनार...पर पयल्यांदा मला सांगा, आज कुनाच्या घरावर डल्ला मारायचा बेत हाय ? "

" आज रातचं आमी तिरसिंगरावाच्या घरावर डल्ला मारणार हाय. "

" त्–तिरसिंगराव ? क्–कोण प्–पैलवान तिरसिंगराव ? "—पाहुणा एकदम चमकून उद्गारला.

" व्हय. त्यो पैलवान तिरसिंगराव. "

" त्येच्या घरावर आनि कशापायी दरोडा घालायचा ? "

" आवो पावणे, ह्या तिरसिंगरावानं ' हिंदकेसरी ' म्हणून मानाचा किताब मिळ-लाय. कोलाप्रात, मुंबईला आन् तिकडं रशिया-अमेरिकेत दिकून कुस्त्या मारून फड गाजवल्यात. . . . "

" मस्त सोन्या-चांदीची पदकं मिळाल्यात म्हनं त्येला. झालंच तर रुप्याचं पेलं मिळाल्यात. "

" सोन्याची एक गदा आन् चार-पाच चांदीच्या ढाली दिकून हाईत म्हनं त्येच्याकडं. "

" त्या समद्या पाक लुटून आनायच्या हाईत अमास्नी. "

" आता काय सोन्याला भरमसाट भाव हाय म्हनं बाजारात ! "

" त्ये समदं खरं. " पाहुणा मध्येच बोलला " पन तिरसिंगराव पैलवान कसला रेड्यासारखा ताकतीत माजल्याला हाय. हे ठाऊक हाय न्हवं तुमासनी ? "

" हाय की ठाऊक. म्हणून तर एकाला चारजण गोळा झालोय त्येच्या बंगल्यावर डाका घालायला ! "

" दरोड्याची अगदी पद्धतशीर योजना आखलिया आमी. पयला झूटला भाल्या-कुऱ्हाडीच्या मारानं ह्ये दोघंजन त्येच्या बंगल्याचं दार मोडणार. मागनं ह्यो बंदूकवाला आमचा साथीदार एकदम त्येच्या घरात घुसून बंदुकीच्या दस्त्याचा तडाखा जाम तिरसिंग-रावाच्या टक्कुऱ्यातच ठेवून देणार ... त्या मारानं झीट येऊन पैलवान गपगार पडला.... की लगीच मी ह्या दोरानं त्येच्या मुस्क्या आवळणार. तेवढ्या वेळात हये बाकीचं तिघंजन त्येच्या घरात, असल नसल त्ये सगळं, सोन्याची पदकं, चांदीच्या ढाली, सोन्याची गदा, रुप्याचं पेलं समदं पाक धुनार, आन् गाढवावर लादून पळवून आणणार ! "

" आँ ? पण गाढव कुठाय ? "

" त्ये काय तिथं झाडाला बांधलंय ! "

चोरांनी हात केला, त्या दिशेला खरंच एक गाढव एका झाडाच्या बुंध्याशी शेपूट हलवीत उभे होते. वाढत्या अंधारात त्याच्या पाठीवर कसलीतरी पांढरी वस्तू चमकताना दिसत होती.

" त्येच्या पाठीवर काय ठेवलंय ? "

" कुणाच्या ? "

" त्या गाढवाच्या ? "

" त्ये दोन रॉकेलचं मोकळं डबं हाईत. "

" रॉकेलचं डबं कशाला ? "

" आवो, एवडा हिंदकेसरी समद्या दुनियेतला प्रसिद्द पैलवान. . . . मग त्येच्या घरात काय बदाम, खारीक, खोबरं, पिस्ता, आक्रोड, मुगाचं लाडू असला काय बाय समदा खुराक असणार. मसाल्याच्या आटीव दुधानं तर हौद भरून ठेवल्यालं असतील. त्येवी गावलं तर ह्या मोकळ्या डब्यातनं भरून पळवून आनायचं हाय ! "

" शाब्बास. बेत तर अगदी नामी योजलाय. " त्या गाढवाचरची आणि त्याच्या पाठीवरल्या त्या दोन मोकळ्या रॉकेलच्या डब्यावरची एकटक नजर बाजूला काढून घेत पाहुणा पुन्हा विचारता झाला,

" पन तुमी तिरासिंगरावाच्या कोनच्या घरावर डल्ला मारणार हाईसा ? "

" कोनच्या म्हंजे....? राजारामपुरीतल्या त्याच्या नव्या बंगल्यावर. "

" हॅत् राव. राजारामपुरीतल्या त्याच्या नव्या बंगल्यावर जाऊन काय मिळणार हाय ? फुटाणं ? त्येचं समदं गटलं पुरून ठेवलंय त्ये ह्या अंगाला...." असे म्हणून त्या पाहुण्याने अगदी गावाच्या उलट बाजूला जिकडे ,नुस्ते घनदाट जंगलच पसरले होते त्या दिशेला हात फिरवला.

" ऑं ? पर ह्या बाजूला तर म्हाराजांचा नुसता शिकारखानाच तेवढा हाय ! "

" त्येच. महाराजांच्या शिकारखान्याजवळ ती कोठी हाय न्हवं ? तीच तिरासिंग-रावानं भाड्यानं घेतलीया, आन् तिच्यात समदं पाक आपलं सोनंनाणं लपवून ठेवलंय. "

" आर त्येच्या मारी. अशी भानगड हाय म्हनता ? पर तुमाला कसं काय कळलं हे सोनंनाणं लपवल्याचं ? "

" त्येच तर सांगतोय...गेल्या वर्सापत्तर ह्यो तिरसिंगराव माजा लै जानी दोस्त हुता. तवाच त्यानं मला आपल्या धनाच्या गटळ्याचं सगळं प्रायवेट शिक्रेट सांगून ठेवलंय. यंदा-च्या वर्षीच त्येच्यामाज्यात जरा वाकडंपना आलाय ! "

" तुमी तर लैच जोरदार बातमी आक्शी टायमावर पुरवलिसा बगा. मग आता वकुत कशाला लावतासा ? म्हसोबाचं नाव घेऊन लगीच फुडच्या उद्योगाला लागायचं. "

" फुडच्या उद्योगाला लागायचं, खरं....पण जरा सबुरीनं " पाहुणा पुढं बोलायला लागला.

" अशी सगळीजण मिळून एकदम त्येच्या कोठीवर धाड घातली तर लगलीच त्याला सुगावा लागल. मग त्यो तिरासिंगराव आनि त्येचं साथीदार मिळून आपला पार बुकना पाडल्याशिवाय ऱ्हाणार नाहीत. "

“ का वो, तुमी तिरसिंगरावाला बवितलाय न्हवं ? ”

“ बघितलाय की...अगदी जवळून बघितलाय...”

“ कसा काय दिसतोय म्हणायचा हा तिरसिंगराव ? ” .

“ हाय की असा माझ्याएवडा उंचा पुरा आन् आडमाप सुटल्याला. ”

“ बापरे, तुमच्या एवढा हाय म्हन्तासा...म्हंजी चुकून जर का आमच्यातलं कुणी त्येच्या तावडीत घावलं तर फुकाट त्येची उरसातल्या कोंबड्यावाणी कंदुरी हुईल ! ”

“ आरं, त्येला काय भितासा ? त्यो कितीबी मोटा तगडा पैलवान गडी असला तरी आपण एकाला पाच जण मिळून गेल्यावर त्याची काय डाळ शिजणार हाय ?

“ पण जरा पद्धतशीर दमादमानं घ्यायला पायजे. पयल्यांदा एकेकजण माझ्याबरोबर चला. मी एकेकट्याला नेऊन आदुगर मोक्याच्या जाग्यावर नेऊन बशिवतो. पाच जणांनी मिळून असा सगळ्या कोठीला गराडा घालायचा, आणि इशाऱ्याची शीळ वाजली रे वाजली की सावध होऊन एकदम सगळ्यांनी कोठीवर हल्ला चढवायचा...”

“ हां, हां. ठीक हाय. ”

“ बेत ठीक हाय न्हवं ? मग आदुगर कोण येणार हाय ते चला माज्याबरोबर ? ”

“ पयल्यांदा आमच्या या बंदुकवाल्यालाच न्या, लै नेमबाज गडी हाय त्यो. ” —फरशी कुऱ्हाडवाल्यानं सूचना केली.

आणि हातात आडवी लोंबकळती बंदूक धरून तो बंदूकवाला चोर पाहुण्या-बरोबर निघाला.

तीन–चार फर्लांगांचे अंतर चालून पार केल्यावर पुढं एक पडकी विहीर लागली. तशी बंदूकवाल्याच्या मागोमाग चाललेल्या पाहुण्याची चालण्याची गती झपाट्यानं वाढली.

आणि मागनं अचानक कुणीतरी टांग मारल्यागत तो बंदूकवाला चोर कोलांटी उडी खाऊन धप्‌दिशी तोंडघशी पडला.

“ भ्-भ्-भूऽत ! ”—बदूकवालं हडबडून उठलं आणि घाबरून पळायला लागलं. पण तेवढ्यात पाहुण्यानं त्याला मागल्या बाजूनं अल्लाद हवेत उचलून धरला आणि नेऊन पडक्या विहिरीत फेकला.

“ ओय ! ओय ! ” — त्या पडक्या ओसाड विहिरीतनं अर्धवट अस्फुट किंकाळी ऐकू आली आणि मधनंच गपगार झाली.

एकाची तरी वाट लागली.

पाहुण्यानं हात झटकले आणि आल्या पावली तो पुन्हा परत फिरला.

" चला. दुसरं कोण येणार हाय आता माझ्याबरोबर ? "

" पण पयल्याचं कसं काय ? "

" ह्ये एकदम् ठीक...पार त्येला अगदी ठिकाणावर नेऊन पोचवला. आता तुमच्यातलं दुसरं कोण निघणार हाय त्ये चला आदुगर माझ्याबरोबर. "

मग आपला पुरुषभर उंचीचा भाला मोठ्या ऐटीत खांद्यावर धरून भालाईत चोर मोठ्या मिजाशीत पाहुण्याबरोबर निघाला.

पाहुण्यानं त्याला भुलवत दुसऱ्याच वाटेनं नेलं. चांगलं दूरपर्यंत नेलं. आणि गपक्यानं त्येच्या मानगुटीवर असा एक जोराचा गुद्दा ठेवून दिला की चोर चीत आडवाच झाला. पण पाहुण्यानं त्याला तेवढ्यावरच सोडलं नाही. बकऱ्यागत त्याची मुंडी धरून त्याच्याच दोन्ही तंगड्यात ती जाम आवळून टाकली, आणि तो लांबलचक भाला ताकदीनं दोन्ही बाजूनं वाकवून त्याच्या भोवती गुंडाळून टाकला. आपल्याच भाल्याच्या फासात अडकल्यावर चोराची मोठीच दैना उडाली आणि सुटणेही मुश्किल झाले.

मिश्यांवर पालथी मूठ फिरवीत विजयी वीराप्रमाणे पाहुणा पुन्हा परत फिरला.

" चला, तिसरं जे कोण निघणार हाय त्ये झटक्यात माज्यासंगट चला. लै उशीर नको. "

मग अधिक काही एक विचारपूस न करता फरशी कुऱ्हाडवाला चोर झपाट्यानं पुढं झाला.

— आरं तुज्या मारी. तुझी कुऱ्हाड लै नाचतिया न्हवं. थांब तुला दावतो इंगा ! पाहुणा मनोमन उद्गारला आणि झपाट्यानं त्या फरशी कुऱ्हाडवाल्याच्या पाठोपाठ चालू लागला.

असं बराच काळ चालत राहिल्यावर पुढं एक घनदाट करवंदीची जाळी लागली. हा चांगला मोका आहे ! पाहुण्यानं पुढं घुसून एकदम मागनं कंबरेत धरून त्याला वर उचलायचा प्रयत्न केला... पण सट्दिशी तो चोर निसटला. मोठ्या चपळाईनं पुढं निघून गेला.

आणि फरशी कुऱ्हाडीची धार वर हवेत तिरपी तळपती नाचवीत पुन्हा परत उलटा फिरला.

आता ?

असल्या धारदार कुऱ्हाडीचा एक जरी घाव अंगात रुतला असता तरी रक्तामांसाच्या चिळकांड्या उडाल्या असत्या. त्याचे डोळे पेटून लाल इंगळाप्रमाणे झाले होते.

कुऱ्हाड तिरपी सज्ज पवित्र्यात धरून तो चोर पाहुण्याच्या दिशेनं पुढं पुढं सरकत होता.

पण पाहुणाही कच खायला तसा काही लेचापेचा माणूस नव्हता. एक डोळा कुऱ्हाडीवर आणि दुसरा त्या कुऱ्हाडवाल्याच्या हालचालीवर रोखून तो मातीत पाय रोवून अगदी तयारीत उभा होता.

कुऱ्हाडवाल्याला अगदी जवळ अंगापाशी येऊ दिले आणि आता तो ओठात दात रोवून, सगळी ताकद एकवटून कुऱ्हाडीचा घाव घालणार.

एवढ्यात पाहुण्यानं मोठ्या शिताफीनं त्याला झुलकांडी दिली आणि बघता बघता त्याच्या पाठीमागं घुसून त्याला आपल्या घट्ट पोलादी मिठीत कमरेपाशी आवळलं. फरशी-कुऱ्हाडवाला आता पार पाहुण्याच्या पेचकाव्यातच गावला. क्षणार्धात त्याला वर अंतराळी उचलून, दोन–चार वेळा असा दाण दाण जमिनीवर आदळला की त्याची फरशी-कुऱ्हाड कुठल्या कुठं उडाली, आणि चोराचं तर पार भुस्काट निघालं.



मग पुन्हा एकदा अगदी सैल ढिल्या पडलेल्या त्याला, पाहुण्यानं दोन्ही हातांनी वर डोक्यावर उचलून, अंतराळी गरागरा फिरवलं आणि पार तिकडं करवंदीच्या दाट जाळीवर फेकून दिलं. चोर त्या जाळीवर अडकून वर हवेतच तरंगू लागला.

" चल रं " –मूळ ठिकाणी आल्यावर पाहुण्यानं चौथ्या, दोर हातात घेतलेल्या चोराला हटकलं.

" तुझा त्यो दोर आन् गाढव दिकुन बरोबर घे. "

मग गाढवाला झाडाच्या बुंध्यापासून सोडण्यात आले. आणि पुढं गाढव, मध्ये चोर आणि मागनं पाहुणा अशी अंधारातली वरात निघाली. पाहुण्यानं या चौथ्या चोराला चौथ्याच वाटेनं नेलं.

फारशी घनदाट झाडी नसलेली जरा ऐसपैस जागा बघितली आणि पाहुण्यानं या चौथ्या चोरावर चित्यासारखी झेप घेतली. थोडा वेळ झटापट झाली. चोरानं पाहुण्याला दोरानं हाणायचा प्रयत्न केला. अधूनमधून पाहुण्याच्या हातातून निसटून कुठं पळ काढायला वाव मिळतोय् काय बघितलं. पण नाही.



थोड्याच वेळात पाहुण्यानं याही चोराची गठडी वळली आणि उचलून नेऊन थेट गाढवावर ठेवली. वरनं त्याचाच दोर आवळून बांधला. मग रॉकेलचे हे रिकामे डबे गाढवाच्या शेपटीला बांधले. एवढे झाल्यावर एक भला मोठा लाकडाचा ओंडका घेऊन गाढवाच्या ढुंगणावर असा एक सणसणीत तडाखा ठेवून दिला की गाढव फँ फँ करीत तेथून पळत सुटले.

त्याबरोबर गाढवाच्या मागच्या लाथा खाऊन आणि जमिनीवर पुन्हा पुन्हा आपटून रॉकेलचे डबे जोरजोरात आवाज करू लागले. त्या आवाजाने दिशा फाटल्या आणि भेदरून बावचळून गेलेले गाढव आणखीनच वेगाने दौड मारू लागले.

पाहुणा कितीतरी वेळ तिथं पोट धरधरून हसत उभा होता.

पुढे, एकदम मध्येच मनात काहीतरी आठवल्याप्रमाणे होऊन पाहुणा हसायच थांबला आणि पाठ वळवून तडक कोल्हापुराच्या दिशेने झपाट्याने निघाला.

दुसऱ्या दिवशी तांबडं फुटायलाच एक जीप गाडी आणि एक पोलीसव्हॅन कोल्हापुराहून निघून त्या जंगलात येऊन थडकली. तिच्यातून दोन पोलीस इन्स्पेक्टर आणि आठ दहा पोलीस खाली उतरले. त्यांच्याबरोबर आपला पाहुणाही होताच.

बंदुका, पिस्तुले रोखून मग सगळ्या जंगलभर शोधाशोध सुरू झाली. फ्रिप्—फ्रिप् करून शिट्या वाजू लागल्या. इंग्रजीत आणि हिंदीत लष्करी हुकूम सुटू लागले.

भाल्याच्या फासात अडकवून टाकलेला चोर प्रथम त्या फासातून सुटण्याची केविलवाणी, निष्फळ धडपड करून आता अगदी निवांत निपचीत पडला होता.

पाहुण्यानं त्याला भाल्याच्या फासातनं सोडवून पोलिसांच्या हवाली केलं. पडक्या ओसाड विहिरीत विव्हळत पडलेल्या चोरालाही वर काढून पोलिसांनी आपल्या ताब्यात घेतले. तिसरा चोर करवंदीच्या त्या जाळीवरून सुटून खाली येण्यात यशस्वी झाला होता. पण त्याच्या अंगभर एवढया जखमा झाल्या होत्या की, त्याला धड उभेदेखील राहता येत नव्हते. त्यालाही पकडून पोलिसांनी त्याच्या हातात बेड्या ठोकल्या.

चौथा, गाढवाच्या पाठीशी बांधलेला चोर मात्र लांब एका ओढयात जाऊन गाढवासकट उताणा पडला होता व असल्या खब्रदाडात दोघेही अडकले होते की, गाढवाला आणि चोराला दोघांनाही त्यातून सुटणे मुश्किल झाले होते.

चारी चोर ताब्यात घेतल्यावर इन्स्पेक्टरसाहेबांनी एक समाधानाचा सुस्कारा सोडला आणि पाहुण्याची पाठ थोपटून म्हटले,

" शाब्बास तिरसिंगराव, तुम्ही तर अगदी कमाल केलीत. या भागातले अत्यंत विलंदर चोर तुम्ही आज आम्हांला पकडून दिलेत. "

" मग सोडीन व्हय. "—आपल्या तानाजी मालुसऱ्यासारख्या ऐटदार मिश्यांवर पालथी मूठ फिरवीत तिरसिंगराव मोठ्या मिजाशीत बोलले,

" हे लेकाचे चौघेजण माझ्याच बंगल्यावर दरोडा घालायला निघाले होते. तवा त्यांना जरा दाखवला या तिरसिंगरावाचा हिसका. "

आपल्याला रात्री भेटलेला तो वाटसरू, तो अनोळखी पाहुणा म्हणजे दुसरा तिसरा कुणी नसून स्वतः तिरसिंगरावच होते, हे ऐकून त्या चारी चोरांची बोबडीच वळली आणि डोळे पांढरे व्हायची वेळ आली.

* * *

# पोलिसहवालदार तिरसिंगराव

चीन व पाकिस्तानबरोबर झालेल्या युद्धानंतर, अंतर्गत व बाह्य सुरक्षिततेच्या संबंधात देशभर व सरकारात निरनिराळ्या योजना मूळ धरू लागल्या.

त्यासाठी सरकारच्या पोलीस खात्यानेदेखील एक विशेष योजना आखली. या योजनेनुसार निवडक मुलकी नागरिकांना सर्वांगीण पोलिसी शिक्षण देऊन तयार करावयाचे होते. उद्देश हा की, युद्धासारख्या प्रसंगी किंवा अन्य संकटकाळी, आणीबाणीच्या वेळी पोलीस जेव्हा काही अन्य महत्त्वाच्या कामगिरीत गुंतलेले असतात, तेव्हा चोरी, गुन्हेगारीचे प्रकार वाढू नयेत आणि नागरी जीवन विस्कळीत होऊ नये म्हणून, अशा वेळी या प्रशिक्षित नागरिकांनी पुढे होऊन, पोलिसांची सर्व कामे आणि जबाबदारी स्वत: जातीने पार पाडावयाची. दोन महिने ट्रेनिंग आणि पुढे तीन महिने प्रत्यक्ष अनुभव असा हा एकूण पाच महिन्यांचा शिक्षणक्रम होता. पोलीस परेड, घोड्यावर बसणे, लाठी चालवणे, मशिनगन, बंदूक, अश्रुधूर, हँडग्रेनेड वगैरेंचा वापर, जीप ड्रायव्हिंग ....एक ना दोन, अशा अनेकविध प्रकारच्या मर्दानी गोष्टी शिकायला मिळतात म्हणून तालमीतल्या बऱ्याचशा पैलवान मंडळींनी हा हंगामी शिपाईबाणा मोठ्या हौसेने पत्करला आणि तिरसिंगरावांनादेखील त्यासाठी बळेबळेच ओढून नेले.


निवडीचा तसा प्रश्न नव्हता. परंतु तिरसिंगरावांच्या बाबतीत प्रश्न उभा राहिला तो वेगळाच. पोलीसखात्यातील या प्रशिक्षणाच्या निवडीसाठी ज्याप्रमाणे कमीत कमी वजन, उंची, छाती यांची किमान मर्यादा ठरली होती, त्याचप्रमाणे या साऱ्या वजनामापांची जास्तीत जास्त कमाल मर्यादादेखील ठरली होती.

तिरसिंगरावांची उंची मोजली. प्रश्नच नाही. ती अगदी व्यवस्थित भरली. परंतु व...वजन...तिरसिंगराव वर उभे राहताच वजनाचा काटा गरगरा फिरला आणि वजनाची कमाल मर्यादा ओलांडून तब्बल दोन ते अडीच पोलिसांचे वजन एकटे तिर-

अनुक्रम क्रमांक ...... नोंद दि.............

सिंगराव खाऊन गेले. शक्ती मोजताना शक्तिमापक यंत्राच्या दांड्याला तिरसिंगरावांनी तान्.द पणाला लावून इतक्या जोरात खेचले की तो ताण सहन न होऊन शक्तियंत्राचा काटा आणि स्प्रिंग ताड्कन तुटून पडली....

परंतु तिरसिंगराव म्हणजे एक बुलंद जहाज होते जहाज! त्यांच्या त्या रुबाबदार व्यक्तिमत्त्वावर मुख्य पोलिसाधिकारी इतके तबियत खुश होते की, त्यांनी ' ट्रेनिंग 'साठी तिरसिंगरावांची निवड तर केलीच, परंतु त्यांना एकदम पोलीस हवालदाराची जागा देऊ केली!



पुढे या सर्व ' ट्रेनीं 'साठी खाकी पोलिसी गणवेष शिवावयाचे होते. तिरसिंग-रावांच्या छातीचे माप घेताना शिंप्याच्या तीन मोजपट्ट्या तरी तुटल्या. शिवाय कापड मापताना ते वाराच्या मापात न मोजता, ताग्याच्या मापात मोजून घ्यावं लागलं आणि लागोपाठ चांगलं दोन तीन दिवसतरी सगळं कसब पणाला लावून शिलाईच्या कामात स्वतःला गुंतवून घेतल्यानंतर, कुठे एकदाचा तो तिरसिंगरावांचा खाकी ' ड्रेस ' शिवून तयार झाला!

खाकी अर्धी पॅंट, वर खाकी पोलिसी शर्ट, कमरेला पट्टा. डोक्यावर तिरकी काळी टोपी, तिला पितळी गुंडया, छातीवर चकचकीत पितळी बिल्ला नि नंबर, पायांत मौजे, त्यावर वुलनचा गरम पोलिसी पट्टा गुंडाळलेला, पायात जाडजूड, काळे चकचकीत बूट, कमरेच्या पट्ट्यात पितळी शिट्टी, दंडुका, एका बाजूला लोखंडी म्यानात संगिन... बाकी तिरसिंगराव या पोलीस हवालदाराच्या वेषात दिसत मोठे झोकदार!

मिशीला पीळ भरीत आणि ' टॉक् टॉक् ' असा बुटांचा आवाज उठवीत रस्त्याने निघाले की सामान्य माणूसच काय परंतु प्रत्यक्ष खराखुरा पोलीसदेखील त्यांना बघून बिचकल्यासारखा व्हायचा!

दोन महिन्यांचं ट्रेनिंग तिरसिंगरावांनी अगदी सुरळीतपणे पार पाडलं. आता

घोड्यावरून रपेट करताना, तिरसिंगराव बसलेलं घोडं त्यांचं वजन सहन न होऊन वाकून कमरेत मोडून जमिनीवर कोसळलं... यात तिरसिंगरावांचा दोष तो काय? तिरसिंगरावांचे 'ट्रेनिंग' संपल्यावरही बरेच दिवसपर्यंत हे घोडं फेंगडं चालत होतं म्हणे... असो.


ट्रेनिंग संपले. प्रत्यक्ष पोलीस हवालदार म्हणून तिरसिंगरावांनी कामाला व अनुभव घ्यायला सुरुवात केली. पहिल्याप्रथमच तिरसिंगरावांच्यावर काम सोपविण्यात आले ते चौकात रहदारीवर नियंत्रण करण्याचं.

"फ्रिप्! फ्रिप्!"—शिटी वाजवीत आणि हात उभे आडवे हलवीत, रहदारीच्या नियंत्रणाचं काम तिरसिंगराव अगदी सूत्रबद्ध आणि चोखपणे पार पाडीत होते.

तेवढ्यात एक मोटारसायकल धाडधाड करीत आली आणि जवळच उभ्या असलेल्या एका स्कूटरला धक्का देऊन, तिरसिंगरावांच्या हाताचा इषारा न जुमानता तसाच तिने चौक ओलांडून पुढे धावायचा प्रयत्न केला.

रहदारीचे नियम मोडून बेलगामपणे पुढे धावणाऱ्या अशा वाहनांचा नेहमीचा अनुभव असा असतो की, सर्वसामान्यपणे रहदारीचा पोलीस दोनतीन वेळा शिट्टी वाजवून पुनः पुन्हा त्या वाहनाला थांबवायचा प्रयत्न करतो व तेवढ्यानेही ते वाहन थांबले नाही व बाब तशी फारशी गंभीर नसेल तर वाहनाला तो तसाच जाऊ देतो.

परंतु आज रहदारी नियंत्रणासाठी नेहमीचा पोलीस नसून, तिरसिंगराव आहेत हे बहुधा त्या मोटारसायकल स्वाराला ठाऊक नसावे.



अनुक्रम ......... दि ......... फळांक ......... नोंद दि .........

कारण, बघता बघता तिरसिंगरावांनी त्या मधल्या चौकातून उडी घेऊन एकदम झेप घेतली आणि एकदोन ढांगांतच मोटारसायकलला मागच्या बाजूने घट्ट बळकट पकडून धरले.

" फडर्रर्ऽऽफाड्....फाड्...फाड "

गतीत असलेल्या मोटारसायकलची चाके जागच्या जागीच जमिनीला घसटून गरगरू लागली....मग तिरसिंगरावांनी ती मोटारसायकल तशीच दरादरा ओढत मागे आणून चौकाच्या अलीकडे रस्त्याच्या कोपऱ्यावर बाजूला उभी केली.

तिरसिंगरावांची ती अचाट ताकद बघून, मोटारसायकलवाला मनोमन हादरलाच.... पण एवढ्यावरच भागले नाही. त्याची कसून तपासणी केली. तेव्हा त्याच्यापाशी मोटार-सायकल चालवायचं ' लायसन ' नव्हतं. शिवाय चोरटे सोने, घड्याळे, ट्रँझिस्टर अशा वस्तूंचा तो बेकायदेशीर व्यापार करीत होता. झडती घेतल्यावर त्याच्याजवळ, जवळ जवळ पस्तीसचाळीस हजारांचा, सोन्याच्या चिपा, घड्याळे, परकीय चलनी नोटा, असा ऐवज सापडला....मग काय....तिरसिंगरावांनी त्याच्या मोटारसायकलसकट त्याची, पोलीस ठाण्यावर रवानगी केली. त्याची ती मोटारसायकलदेखील अशीच चोरून परदेशातून आयात केली गेली होती !

एके दिवशी तिरसिंगराव पोलीस हवालदाराचा ड्रेस चढवून, सहज संध्याकाळी आरामात नदीकाठी वाळूतून फिरत होते. तेवढ्यात एक दाढीचे खुंट वाढलेला फाटका इसम चोरट्यासारखा तिरसिंगरावांच्याजवळ आला नि तीन तीनदा सलाम करीत अजीजीने बोलला,

" सायेब, आज तुमचा हप्ता पोचवायला जवळ अजून पैसे आल्याले नाईत, पण तुमाला काय पेग, दोन पेग प्यायची असली तर माझ्याबरोबर चला. वाटेल तेवढी पाजतो. "

पुढे अधिक काही न बोलताच सगळा मतलब तिरसिंगरावांच्या ध्यानात आला.

हातभट्टीच्या दारूचा चोरटा धंदा करणारा तो एक फडतूस माणूस होता.

आपला फिरायला जाण्याचा बेत बदलून तिरसिंगराव त्याच्या पाठोपाठ एका झुड-पाच्या आडोशाला गेले. तेथे एक नगरपालिकेचा प्रचंड उकिरडा पसरला होता आणि झुडपाखाली एक मोठे पीपच गावठी दारूने भरून ठेवले होते. •

पिपातली दारू ग्लासात भरून त्या इसमाने ती तिरसिंगरावांना देऊ केली इतक्यात....

तिरसिंगरावांनी त्या फाटक्या इसमालाच, त्याच्या दोन्ही तंगडया धरून उलटा उचलला आणि तसाच डोक्याकडून दारूच्या त्या पिपात बुडवला.

बुड....बुड....बुड...गुड....गुड....गुड....

"सायेब ! सायेब !"–पण तेवढयात तिरसिंगरावांनी त्याला पुन्हा दुसऱ्यांदा पिपाचा तळ दाखवला.

बुडुक....बुडुक....फुर्र्र्र....फुर्र्र्र....

"मेलो ! मेलोक्....ऑप्....ऑप्.... "–त्याच्या नाका-तोंडातून सगळी दारूच दारू शिरली.

डोंगरकपारीतल्या ठाणेवाडीहून दिवस मावळता मावळता असा एक म्हातारेबुवा वर्दी घेऊन पोलीस ठाण्यावर आला. ठाणेवाडीजवळच्या रानातल्या एका वस्तीवर दिवसा-ढवळ्या घरफोडी झाली होती आणि दागिन्यांचं गाठोडं, गाईचं एक वासरू पळवलं गेलं होतं.

चोरीचा तपास लागलीच लागणे आवश्यक होते. नाही तर चोर मुद्देमालासह रातोरात परिसर सोडून दूरवर पळून जाण्याची शक्यता होती. हे काम तिरसिंगरावांवर सोपविण्यात आले. बस्स्, मुद्देमालासकट चोराला धरून, पोलीस गेटावर हजर करायचे. त्यांच्याबरोबर दोन हत्यारबंद पोलीस मदनीस म्हणून देण्यात आले. दिवे लावणीच्या वेळापर्यंत तिरसिंगराव ठाणेवाडीजवळच्या त्या रानातल्या वस्तीवर जाऊन पोहोचले.

प्रथम घरफोडी झाली होती त्या घराची त्यांनी कसून तपासणी केली. ढिसूळ मातीचे अगदी जुनाट बांधकाम आणि दार इतके कुजून गेले होते की, थोडीशी एक जोरदार धडक दिल्यावर ते लावलेल्या कडीकुलपासकट मोडून जमिनीवर कोसळावे. सकाळी घरातली झाडून सगळी पाक मंडळी वऱ्हाडी म्हणून जवळच्या गावी लग्नाला गेलेली. तो मोका साधून चोराने डाव केला. बस्स्, एका जबरदस्त धडक्यात कुजलेले दार मोडून पाडले आणि आतले मडक्यात ठेवलेले दागिन्यांचे बोचके नि गोठ्यात गाईजवळ मोकळेच वावरत असलेले वासरू घेऊन चोर पळाला.

घळीत किंवा वरती घनदाट जंगलाच्या भागात चोराचा मागोवा घेणे आवश्यक होते. रातोरात तिरसिंगराव आपल्या दोघा साथीदारांबरोबर चोराच्या मागावर निघाले.

पहाटे शुक्राची चांदणी उगवायला तिरसिंगराव चोराला बरोबर घेऊन पोलीस ठाण्या-वर मुख्य ऑफिसात हजर झाले,

" साहेब, उठा...ठाणेवाडीजवळच्या घरफोडीतला चोर मी धरून आणलाय ! "

बरेच दिवस तुंबून राहिलेली सगळी कामे मुदतीत पार पाडण्याच्या हेतूने त्या दिवशी फौजदारसाहेब आपल्या दोन सहकाऱ्यांसह त्या सबंध रात्रभर आपल्या ऑफिस-मध्ये मुक्काम ठोकून होते.

काम करता करता...पहाटे पहाटे तिघांनाही जरा डुलक्या आल्या. दोघेजण खुर्चीवरच पेंगुळले आणि फौजदारसाहेब समोर टेबलावर मान टाकून झोपी गेले.

" चोर ? कुठाय चोर ! "

" हा काय साहेब, तुमच्यासमोर हजर केलाय. "

साहेबांनी टेबलावरून मान उचलली. डोळे किलकिले करून समोर बघितले.

" गुर्र्र ऽऽ ! गुर्र्र ! "

दिव्याच्या अंधुक प्रकाशात मिश्या आणि मांजरासारखे प्रकाशमान डोळे चमकले.

" बापरे, बाप ! "

साहेबांची खाड्कन झोप उडाली.

तिरसिंगराव चक्क एका वाघाला बांधून आणून ऑफिसात उभे होते ! साहेबांनी गडबडीने टेबलावर उडी मारली. वाघाचे नाव घेताच अर्धवट झोपेत असलेले फौजदार-साहेबांचे साथीदार एकदम बावचळले. त्यातला एक उडी मारून कपाटावर जाऊन बसला नि दुसरा कपाटात घुसला.

" अहो तिरसिंगराव, वाघ कशाला धरून आणलात इथं ! "

" वाघ नाही. चित्ता आहे साहेब, तो चित्ता ! दिवसाढवळ्या घरफोडी करून चोरी करणारा चोर तो हाच ! तुम्ही जराही भिऊ नका. मी त्याला चांगल्या बांबूच्या टोक-दार काढण्या लावल्या आहेत. "

" अहो, पण चित्ता सोन्याचे दागिने कशाला चोरील ? "

" तीच तर गंमत आहे ! "

आणि मग तिरसिंगरावांनी एक एक करीत चोरीची हकीकत कथन करायला सुरुवात केली—



रानातली एकलकोंडी वस्ती आणि दाराला कुलूप ठोकलेलं. आसपास कुणी माणूसकाणूस नाही, हे बघून गाईगुरांच्या वासानं चित्ता त्या बंद घराशी आला. त्याच्या एका धडकीनं बंद कुजकं दार कोसळून पडलं. चित्ता सावधपणे आत घुसला. इकडे तिकडे उसकाउसक करताना गाडग्यामडक्याची लावलेली उतरंड त्याच्या धक्क्यानं जमिनीवर कोसळली. त्यातलंच एक मोठं मडकं फुटून त्यातनं हे दागिन्यांचं बोचकं बाहेर आलं. बोचक्याचा पांढरा रंग बघून चित्त्यानं ते उचलून घेतलं. काही तरी रुचकर मांसाचा पदार्थ असावा या हेतूनं. नंतर चित्ता गोठ्यात शिरला तशा गाई-म्हशी त्याच्या वासानं धडपडून उठून उभ्या राहिल्या. एक खुळं वासरू एवढं घाबरलं की चार पायांवर टणाटणा उड्या घेत ते मोडक्या दारातून बाहेर धावलं तसा चित्त्यानं त्याचा पाठलाग सुरू केला. त्याला झुलवीतथुलवीत लांबवर जंगलात आणलं आणि तिथं त्याचा फडशा पाडला. एकीकडे दातातलं बोचकंही त्यानं पंजानं फाडून बघितलं. परंतु त्यातल्या दागिन्यांत काही चित्त्याचे दात रुतेनात व त्याला मांसाची गोड चवही लागेना....तेव्हा मग चित्त्याने ते फाटके चिंध्या होऊन इतस्ततः विखुरलेले दागिन्याचे गाठोडे तसेच सोडून वासराच्या कोवळ्या ताज्या रुचकर मांसावर ताव मारायला सुरुवात केली.

ही घरफोडी नसून, एखादा वाघ चित्ता येथे येऊन गेला असावा, अशी कल्पना तिरसिंगरावांच्या ध्यानीमनीदेखील नव्हती. त्यामुळे चित्त्याच्या पंजाच्या खुणा मातीत

शोधण्याचा काही प्रश्नच उद्भवला नाही. पावसाळा तोंडावर घेऊन, वाघ-चित्त्यासारखी हिंस्र श्वापदे साधारणपणे आपली मुक्कामाची जागा सोडून दूरवर कुठे भटकत फिरत नाहीत. त्यामुळे ठाणेवाडीकरांच्या मनात तशी काही कल्पना चाटून जाणे शक्य झाले नाही.

म्हणून चोराचा मागोवा घेतच तिरसिंगराव जंगलात शिरले, परंतु जेव्हा एका दाट जाळीआडून चित्त्याने तिरसिंगरावांवर आकस्मिक झडप घ्यायचा प्रयत्न केला, तेव्हा तिरसिंगराव क्षणभर स्तिमित झाले. पण दुसऱ्याच क्षणी त्यांनी स्वतःला सावरून अंगावर धावून आलेल्या त्या चित्त्याचे पुढचे दोन्ही पंजे घट्ट हातात पकडले, आणि वासलेल्या त्याच्याच जबड्यात ते घातले.

संतापाने बेभान झालेल्या चित्त्याच्या काही ही गोष्ट लक्षात आली नाही आणि त्याने आपल्याच जबडयाने आपले पंजे कुडुम् कुडुम् करून फोडले. पंजे फुटून त्यातून रक्ताच्या धारा लागल्या नि त्याच्या वेदना जसजशा वाढत गेल्या तसा चित्ता तिरसिंग-रावांच्यावर हल्ला करायचा विसरून वेदना सहन न होऊन जोरजोराने विव्हळू लागला. तो खाली कोसळल्याबरोबर तिरसिंगराव त्याच्या छाताडावर बसले. तिरसिंगरावांच्या वजनाने चित्त्याची फासळी नि फासळी ढिली पडली.

लौकरच चित्ता अगदी नरम आला नि ग्लानी आल्यासारखी होऊन तो निपचित पडला. तसा तिरसिंगरावांनी चोराला बांधायला आणलेल्या दोरखंडाने त्याला अगदी व्यवस्थित बांधला. चोराच्या बेड्या त्याच्या पुढच्या दोन्ही पायांत अडकवून त्याची साखळी त्याच्याच कमरेला बांधली. उद्देश हा की, त्याला फारसे वेगाने पळता येऊ नये. दोरखंडाल धरून बांबूची एक लांबसडक टोकदार काढणी अशी बांधली की, चित्त्याने जर का आक्रमकपणे इकडे तिकडे हालचाल केली तर त्या काढणीचे पुढचे टोक त्याच्या गळ्याशी नाजूक भागावर रुतावे. चित्त्याला मग त्यांनी थोडीशी हुशारी वाटायला लागल्यावर तसेच चालवीत शहरापर्यंत आणि नंतर पोलीस ठाण्यावर आणले होते. तिरसिंगराव आणि त्या चित्त्याची झटापट सुरू झाल्यावर तिरसिंगरावांचे मदतनीस गर्भगळीत होऊन जे कुठे पसार झाले होते, त्यांचा अद्याप पत्ता नव्हता.

"गुर्रर्ऽऽ! गुर्रर्ऽऽ!"

"ए, गप् रे!" —आपल्या उजव्या हातातली वेताची लांबसडक ओली छडी लवलव हलवीत तिरसिंगरावांनी सगळी हकीकत सांगून झाल्यावर, मधूनच सारखे गुर

गुरत असलेल्या त्या चित्त्याला एकदम दम भरला !

" अहो, पण मुख्य दरवाजावरच्या पहारेकऱ्यांनी तुम्हांला आत येताना काही अडवलं वगैरे नाही का ?"—साहेबांनी पुन्हा तिरसिंगरावांना विचारलं.

" पहारेकरी होय ? मी त्यांना जरा थांबा थांबा म्हणत होतो, पण या चित्त्याला बघितल्यावर ते दोघेही लेकाचे हडबडले. पहारा करायचा सोडून त्यातला एक या पोलीस ठाण्याच्या छपरावर चढून बसला आणि दुसरा टेलिफोनच्या तारेच्या खांबावर. मग काय करणार ? मीच माझ्या हातानं दरवाजा उघडून आत आलो झालं. "

" ते चांगलं केलंत...पण आता तो तुम्ही धरून आणलेला चित्ता तुरुंगाची एक कोठडी मोकळी आहे, तिच्यात त्याला डांबा. या घ्या कोठडीच्या किल्ल्या ! "—फौजदारसाहेबांनी टेबलावरूनच तिरसिंगरावांच्या दिशेने किल्ल्या फेकल्या. तिरसिंगरावांनी त्या अल्लद वरचेवर झेलल्या. अद्यापही फौजदारसाहेबांचे पाय लटलट कापत होते.

तिरसिंगरावांनी त्या चित्त्याला तुरुंगाच्या मोकळ्या कोठडीत डांबले आणि बाहेरचे दार बंद करून कुलूप लावले....अशी संपूर्णपणे खात्री पटली, तेव्हा कुठे फौजदार-साहेब टेबलावरून खाली उतरले. त्यांच्या मदतनिसांपैकी एक घाम पुसत कपाटावरून खाली उतरला आणि दुसरा जीव घट्ट करून बंद कपाट उघडून कसाबसा बाहेर आला.

पुढे हा चित्ता पुण्याच्या पेशवे पार्कात व नंतर दिल्लीच्या प्राणिसंग्रहालयात पाठवून देण्यात आला.

प्रशिक्षणाची पाच महिन्यांची मुदत संपत आली. तेव्हा पोलीस खात्याला थोडे हायसे वाटले. कारण चोर पकडण्याच्या तिरसिंगरावांच्या महापराक्रमामुळे मोठमोठे चोर दरोडेखोरच काय प्रत्यक्ष पोलीस खात्याचीदेखील पाचावर धारण बसली होती.

तेव्हा तिरसिंगरावांच्या पराक्रमी वृत्तीबद्दल त्यांचा एकदा जाहीररीत्या मोठ्या थाटामाटात सत्कार करून त्यांना पोलीस-प्रशिक्षण केंद्रातर्फे निरोप दिल्यानंतर सगळ्यांचाच जीव एकदाचा भांड्यात पडला !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ................ वि ................
क्रमांक ................ नोंद दि ................

# सिनेमात तिरसिंगराव

तिरसिंगरावांनी कोल्हापूरचा आखाडा गाजवला. मुंबईच्या मैदानात तीन पैलवानांना चितपट मारले. पंजाबात जाऊन पंजाबी पैलवानांना माती चारली. एवढेच काय पण दिल्लीचंसुद्धा मैदान गाजवून, ' हिंदकेसरी ' ही मानाची पदवी मिळविली.

हिंदकेसरी तिरसिंगराव लौकरच जागतिक कुस्त्यांच्या सामन्यात भाग घेण्यासाठी परदेशी जाणार, अशा बातम्या वेगवेगळ्या वृत्तपत्रांतून झळकू लागल्या. तिरसिंगरावांचा असा देशभर गवगवा झाला आणि मुंबईच्या नामांकित चित्रपट-निर्मात्यांचे लक्ष त्यांच्या-कडे-वेधले.

दारासिंगाच्या मागोमाग ' देमार ' चित्रपटातून जर तिरसिंगरावांना भूमिका दिल्या तर ते चित्रपट भलतेच लोकप्रिय होतील आणि भरमसाट ' गल्ला ' भरेल, असा लोभ सुटून, अनेक मोठमोठे निर्माते त्यांच्यासाठी मिटक्या मारू लागले.

मुंबईतल्या एका पैसेवाल्या निर्मात्याने तर तिरसिंगरावांना कोल्हापुराहून घेऊन येण्यासाठी चक्क मोटारगाडी पाठविली. पण नेहमी फक्त सिनेमातल्या नट्यांना घेऊन फिरणारी ती नाजूकनार आणि झोकदार गाडी, प्रत्यक्ष तिरसिंगरावांनी तिच्यात बसण्यासाठी नुसता आत पाय ठेवल्याबरोबर भूकंप झाल्यासारखी हलायला लागली. तिरसिंगरावांना घेऊन तिला धड मैलभरही जाता आले नाही. फाट्‌दिशी मोठा फुगा फुटल्यासारखा आवाज झाला, आणि मोटारगाडीच्या मागच्या टायरी बर्स्ट झाल्या.

" हॅत् तुमच्या मारी ! ह्या गाडीत काही दम नाही. तिला हॉस्पिटलात नेऊन डॉक्टरकडून जरा टॉनिक पाजा !"—असा ड्रायव्हरला सल्ला देऊन तिरसिंगराव गाडीतून उतरले. डुलतडुलत कोल्हापूरच्या रेल्वे स्टेशनवर गेले. फर्स्ट क्लासचं तिकीट काढून आगगाडीत बसले आणि थेट मुंबईला पोहोचले. मुंबईत चित्रपटांचे निर्माते, लेखक, दिग्दर्शक, फोटोग्राफर वगैरे मंडळी त्यांच्या स्वागतासाठी दादर स्टेशनवर आलेलीच होती.

निर्मात्याने सिमला हिलवर आपल्या बंगल्याशेजारचाच बंगला तिरसिंगरावांना राहण्यासाठी दिला. भल्या सकाळी उठून तिरसिंगरावांनी आपल्या बंगल्यात जोर बैठका काढायला सुरुवात केली की, त्याचा आवाज निर्मात्याच्या बंगल्यात घुमायचा आणि आसपासच्या तीनचार बंगल्यांच्या भिंती हलत असल्याचा भास व्हायचा.

लौकरच एक-दोन दिवसांत निर्मात्याने तिरसिंगरावांना आपल्या बंगल्यावर बोलावून घेतले आणि आपल्या नव्या चित्रपटाविषयी त्यांना कल्पना दिली.

" हे बघा, आमच्या नव्या चित्रपटात तुम्हांला नायकाची भूमिका देण्यासाठी आम्ही बोलाविले आहे. त्यासाठी पैशाचा करार काय तो अगोदर झालेला बरा. तेव्हा तुम्ही एका चित्रपटात काम करण्यासाठी किती पैसे घेणार ते बोला ! "

" हे बघा, आम्ही पैलवान माणसं. आम्हांला पैशापेक्षा आमचा खुराक महत्त्वाचा वाटतो. तेव्हा आमचा खुराक तुम्ही वेळच्या वेळी पुरविलात की, आमचं काम भागलं. बाकी आमच्या सिनेमातल्या कामाचा मोबदला म्हणून तुम्हांला इच्छेला येईल तेवढा पैसा द्या. तो आम्ही आनंदानं घेऊ. "

" वा, वा ! तुमच्या खुराकाची अगदी चोख व्यवस्था ठेवली जाईल. तुम्ही काळजी करू नका ! "—निर्माता अगदी हुरळून गेला.

पण तिरसिंगरावांच्या खुराकाची व्यवस्था ठेवणे, ही चित्रपटनिर्माते समजत होते तेवढी सोपी गोष्ट नव्हती, हे त्यांच्या अगदी लौकरच लक्षात आले.

कारण तिरसिंगरावांच्या नुसत्या सकाळच्या न्याहारीलाच पाच अंडी लागत. सबंध दिवसभरात मिळून ते जवळ जवळ एक घागरभर निरसे दूध पिऊन फस्त करीत. दुधात पाणी मिसळलेले त्यांना खपत नसे.

निर्मात्यांनी मुद्दाम एका दूधवाल्या भय्याला दुधासाठी दुप्पट भाव देऊन, तिरसिंगरावांसाठी चोख आकडी दूध पुरवायला सांगितले. पण आणखी फायदा काढण्याच्या हावरट हेतूने, त्या लुच्च्या भैय्याने एक दिवस गुपचुपपणे दुधात पाणी मिसळले.

समोर दूध बघितल्याबरोबर तिरसिंगरावांच्या ही गोष्ट लक्षात आली. ते इतके संतापले की, सगळी दुधाची घागरच उचलून त्यांनी ती दूधवाल्या भैय्याच्या डोक्यावर भडा भडा ओतली !

दुसऱ्या दिवसापासून निर्मात्याने आरे गौळीवाडयातून एक खास दुभती म्हैस मागविली आणि तिरसिंगरावांच्या सेवेला ठेवली. आठवड्यातून तीन दिवस तिरसिंगराव

अनुक्रम ...... दि ......
क्रमांक ...... नोंद दि ......

मांसाहार करीत. शनिवारी दुपारी एकदाच जेवण घेत. पण त्या एका जेवणाला, एक सबंध कोंबडी, दोन ससे, नाहीतर निदान तीन कबुतरे लागत.

निर्मात्याने हौसेने आपल्या बागेत बरेच ससे आणि कबुतरे पाळली होती. एका शनिवारी त्यातले दोन गलेलठ्ठ ससेच कुठे लंपास झाले. निर्मात्याने आणि त्याच्या बायकोने खूप शोधून बघितले.

संध्याकाळी भेट झाल्यावर तिरसिंगरावांनी त्यांना खुलासा केला.

" अहो, मी तरी काय करणार ? तुम्ही नेमलेल्या त्या आचाऱ्याने माझ्या आजच्या खान्याची काही बरोबर व्यवस्था केली नव्हती. तेव्हा मीच तुमच्या बागेतले दोन ससे उचलून आणले, आणि शिजवून खाल्ले. बाकी तुमचे ते ससे भारीच टेसदार आहेत हा ! "

निर्मात्याने कपाळावर हात मारून घेतला. करतो काय बिचारा ? उलट काही बोलावे तर तिरसिंगरावांशी गाठ होती.

आठवड्यातून एकदा तिरसिंगरावांना चमचमीत पक्वान्न लागे. बसल्या बैटकीत तिरसिंगराव परातभर जिलब्या फस्त करीत. बासुंदीचे तर पातेलेच तोंडाला लावून घटा-घटा पीत....नुसताच फलाहाराचा बेत असला तर तिरसिंगराव निर्मात्याची नुसती दैना उडवीत. कारण टोपलीभर रत्नागिरीचे कलमी आंबे ते एका सपाट्यात उडवीत. द्राक्षांची तर करंडीच आणून त्यांच्यासमोर ठेवावी लागे. अंजीर, डाळिंब, सिताफळं, चिकू, संत्री, नारिंग असल्या फळांचा तर हिशेबच करता येत नसे....तिरसिंगरावांच्या खुराकाच्या तैनातीत निर्मात्यांच्या खिशातला पैसा इतक्या जलद गतीने नाहीसा होऊ लागला की, निर्मात्याने लौकरात लौकर चित्रपट पुरा करण्याचे निश्चित केले.

चित्रपटाच्या सुरुवातीच्या चित्रीकरणासाठी महाबळेश्वरालगतचा निसर्गरम्य परिसर निश्चित करण्यात आला. तिथलीच ऐसपैस मोकळी मैदानी पण हिरवीगार जागा निवडण्यात आली.

तिरसिंगरावांना मुंबईहून तेथपर्यंत घेऊन जाण्यासाठी एक खास गाडी बोलविण्यात आली. तिला मागच्या बाजूला दोन दोन टायर्स आणि पुढे डबल एंजीन जोडले होते !

प्रत्यक्ष चित्रीकरण जेथे व्हावयाचे होते, त्या ठिकाणावर सगळा लवाजमा जाऊन उतरला. कॅमेरा, साऊंड रेकॉर्डिंग आणि सर्व यंत्रसामग्री सुसज्ज करून ठेवण्यात आली. तिरसिंगरावांना—अत्यंत शक्तिमान व्यक्तीला शोभेल असा—वाघाच्या कातड्याचा ऐटदार पोषाख चढवून तेथे आणण्यात आले.

आणि मग चित्रपटाचे दिग्दर्शक तिरसिंगरावांना त्यांची भूमिका समजावून देऊ लागले.

" हे बघा तिरसिंगराव, तुम्ही या चित्रपटात एका अत्यंत शक्तिशाली व्यक्तीची भूमिका करणार आहात. आजच्या या दृश्यात तुमच्या अंगावर खलनायक आणि त्याचे काही साथीदार धावून येतात आणि तुम्ही त्यांच्याशी मुष्टियुद्ध करून सर्वांचा फडशा पाडता, असे दृश्य चित्रित करावयाचे आहे. "

" अच्छा ! "

" समोर तुमच्या अंगावर धावून येतील त्या खलनायक किंवा त्याच्या साथीदारांच्या नाकाडावर तुम्ही ठोसे लगवायचे; काय ? याची एकदा ट्रायल दाखवा बघू ? "

" कशाची ? ठोसे हाणायची ? "

" होय. "

" ओय....ओय.... "

समोरच उभ्या असलेल्या दिग्दर्शकाच्या नाकाडावर तिरसिंगरावांनी असा एक जबरदस्त ठोसा ठेवून दिला की, दिग्दर्शक उताणाच पडला.

" अहो, हे काय तिरसिंगराव ? तुम्ही दिग्दर्शकाच्या नाकाडावर कशाला ठोसा लगावलात ? "—निर्माते धावतच सामोरे आले.

" पण त्यांनीच मला ट्रायल दाखवायला सांगितली ! "

" पण ट्रायल ही हवेत दाखवावयाची असते.... "

" असे होय ? मला माहीत नव्हते ! " तिरसिंगरावांनी दिलगिरी व्यक्त केली.

यानंतर दिग्दर्शकसाहेब जरा बिचकून तिरसिंगरावांपासून चार हात दूर अंतरावर राहूनच हुशारीने वावरू लागले. प्रत्यक्ष त्या दृश्याच्या चित्रीकरणाला सुरुवात झाली.

खलनायक कसाबसा लटपटत तिरसिंगरावांच्या अंगावर धावून आला. पण तिरसिंगरावांनी त्याला तीन ठोशांतच असा गारद केला की, चौघांनी मिळून उचलूनच त्यास बाजूस न्यावे लागले. बाकीचे साथीदार तिरसिंगरावांच्या हातचा एकेक ठोसा खाल्ल्यावर ' मारा बाप ! मेलो ! मेलो ! ' – म्हणून सिनेमात काम करायचे सोडून धूम पळत सुटले.

" तिरसिंगराव, तुम्ही तर या लोकांना खरोखरच झोडपून काढलेत ! सिनेमात काम करताना खोट्या खोट्या मारामाऱ्या करायच्या असतात ! "

" पण तुम्ही हे मला अगोदरच सांगून ठेवायला हवे होते ? "

... वाचनालय शाखा.
अनुक्रम ............... वि . ............ २५
क्रमांक ........................ नोंद दि ...............



" आम्हांला वाटले, तुम्हांला हे सगळे ठाऊक असेल. "

" कुठून ठाऊक असणार ! सिनेमात मी आज प्रथमच काम करतो आहे "— तिरसिंगरावांनी आपले याबाबतचे अज्ञान कबूल केले.

दुपारी चार वाजल्यानंतर पळत्या मोटारीतल्या काही दृश्यांचे चित्रीकरण व्हावयाचे होते. त्या वेळी तिरसिंगरावांनासुद्धा पाचारण करण्यात आले.

" या दृश्यात माझी काही भूमिका आहे काय ! "

" तुमची भूमिका नसली तरी तिरसिंगराव, या दृश्याचे सहज चित्रीकरण कसे होणार, हे तुम्हांला दाखविण्यासाठी, आम्ही मुद्दाम तुम्हांला घेऊन जाणार आहोत. "

ऐसपैस विस्तृत असे हिरवळीचे मोकळे मैदान पसरले होते. तेथे चित्रपटाचे दिग्दर्शक, लेखक, सहदिग्दर्शक, निर्माते, एक्स्ट्रॉ, कलावंत असा सगळा फौजफाटा जमला होता.

समोरच डांबरी रस्त्यावर हे चित्रीकरण होणार होते.

" पण तुमचे फोटोग्राफर वगैरे मंडळी कुठे आहेत ? " तिरसिंगरावांनी सहज चोकशी केली.

" धावत्या मोटारीतील दृश्याचे चित्रीकरण व्हावयाचे असल्यामुळे कॅमेरा आणि कॅमेरामन त्या मागच्याच मोटारीत ठेवला आहे. आता बघालच तुम्ही गंमत ! "

थोड्या वेळात एक अलिशान पण उघडया टपाची ऐसपैस सुरेख मोटारकार लांवून येताना दिसली. तिच्या मागोमाग येणाऱ्या मोटारीत चित्रपटाचा कॅमेरा आणि तो चालविणारे लोक बसले होते. पण त्या मागच्या मोटारीकडे काही तिरसिंगरावांचे लक्ष गेले नाही. पुढच्याच मोटारीकडे ते टक लावून आणि अत्यंत संशयी नजरेने पाहात होते.

त्या उघडया मोटारीत एक सुंदर स्त्री चार-पाच आडदांड मवाल्यांशी झटापट करीत होती. आणि अधूनमधून " वाचवा ! अहो वाचवा ! " अशा किंकाळ्या फोडीत होती.

मोटार तिरसिंगरावांच्या समोरून अशी पुढे जाऊ लागली, आणि तिरसिंगराव एकदम बेभान झाले. चार-सहा मवाल्यांनी एका अत्यंत नाजूक आणि सुंदर स्त्रीला पळवून नेण्याचा तो अत्याचारी प्रकार तिरसिंगरावांच्या मनाला मुळीच खपला नाही.

त्या मोटारीच्या दिशेने तिरसिंगरावांनी चित्त्यासारखी उसळी घेतली.

"अहो तिरसिंगराव....हे काय....हे काय ?" पण तिरसिंगरावांना काही ऐकून घ्यायला एवढी सवड कुठली ? झपाट्यासरशी त्यांनी मोटारीला गाठले आणि मारुतीप्रमाणे मोटारीत उडी घेतली. आपल्या लोखंडासारख्या सणसणीत मुठीने एकेका मवाल्याला असा गुद्दा ठेवून दिला की, त्या ठोशाने दोन-चार मवाली मोटारीबाहेर उडाले आणि दाणदिशी जमिनीवर आदळले. उरलेल्या मवाल्यांनी आपणहून भीतीने मोटारीबाहेर पटापट उड्या मारल्या आणि मिळेल त्या वाटेने सूंबाल्या केला !

पण तिरसिंगरावांना इतका खून चढला होता की, त्यांनी त्या मोटारीच्या ड्रायव्हरलाही बुकल बुकल बुकलला आणि उचलून मोटारीबाहेर फेकून दिला. झाल्या प्रकाराने गांगरून गेलेली ती बिचारी मोटारीतली नटी अधिकच भेदरली आणि जोर-जोरात किंचाळू लागली.

पण मोटारीला ड्रायव्हरच राहिला नाही आणि त्यामुळे मोटारीने डांबरी रस्त्यावरून धावायचे सोडून दिले. ती रस्ता सोडून बाजूच्या आडरानातून पळू लागली. लौकरच वळणे घेत घेत ती ज्या ठिकाणी चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक, लेखक वगैरे मंडळी बसली होती त्याच रोखाने पुन: परत फिरून निघाली.

मोटारीने नेमक्या त्याच पटांगणात रिंगण धरले आणि मन मानेल तसा स्वैरसंचार चालू केला.

मोटार चुकविण्यासाठी सगळी मंडळी रिंगणात पळू लागली. दिग्दर्शक आपली पँट सावरत आणि निर्माते आपले धोतर वर धरून, जीव मुठीत धरून धावत होते.

पण तिरसिंगरावांच्या डोळ्यांत आता चांगलेच रक्त उतरले होते. हे मोटारीपुढे धावणारे लोक म्हणजे मघाचेच ते लेकाचे मवाली असावेत असे तिरसिंगरावांना वाटले आणि त्यांनी एकदम मोटारीबाहेर उडी घेतली. हाताशी सापडेल त्याला धरून अगोदर बुकलायला सुरुवात केली.

"अहो, त्-त् ति-तिरसिंगराव...."...पण पुढे काही त्या व्यक्तीने बोलण्या-अगोदरच तिरसिंगरावांचा एक जाम ठोसा त्याच्या हनुवटीवर बसायचा आणि त्याची वाचा बंद पडायची.

निर्मात्याबरोबर आलेले एक शेटजी तर या एकंदर प्रकाराने एवढे घाबरले की, पोट सावरीत सावरीत ते पटकन् जाऊन एका झाडावरच चढून बसले.

त्या सपाट्यात तिरसिंगरावांनी निर्मात्याला आणि दिग्दर्शकालाही धुण्यासारखा धोपटून काढला.

या शारीरिक व्यायामाने तिरसिंगरावांना दम लागला. ते विश्रांती घेण्यासाठी थोडा वेळ थांबले. पण तेवढ्यात मागच्या बाजूने धावत येणाऱ्या, ड्रायव्हर नसलेल्या मोटारीने त्यांनाच धडक दिली.

धडक बसताच तिरसिंगराव इतके संतापले की, काहीएक पुढचामागचा विचार न करता धडक देणाऱ्या त्या वस्तूला आपणच एक जोराची उलट धडक दिली. मोटार बिचारी तिरसिंगरावांची धडक खाल्ल्याने गरगरत जाऊन दूरच्या एका खड्डयात कोसळली.

पण मोटारीचा मार बसून तिरसिंगरावांनाही कपाळावर खोक पडली आणि अंगभर मुका मार बसला. झाल्या श्रमाने ग्लानी येऊन तिरसिंगराव जमिनीवर कोसळले.

जेव्हा त्यांना जाग आली तेव्हा ते मुंबईच्या, आपल्यासाठी दिलेल्या प्रशस्त बंगल्यात असल्याचे त्यांच्या लक्षात आले. एक-दोन दिवसांतच पुन्हा त्यांची प्रकृती सुधारली.

त्यांना भेटण्यासाठी निर्माते व दिग्दर्शक स्वत: जातीने आले, पण दिग्दर्शक एका पायाने लंगडत होते आणि निर्मात्यांनी आपला मोडका हात बांधून गळ्यात बँडेजने अडकवला होता. अंगभर सगळ्या बँडेजच्या पांढऱ्या चिकटपट्टया चिकटवल्यामुळे त्या दोघांचे ध्यान मोठे सुरेख दिसत होते.

आपण हा देमार–चित्रपट तयार करण्याचा बेत रहित केला असल्याची बातमी मोठ्या दु:खद अंतकरणाने ( मनातल्या मनात दातओठ खात ) तिरसिंगरावांना सांगितली.

एकाएकी चित्रपटाचा बेत या लोकांनी का रहित केला, याचे तिरसिंगरावांना मोठे कोडेच पडले. पण असल्या फालतू गोष्टींवर विचार केलेला त्यांच्या पैलवानी डोक्याला खपत नसे.

निर्मात्याने आपल्या मोडक्या हाताने देऊ केलेले कराराचे अर्धे पैसे तिरसिंगरावांनी मोठ्या उदार अंत:करणाने स्वीकारले, आणि तडक कोल्हापूरला जाण्यासाठी ते डुलत डुलत बोरीबंदर स्टेशनच्या दिशेने चालू लागले !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा. *
अनुक्रम ................ वि ................
क्रमांक ................ नोंद दि ................

# तिरसिंगरावांचा कुस्ती-संग्राम

कृष्णा नदीच्या सुपीक खोऱ्यात वसलेले सुरूपली हे गाव तिरसिंगरावांचे आजोळ. परंतु आज त्या गावी तिरसिंगरावांचा एक दूरच्या नात्यातला मामाच तेवढा राहात होता. त्याचे नाव होते, कोंडिबा देशमुख. एके दिवशी या कोंडिबामामाकडून तिरसिंगरावांना तार येऊन थडकली की, 'जसा असशील तसा सुरूपलीला ये !'

कोल्हापुरातली सगळी कुस्त्यातालमींची कामे तशीच अर्ध्यावर सोडून तिरसिंगराव जसे असतील तसे निघाले आणि तडक एस्. टी. ने सुरूपलीला येऊन पोहोचले.

कोंडिबामामा वाड्यात ओसरीला मुटकाळून बसला होता. तिरसिंगराव हत्तीसारखे डुलत डुलत वाड्यात शिरले, परंतु कोंडिबामामाच्या तोंडून एक नाही की दोन नाही. मग सुंद्रामामीनेच–कोंडिबामामाची बायको–आतून पाण्याचा तांब्या भरून आणून ओसरीशी ठेवला. तिरसिंगरावांनी चौकातल्या दगडावर हातपाय धुतले. पालथ्या पंजाने आपल्या ओलसर मिश्या साफसूफ करीत, दुधाचा अर्धा अधिक तांब्या तरी रिचवला. प्रवासाचा शीण नाहीसा होऊन, थोडीशी हुशारी वाटायला लागली.

मग, मलूल झालेल्या कोंडिबामामाला चुचकारीत तिरसिंगरावच बोलते झाले.

"कसं काय एवढं तांतडीनं बोलावणं केलंत कोंडिबामामा ?"

तरी कोंडिबामामा आपला गप्पच.

मग माजघरात उंबऱ्यामागे उभ्या असलेल्या सुंद्रामामीनेच बोलण्याला तोंड फोडले.

"लगिन काढलंया न्हवं गुणाक्काचं."–गुणाक्का ही कोंडिबामामाची दोन नंबरची लेक होती.

"अरे वा, मग कशाला खोळंबून पडलासा....द्याकी एकदाचा लग्नाचा बार उडवून. चांगल्या कामात मागंफुडं बघायचं नसतंय."

" कसा वार उडवायचा तिरसिंगा...." कोंडिबामामाला शब्द फुटला.

" कुरूपलीच्या त्या तुका मान्याच्या थोरल्या पोराला पोरगी याची ठरली. गूळभात ठरला. देण्याघेण्याचा सगळा व्यवहार निश्चित झाला. मागनं वांदा नको म्हणून हुंड्याच्या पैका, नवऱ्यामुलाचं कापड-चोपड समदं आदीच कुरूपलीला जाऊन तुका मान्याच्या सौद्यानं केलं. आन् ...आन् आता तुळसाबाई अडून पडलिया. "

" कोन तुळसाबाई ? "


" नवऱ्यामुलाची आई. सासूला काय मानपान केल्यालं न्हाई.... इरकली वाणाची दोन जरीची लुगडी अन् काय सोन्याच्या गोठ-पाटल्या करा म्हन्तिया....लग्नाचा खर्च आदीच अब्याच्या सव्वा होऊन बसलाय.... पुन्ना आनि ह्यो कार. "

" तुका मान्या आनि त्यो नवरामुलगा काय म्हन्तोय ? "

" त्ये दोघंबी हाइत की तयार.... पर आईफुडं लेकाचं आन् बायकूफुडं नवऱ्याचं काय चालत न्हाई.... एक तुळसाबाई सगळ्या गावाला भारी हाय. "

गोष्ट खरी होती. गावातली आमदार पुढारी असली बडी धेंडंदेखील तुळसाबाई बोलायला लागली की पायात शेपूट घालायची.

एकदा एक दरोडेखोर चुकून मध्यान्हरातचा तुळसाबाई निजली होती, त्या खोलीत शिरला.... पण तावडीत गावल्यावर त्या दरोडेखोराला तुळसाभवानीनं मुसळानं आणि



लाटण्यानं असं ब-बदडून काढले की एवढा रेड्यासारखा माजलेला तो बापयगडी.... पण दोन्ही हात तोंडावर हाणून जोरजोरात शंख करू लागला.... आसपासची वरीच माणसं गोळा झाली तेव्हा कुठं त्या बापड्याची तुळसाबाईसारख्या चवताळलेल्या वाघिणीच्या तावडीतून सुटका झाली.

रानातल्या वस्तीवर एकदा एक कोल्हा गुपचूप शेळीची दोन कोवळी करडं पळवायला म्हणून खोपीत शिरला.... पण मागच्या बाजूनं जाऊन या हुमदांडग्या तुळसाबाईनं त्या कोल्ह्याच्या पेकाटात अशी एक बाकूकन सणसणीत लाथ हाणली की, कोल्ह्याच्या कमरेच्या हाडाचा सगळा बुकणा उडाला आणि ते कोल्हं तिरपागड होऊन खेपड्यात जाऊन पडलं. क्षणार्धात त्याचे डोळेच पांढरे झाले.

असली ही तुळसाई. पण तिरसिंगराव अगदी निवांतपणे विचारते झाले.

" हये बगा.... लग्नाचा मुहूर्त कधीचा धरलाय ? "

" आला की दोन रोजांवर. "

" मग लागा तयारीला. वऱ्हाड घेऊन उद्याच कुरूपलीला जायाचं. फुडचं समदं मी बघतो ! "

दुसऱ्या दिवशी सगळे वऱ्हाड कुरूपलीला जायला निघाले. लग्नाचे वऱ्हाड कृष्णेच्या काठापर्यंत पोहोचवायला गावातल्या दोनतीन बैलगाडया जोडल्या होत्या व गळ्यातल्या धुंगुरमाळा खुळखुळ घुमवीत दुडक्या चालीने चालल्या होत्या. परंतु आपल्या हातात एक दीड पुरुष उंचीचा लांबलचक भाला घेऊन तिरसिंगराव पायीच त्या गाडयांमागून इतर पुरुष मंडळीबरोबर निघाले होते. कोंडिबामामाच्या आज्या-पणज्याच्या काळापासून त्यांच्या घराण्यात चालत आलेला हा भाला म्हणजे एक मोठी अभिमानाची बाब होती. कोणत्याही शुभ कार्याच्या वेळी किंवा संकटकाळीही हा भाला बरोबर वागविला जाई. त्याचा दाडा म्हणजे एक लांबलचक सळईदार लोखंडी गज होता. भाल्याचे पोलादी दुधारी तीक्ष्ण टोक सूर्यप्रकाशात तळपून, किरण परत फेकीत असे.... तिरसिंगरावाच्या हातात तो मोठा भाला शोभून दिसत होता खरा !

वऱ्हाडी मंडळी कृष्णेच्या काठावर तरी एकदाची पोहोचली. परंतु वरती उगमाकडे पुष्कळ पाऊस झाल्यामुळे, कृष्णेस केवढातरी पाण्याचा पूर आला होता. तांबडेलाल पाण्याचे अजस्र लोट फेसाळत उसळत रोंरों करीत वाहात होते. नदीच्या पलीकडच्या

किनाऱ्यावर कुरूपलीच्या अंगाला काठाशी टेकून उभ्या असलेल्या नावा, पाण्याच्या प्रवाहात घालून अलीकडल्या अंगाला आणणेदेखील अशक्य होते. म्हणून पुराला थोडा उतार लागेपर्यंत लग्नाच्या वऱ्हाडाला काठावर थांबून राहण्यापलीकडे गत्यंतर नव्हते.

सगळे वऱ्हाडी नदीच्या काठाशी पुरापासून काही अंतर राखून जमिनीवर उतरले. जिकडेतिकडे ओल पसरली होती आणि गुडघाभर उंचीच्या गवताचे रान माजले होते. त्यातल्या त्यात एक ऐसपैस पसरलेला खडक बघून सगळीचजण त्या खडकावर विसावली ........बरोबर पुष्कळ सामानसुमान आणले होते. सर्वांच्यासाठी चहा करावा असा बेत ठरला. पाण्याच्या प्रवाहात, परंतु नदीच्या अगदी काठाशी आणखी एक लहानसा काळाकरंद, ऐसपैस खडक पसरला होता. गुणाक्का आणि सुंद्रामामी लगबगीने त्या खडकावर पोहोचली. तीन दगडांची चूल मांडून, त्यात बरोबर आणलेल्या वाळलेल्या फोडीव लाकडाचे फाटे घातले, सापडतील तिथून इकडल्या तिकडल्या नदीच्या काठावरच्या काटक्या-कुटक्या गोळा करून त्याही चुलीत कोंबल्या. ढणाढणा जाळ पेटवला. त्यावर चहाच्या आधणाचे पातेले चढवले. गुणाक्का त्या चुलीकडे नि चुलीतल्या जाळाकडे लक्ष ठेवून होती. सुंद्रामामी चहाची पूड, दुधाची चरवी घेऊन जायला म्हणून इकडे सामानसुमान काढून ठेवलेल्या माणसांच्या घोळक्याकडल्या जागेकडे आली. तेवढ्यात चुलवण पेटलेला नि गुणाक्का बसलेला तो उतरणीचा खडक जागचा हालला आणि गतीने पाण्यात महापुराच्या दिशेने सरकू लागला.



गुणाक्का बावचळून, गोंधळून आक्रोश करू लागली. खडकासह आपली वयातली लग्नाची मुलगी महापुरात वाहत चालली आहे, हे दृश्य पाहताच सुंद्रामामीचे—आईचे आतडे कळवळले आणि ती पिसाटपणे पोरीच्या दिशेने पाण्याकडे झेपावू लागली. जवळपासच्या आयाबायांनी तिला घेरून धरून ठेवले. माणसे थिजल्यासारखी होऊन हा सारा चमत्कार पाहात होती. पलीकडच्या काठावरून नावेतले नावाडी हातवारे करून आरडाओरडा करीत काहीबाही सांगू लागले....

क्षणार्धात तिरसिंगरावांनी धोतराचा काचा मारला. अंगातली पैरण काढून बाजूला फेकली आणि उघड्या बंब अंगाने हातातल्या लांबफेक भाल्यासकट महापुरात उडी घेतली. पाणी कापीत ते वेगाने गुणाक्काच्या दिशेने सरकत निघाले. चुलवण मांडण्यासाठी उपयोगात आणलेला तो लहानसा उतरणीचा खडक म्हणजे, महापुराबरोबर वाहात काठाशी लागलेले एक प्रचंड कासव होते, आणि कदाचित आता ते बिचकल्याने पाण्याच्या प्रवाहात घुसू पाहात होते.

गुणाक्काला वाचवण्यासाठी तिरसिंगराव अगदी जवळजवळ येऊन पोहोचले. पण तेवढ्यात त्या कासवाने पाण्यात बुडी मारली. वरची तीन दगडांची चुलवण, त्यातले जळते लाकूडफाटे, आधणाचे पातेले....सगळेच कृष्णेत समर्पण झाले. बुडता-बुडता कशीबशी गुणक्का अधांतरी होऊन पाण्यावर तरंगू लागली. गुणाक्काला पाण्यात पोहता येत नव्हते असातला भाग नव्हता. परंतु अचानकपणे अंगावर कोसळलेल्या या संकटाने आणि कृष्णेच्या महापुरात गवसल्याने तिची त्रेधा उडाली.

एक-दोनदा तिने पाण्यात गटांगळ्या खाल्ल्या. परंतु प्रसंगावधान राखून तिरसिंग-राव पुढे सरले आणि त्यांनी आपल्या हातातल्या भाल्याच्या एका बाजूचा तिला आधार दिला. त्या भाल्याचा दांडा गच्च हातात धरून, ती कशीबशी पाण्याच्या प्रवाहावर तरंगू लागली. थैमान घालीत निघालेला तो कृष्णेचा महापूर कापीत आणि बरोबर गुणा-क्काला भाल्याच्या आधाराने प्रवाहावरच तरंगत ठेवून पुढेपुढे जाण्यात तिरसिंगरावांनी आपले पोहण्याचे सारे कसब पणाला लावले होते.


महापुराची अर्धी अधिक मधली धार कापली गेली होती. त्यामुळे परत फिरण्यापेक्षा गुणाक्काला घेऊन, पलीकडे कुरूपलीच्या अंगाला नदीचा काठ गाठणे अधिक सोयीस्कर ठरले असते.

मधली धार तरी एकदाची पार झाली. काठ जवळ येत चालला. परंतु तेवढ्यात काठावर कड्यासारख्या तुटलेल्या एका भागावर बाभळीचे गर्द बन वाढले होते आणि

अनुक्रम ............ वें............

त्यांच्या फांद्या सगळ्या पाण्याच्या प्रवाहावर झुकल्या होत्या. त्या अंगाने दोन मोठे गोल गरगरीत वाटोळे डोळे तिरसिंगराव नि गुणाक्कावर रोखले गेले. प्रथम ते डोळे आहेत हे, पाण्याच्या तांबडसरपणात लक्षातही आले नाही. परंतु मग करवतीसारखा आपला अक्राळविक्राळ जबडा पसरून, एक सुसर वेगाने तिरसिंगरावांच्या दिशेने झेपावू लागली ! प्रथम तिचा तिरसिंगरावांवरच हल्ला चढवायचा बेत असावा. तेवढ्यात मागल्या अंगाला कोवळ्या लुसलुशीत रक्त-मांसाची दुबळी गोजिरवाणी गुणाक्का पाण्यावर चमकली आणि मग त्या अवाढव्य सुसरीने गुणाक्काच्या दिशेने आपला मोहरा वळवला.

गढूळ पाण्याचे फवारे फेकीत आपल्या वासलेल्या जबड्यात तिने गुणाक्काला अगदी अलगद धरून ठेवले. या ताज्या लुसलुशीत रक्तामासांची शिकार तिला जबड्यात धरून एवढ्यातच रगडायची नसावी. सुसरीच्या जबड्यातून सुटण्यासाठी गुणाक्काने एक निष्फळ केविलवाणी धडपड केली. असहायपणे एक किंकाळी फोडली आणि मग तिरसिंगरावांनी आधारासाठी दिलेल्या भाल्याच्या दांड्यावरची तिची हाताची पकडही सुटली.... गुणाक्काने भाला सोडून देताच, तिरसिंगरावांनी पाण्यातच भाल्यासाठी पवित्रा घेतला. पाण्याखाली सूर घेतला आणि सुसरीच्या पोटाखाली पायालगतच्या मऊसर मांसल बेचक्यात



असा एक खापूकन भाल्याचा प्रहार चढवला की, त्या वेदनेने सुसरीचे अजस्र धूड चळचळा हलले. भाला उपसताच तेवढीच पाण्यातली जागा क्षणभर रक्ताच्या थारोळ्याने तांबडीलाल झाली आणि पुन्हा पाण्यात विरली. परंतु तरीही आपल्या तोंडातल्या भक्ष्यावरची पकड न सुटू देता सुसरीने आपली पोहण्याची गती वाढविली. तिरसिंगराव चपळाईने पुन्हा पुढे घुसले. सुसरीच्या पोटाखाली पायाच्या दुसऱ्या अंगाला दुसऱ्या जांघेत–मऊ भागात सारी शक्ती एकवटून भल्याच्या तीक्ष्ण टोकाने पुन्हा असा एक जोराचा प्रहार चढवला की, त्या वेदनांनी आणि संतापाने बेभान झालेल्या सुसरीने आपल्या तोंडातले भक्ष्य कधीच सोडून दिले व तिरसिंगरावांचा समाचार घेण्यासाठी ती मुसंडी घेऊन मागे फिरली. भाला उपसून तिरसिंगरावांनी त्या सुसरीला झुकांड्या देत पाण्यावर झुकलेल्या त्या बाभळीच्या झाडोऱ्यापर्यंत येऊ दिले आणि मग त्यांच्या दिशेनेच जबडा वासून पुढेपुढे येत असलेल्या सुसरीच्या जबड्यात खोल डोळ्यात अचानकपणे इतक्या जोरात भाला आतवर रुतवला की सुसरीला धड जबडा मिटविणेही अशक्य झाले. गळला लागलेल्या माशासारखी ती सुसर मग असहाय होऊन तडफडू लागली. एका बाभळीच्या झाडाच्या बुंध्याशी वेचक्याचा आधार गावताच तिरसिंगरावांनी भाल्याच्या आपल्या हातातल्या टोकाकडून सुसरीला इतक्या जोरात हिसडा दिला की, बाभळीच्या काटेरी फांद्यांच्या जंजाळात ती अलगद अडकली. शरीराची काही हालचाल करावी तर काटे-सराटे शरीर ओरबाडू लागले. हळूहळू पाणी उताराला लागले आणि खालचा पाण्याचा आधार नाहीसा होऊन सुसर वर बाभळीच्या फांदोऱ्या-झुबक्यात अधांतरी तरंगू लागली. मग काठावरच्या बध्या मंडळींना हटकून तिरसिंगरावांनी नाढण्या, दोरखंड, साखळदंड मागविले. त्यांचे सरकफास टाकून सुसरीला चारी अंगांनी चांगले जखडले आणि चारी बाजूंनी हिसडा देऊन खाली काठावर जमिनीकडे खेचले. सुसरीचे ते जखडलेले धूड धाडदिशी जमिनीवर आदळले आणि आसपासची बघी माणसे सैरावैरा पळाली.

तिरसिंगरावांच्या सुसरीशी चाललेल्या पाण्यातील भीषण संग्रामाची वार्ता कळताच सगळा कुरूपली गाव नदीकाठाशी जमा झाला होता. नावाड्यांनी पाण्यात उड्या घेऊन गुणवक्काला केव्हाच पाण्याबाहेर काठावर घेतले होते. साखळदंड आणि दोरखंडांनी जखडलेली ती सुसर सुटकेसाठी थोडीशी धुसफूस करू पाही, परंतु तिची मात्रा चालत नसे. तिच्या जबड्यात अडकलेला भाला ताकदीने उपसून काढताच भळभळा रक्ताचा ओघळ बाहेर आला.

विस्फारलेल्या नजरांनी लोक टकमक त्या सुसरीकडे व तिरसिंगरावाकडे पाहात होते. तिरसिंगराव मग बोलण्यासाठी उठून उभे राहिले.

" लोकहो, गुणाक्कासारखी मोठ्या पायगुणाची सून या कुरूपली गावाला लाभली ही मोठी भाग्याची गोष्ट मानली पाहिजे. कारण, त्याच कृष्णेच्या महापुरातून वाचून नव्हे तर सुसरीच्या जबड्यातून वाचून ती जिवंतपणे काठाला लागली आहे !

" असली भाग्यलक्ष्मी गावाला लाभली परंतु एका जिवाला एक तसलाच दुसरा जीव बळी म्हणून कृष्णेच्या महापुरात सोडला पाहिजे. "

" बरोबर, कायतरी कोंबडं बकरं सोडा म्हनं कृष्णेच्या पुरात. "— गावकऱ्यांनी दुजोरा दिला.

" कोंबडं नि बकरं बळी देऊन कसं भागेल ? " तिरसिंगरावांनी पुढं बोलायला सुरुवात केली.

" माणसाच्या जिवाला माणसाचा जीवच नदीला अर्पण केला पाहिजे, आणि तोही सुसरीच्या जबड्यात देऊन.... " तेवढ्यात सुसरीने आपला जबडा वासला.

" बोला. आहे का कुणी गावात एखादी अशी बाई, की जी नदीत ढकलली तरी गावाचं काही एक नुकसान होणार नाही. झाला तर उलट फायदाच होईल. जी गावाच्या चांगल्या कार्यात विघ्न आणते. सगळ्या पचक्रोशीची खाष्ट सासू असल्यासारखी वागते आणि माणसाकाणसाचा काही विचार न करता वडावडा बोलते. "

" हाय ! हाय ! "

" कोण ? झटकन् सांगा ? "

" तुळसा.... तुळसाबाई ! "— गर्दीनं तुळसाबाईचं नाव घेताच बायकांच्या घोळक्यात उभी असलेली तुळसाबाई काळजात गाव्गाव् हलायला लागली. ती पळणारच होती पण तेवढ्यात दोघीचौघींनी तिला घट्ट धरून ठेवले.

आता तिरसिंगराव आपल्याला सुसरीच्या तोंडात देऊन, सगळ्या गावाच्या संमतीनं नदीत सोडून देणार, म्हणताच तिला ब्रह्मांड आठवलं व ती हातापाया पडून आक्रोश करू लागली. गयावया करू लागली.

तिरसिंगरावांनी आधी तिच्या तोंडून कबूल करून घेतले की, ती आपल्या पोराच्या लग्नात कोणत्याही कारणासाठी विघ्न आणणार नाही. पूर्वी वागत होती तशी

बेलगामपणे गावकीशी यापुढे वागणार नाही.... आणि मग मिश्किलपणे हसत, मोठ्या उदार मनाने तिला कृष्णेच्या पुरात बळी देण्याचा विचार तिरसिंगरावांनी मागे घेतला.

पुढे तिरसिंगरावांच्या पराक्रमाचे प्रतीक म्हणून, पेंढा भरलेले त्या सुसरीचे अवाढव्य धूड गावच्या ग्रामपंचायतीच्या दर्शनी भागी मोठ्या दिमाखात मिरवीत होते.

दुसऱ्या दिवशी तिरसिंगरावांच्या भीमपराक्रमाबद्दल आधी सगळ्या गावकीतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला आणि मग बँड, ताशे, वाजंत्री आणि लाऊडस्पीकरच्या जल्लोषात गुणाक्काच्या लग्नाचा सगळ्या कुरूपली गावात नुसता धूमधडाका उडाला. त्या विवाहसमारंभात, तीन व्यक्तींनी सगळ्या बऱ्या लोकांच्या नजरा आपल्यावर खिळवून ठेवल्या होत्या. एक गुणाक्का, दुसरा तिचा नवरा आणि तिसरे, माना-पानाचा जरतारी फेटा डोकीवर बांधून सगळ्या लग्नात मिजाशीत इकडून तिकडे डुलत वावरणारे, धावपळ करणारे तिरसिंगराव !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ........ वि ........
क्रमांक ........ नोंद दि. ........

# तिरसिंगराव आणि द्रौपदीवस्त्रहरण

गणेशोत्सोवानिमित्त गावात नाटक होणार होतं. नाटकाचं नाव होतं, 'द्रौपदी-वस्त्रहरण'! अर्जुन, धर्म, दु:शासन, शकुनिमामा.... इतर सगळी पात्रे निश्चित झाली. पण भीमाचा पार्ट कुणाला द्यायचा ?

मागे शिवजयंतीनिमित्त झालेल्या नाटकात, भीमाचं काम करणाऱ्या मेषपात्राला नीट गदादेखील उचलता येत नव्हती. आणि प्रत्यक्ष प्रयोगाच्या वेळी, तावातावाने बोलत असताना त्याच्या मिश्या निसटून खाली जमिनीवर पडल्या ते वेगळंच.

उत्सवसमितीचे उत्साही कार्यकर्ते आणि नाटकाचे दिग्दर्शक पी. पांडुकुमार यांनी आपलं सुपीक डोकं विचारांच्या गिअरमध्ये घातलं, आणि त्यांना अचानकपणे नाव सुचलं: तिरसिंगराव !

बस्स, नाटकात भीमाचं काम करावं तर ते तिरसिंगरावांनी म्हणजे मग पॅडिंग करून, आणि कापसाच्या लाद्या आतून भरून, भीमाला लठ्ठ करण्याची किंवा त्याला मिश्यांचा पुंजका चिकटवण्याची आवश्यकता नाही. तिरसिंगरावांना पंचा नेसवला आणि हातात गदा देऊन, तसंच उघड्या अंगानं आणून रंगमंचमावर उभं केलं की, झाला भीम तयार !

पी. पांडुकुमार आपल्या सर्व सहकाऱ्यांसह पैलवान तिरसिंगराव यांच्याकडे गेले. तिरसिंगराव नुकताच आपला राक्षसी व्यायाम आटोपून, तालमीच्या हौदालगत निवांत दम खात बसले होते.

नाटकात काम करण्याच्या कल्पनेत तिरसिंगरावांना तसं फारसं स्वारस्य वाटलं नाही. परंतु पी. पांडुकुमार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी फारच आग्रह धरला, तेव्हा तिरसिंगरावांना हो म्हणणं भागच पडलं.

मात्र ऐन गणेशोत्सवाच्या मोक्यावर कोल्हापुरात खासबागमैदानावर कुस्त्यांचा मोठा फड भारणार होता, त्याची बहुतेक सर्व जबाबदारी तिरसिंगरावांवरच होती. त्यामुळे रोजच्या रोज नाटकाच्या तालमींना हजर राहणं, तिरसिंगरावांना शक्य नव्हतं.

नाटकात भीमाच्या वाट्याला तसे फारसे संवाद नव्हते. त्यामुळे तालमीच्या वेळी तिरसिंगरावांची अनुपस्थिती चालण्यासारखी होती. तिरसिंगरावांनी नाटकाबाबत मागितलेल्या सर्व सवलती पी. पांडुकुमार यांनी एकदम मान्य केल्या आणि उद्‌घाटनाचा नारळ फुटून, नाटकाच्या तालमी जोरात सुरू झाल्या.

भीमाचं काम प्रत्यक्ष तिरसिंगराव करणार आहेत, असं ऐकल्यावर गावात नाटकाविषयी एक मोठंच कुतूहल आणि उत्सुकता निर्माण झाली.

मध्यंतरी दोन-तीन तालमींना आणि शेवटच्या दिवशी रंगीत तालमीला तेवढे, काही काळ तिरसिंगराव हजर होते.

एका तालमीच्या वेळी, त्यांनी हातातली गदा फिरवता फिरवता चुकीनं नेमकी दिग्दर्शक पी. पांडुकुमार यांच्या टाळक्यात हाणली. सुदैवाने पी. पांडुकुमार यांचे टाळके शाबूत राहिले. परंतु सोन्याचे वेगड बसवून तयार केलेल्या त्या सुंदर गदेचा मात्र बुकणा उडाला !



दुसऱ्या वेळी तावातावाने बोलताना भीमाने दुर्योधनाच्या खांद्यावर इतक्या जोरात थाप ठेवून दिली की, त्या बिचाऱ्या दुर्योधनाच्या खांद्याची हाडे सैल पडून, पुढे तीन दिवस तरी खांद्यावर घट्ट बँडेज बांधूनच त्याला वावरावे लागले !

खरी कमाल झाली ती रंगीन तालमीच्या दिवशी. प्रसंग असा होता. भीम गाडाभर अन्न बकासुर राक्षसासाठी म्हणून घेऊन येतो आणि स्वतःच ते खात बसतो. तेवढ्यात तेथे येऊन पोहोचलेला बकासुर संतापतो आणि भीमाला हाणा-बुकलायला सुरुवात करतो. परंतु भीमाच्या भोजनात काही एक व्यत्यय येत नाही. सर्व गाडाभर अन्न संपल्यावरच, तो ढेकर देत उठतो आणि व्यवस्थित समाचार घ्यायला म्हणून बकासुराकडे वळतो.

नाटकासाठी खास एक छोटासा गाडा तयार केला होता. त्या दिवशी रंगीत तालमी-नंतर नाटकात काम करणाऱ्या सर्व पात्रांना आणि निमंत्रणावरून जमलेल्या सर्व पाहुण्यांना एक छोटीशी पार्टी दिली जाणार होती. म्हणून आंबे, मोसंबी, संत्री, अंजीर यांच्या करंड्या भरून आणल्या होत्या. द्राक्षे, केळी यांचे घड आणले होते. शिवाय चिकू, सिता-फळे, रामफळे हाऱ्यांतून आणली होती. बदाम, काजू, बर्फी, खारका असा सुकामेवाही होता.

रंगीत तालीम अधिक नैसर्गिक वाटावी म्हणून हे सगळे फळफळावळ नि सुका-मेवा हाऱ्या-करंड्यांतून काढून मुद्दाम त्या गाड्यात भरला होता. गाडाही चांगला अर्धा



पाऊण तरी भरून निघाला. झाले, भीमाने म्हणजे तिरसिंगरावांनी तो भरलेला गाडा ओढीत रंगमंचावर आणला आणि ऐसपैस मांडी घालून भीम जेवायला बसला. आंबा, मोसंबी, केळी, द्राक्षे करीत एकेका पदार्थाचा फन्ना उडवायला तिरसिंगरावांनी सुरुवात केली. तेवढ्यात बकासुर आला नि भीमाला पाठीमागून बुकलायला सुरुवात केली.

परंतु भीम शांतपणे रुचकर फळांचा आणि सुक्या मेव्याचा आस्वाद घेत होता. गाड्यातील पदार्थ खरोखरच अर्धे अधिक संपत आले. जमलेली सगळीच मंडळी आणि नाटकातील पात्रेदेखील अस्वस्थ, बेचैन झाली. दिग्दर्शक पी. पांडुकुमार तर रागारागाने स्वतःचे केस उपटू लागले. सूचना, इशारे वगैरे करून बघितले, परंतु भीमाचे तिकडे लक्ष होतेच कुठे ? तो खाण्यात मग्न. गाड्यात काही लागिरलेले आंबे आणि चिरडलेले चिकू–द्राक्षे तेवढे फक्त शिल्लक राहिले. तेव्हा कुठे भीमाने आपला हात आवरता घेतला.

भीमाचे ते खरोखरच भयंकर खाणे बघितल्यावर बकासुराचे डोळेच पांढरे व्हायची वेळ आली....आणि पुढे आता याच महाकाय भीमाकडून आपली कणिक तिंबली जाणार हे लक्षात येताच त्या लुकड्या बकासुराने, भीम जेवून उठण्याआधीच सूंबाल्या केला !

तिरसिंगराव तृप्त होऊन अगदी गरगरीत ढेकर देत होते. परंतु बाकीची मंडळी मात्र मनोमन तिरसिंगरावांवर चडफडत, एकेक कप चहावरच समाधान मानून जागची उठली.

दिग्दर्शक पी. पांडुकुमार यांनी मग मोठ्या चातुर्याने या गाडाभर अन्न खाण्याच्या प्रसंगालाच पुढच्या उत्सवाच्या वेळी होणार असलेल्या प्रयोगातून चाट मारली.

ऐन नाटकाचा दिवस उगवला.

पी. पांडुकुमार यांना शंका वाटत होती. परंतु दुपारच्या खासबाग मैदानातल्या सगळ्या कुस्त्या आटोपून तिरसिंगराव नाटकात काम करायला अगदी वेळेवर ग्रीन रूम-मध्ये हजर झाले. पी. पांडुकुमार यांचा जीव भांड्यात पडला.

तिरसिंगरावांना सर्व मेकअप करण्यात आला. कानांत कर्णकुंडले, डोक्यावर सोनेरी मुकुट, कपाळी चंद्रकोरी, दंडात सोनेरी कडे. उत्तरीय वस्त्र म्हणून पंचा. तिरसिंगराव जेव्हा मिश्यांना पीळ भरीत, खांद्यावर गदा घेऊन रुबाबात भीमाच्या वेषात

रंगमंचावर प्रवेश करते झाले तेव्हा प्रेक्षागृहातून शिट्यांचा नि टाळ्यांचा जल्लोष उडाला. कुणी अती उत्साहाच्या भरात आपल्या डोक्यावरील रंगीबेरंगी पटके हवेत उडवले. बलदंड देहाचा आणि पिळदार स्नायूंचा तो बुलंद भीम बघितल्यावर प्रेक्षक अगदी बेहद्द खूष होऊन गेले. त्या भीमापुढे इतर रंगरंगोटी केलेली कौरव-पांडवांची आषुक-माषुक पात्रे म्हणजे निव्वळ काडीपैलवान वाटत होती. आणि भीमाच्या वेषात तिरसिंगराव सगळ्या स्टेजवर दिमाखात वावरू लागले की, अंग चोरून कुठल्या तरी कोपऱ्यात सगळे उभे राहात होते.

तिरसिंगरावांना काही आपले सगळे संवाद पाठ नव्हते. त्यामुळे प्रसंगी ते आपल्या मनानेच काही वाक्ये उत्स्फूर्त रीत्या बोलून जात. नाटकाची रंगत वाढू लागली तसतसे भीमाच्या भूमिकेशी तिरसिंगराव अधिकाधिक एकरूप होत, रंगत गेले.

शकुनिमामाचा कपटीपणा, दुर्योधनाचा हट्टी, दुराग्रही स्वभाव, दु:शासनाची नीच अधम वृत्ती. यामुळे दुष्ट कौरवांविषयी प्रेक्षक मनोमन खवळून उठले आणि तिरसिंगरावही !

नाटकातील द्यूताचा डाव अगदी रंगात आला होता. शकुनिमामाच्या कपटी खेळापुढे काही एक गती न चालून, पांडवांचा थोरला भाऊ धर्म, आपली धनदौलत, आपलं सिंहासन, आपलं राज्य.... पणाला लावून एकेक करीत, सर्वस्व गमावून बसला.

" हा ! हा ! हा ! "– आपल्या आसुरी यशाने धुंद झालेला शकुनिमामा विकट हास्य करून बोलला,

" धर्मराजा, हरलास का सर्वस्व. मग लाव. तुझी बायकोच लाव पणाला आणि खेळ पुढं ! "

" आरं ए शकुनिमामा नीट तोंड संभाळून बोल, नाहीतर तुझी जीभच हासडून हातात दीन. तुझा कपटाचा खेळ कळत नाही का काय आमास्नी ? आता करून तर बघ खेळात लबाडी; माझ्याशीच गाठ हाय. "– खरं म्हणजे मूळ नाटकात ही वाक्ये नव्हती, परंतु भीमाचं काम करणाऱ्या तिरसिंगरावांनी शकुनिमामाला पद्धतशीर दम भरला. शकुनिमामा तसा मनोमन जरा हबकलाच !

परंतु पुढे नाटकातील कथानकाप्रमाणे, शकुनिमामाने दुर्योधनाशी संगनमत करून पुन्हा कपटाचा खेळ खेळलाच आणि धर्मराजाने पणाला लावलेल्या द्रौपदीला कौरवांना जिंकून दिले. कौरवांचा दरबार भरला. दु:शासनाने द्रौपदीचे केस धरले आणि

तिला फराफरा ओढीत कौरवांच्या दरबारात आणून तिची विटंबना चालविली.

"अहो, थांबा! थांबा!" –पण भीम कसला थांबतो? तो एकदम जागचा उठला. एका फटकाऱ्यासरशी त्याने दु:शासनाचा मुकुट हवेत उडवला आणि—

"ओय! ओय!"–दुशासनाचे केस धरून त्याला फरफटत रंगमंचाच्या दुसऱ्या टोकापर्यंत नेले! दु:शासनाला कुठून द्रौपदीच्या केसांना हात लावला, अशी अद्दल घडली.

यानंतर म्हणजे प्रत्यक्ष द्रौपदी वस्त्रहरणाचा प्रसंग. दु:शासन एक एक करीत द्रौपदीच्या वस्त्रहरणास सुरुवात करतो आणि द्रौपदी श्रीकृष्णाचा धावा करते. दु:शासनाची काही आता द्रौपदीच्या वस्त्रांना हात लावण्याची हिंमत होत नव्हती.... परंतु मग नाटकाचं काय? तेव्हा मग मनाचा हिय्या करून दु:शासन पुढे झाला. एक डोळा तिरसिंगरावावर आणि दुसरा डोळा द्रौपदीवर ठेवून, 'हा! हा! हा!'–असे बळेबळेच विकट हास्य करीत, त्याने द्रौपदीचे वस्त्र ओढून फराफरा फेडण्यास सुरुवात केली.

"कृष्णा धाव! धाव!"–द्रौपदीचा कृष्णासाठी धावा सुरू झाला. पांडवांमध्ये थांबलेल्या भीमाला जवळजवळ सर्वांनीच घट्ट दाबून धरले होते.



परंतु व्हायचा तो घात झालाच. भीमाने पांडवांच्या कडयातून सुटून चित्यासारखी झेप घेतली....ती थेट दु:शासनाच्या मानगुटीवरच. थोड्याच झटापटीत दु:शासन भुई-सपाट झाला. भीमाला आता जणू खूनच चढला होता. द्रौपदीवस्त्रहरणाचा हा प्रसंग मोठ्या चवीने पाहात सिंहासनावर बसलेल्या दुर्योधनाला, भीमाने त्याच्या सिंहासनासकट वर हवेत उचलले आणि रंगमंचाबाहेर फेकून दिले. शकुनिमामा भीमाच्या 'तडाख्यातून सुटून उंदरासारखा पळून जाण्याच्या बेतात होता. पण भीमाने झटकन् त्याची दाढीच पकडली. जन्मभर केलेल्या कपटकारस्थानांची आठवण शकुनिमामाला भीमाने क्षणार्धात करून दिली. दोन असे झणझणीत तडाखे ठेवून दिले की, शकुनिमामाच्या डोळ्यांपुढे काजवेच चमकले....पण तेवढ्यात खस्दिशी हिसडा मारल्याने शकुनिमामाची दाढीच तेवढी भीमाच्या हातात राहिली आणि शकुनिमामा जीव घेऊन पसार झाला. मग भीमाने रंगमंचावर हाताला लागेल त्या कौरवाला पकडून हाणायला नि बुकलायला सुरुवात केली. पांडवांपैकी अर्जुन, धर्म भीमाला आवरायला व हा सर्व गोंधळ थांबवायला म्हणून पुढे धावले....परंतु इतरांच्या बरोबर त्यांनाही थोडासा भीमाच्या हातचा प्रसाद खाऊन, माघार घ्यावी लागली. नाटकात कामे करणारी सगळीच पात्रे मग जीव बचावून सापडेल त्या वाटेने, बारा वाटा, पाय लावून पळत सुटली.

नाटकाचे काही का होईना परंतु भीमाचे ते अफाट शरीर आणि त्याचा तो बेफाट पराक्रम पाहून, प्रेक्षकांनी खुष होऊन टाळ्या, शिट्या आणि भीमाच्या नावाच्या जयजयकारानं, सगळं प्रेक्षागृह दणाणून सोडलं !

वास्तविक द्रौपदीला भीमापासून काहीच भीती नव्हती. परंतु द्रौपदीचं काम करणारा एका गुजराथी शेटजीचा मुलगा....पार त्याची भीतीनं गाळण उडाली. आणि—

"मोरो बाप ! भागो ! भागो !" म्हणून पातळासकट खाली उडी घेऊन, तो द्रौपदीच्या वेषात तसाच रस्त्यानं रात्री पळत सुटला.

इतका वेळ केस उपटत नि हात चोळत ग्रीनरूममध्ये बसलेले पी. पांडुकुमार भीमाला आवरायला रंगमंचावर धावले. परंतु भीमाने घाईघाईने त्यांनाही वर हवेत उचलले आणि खाली प्रेक्षकांत फेकून दिले.

नंतर हे भीममहाराज चांगले गावातल्या मारुतीच्या देवळापर्यंत कौरवांचा पाठलाग करीत धावत होते. पुढे त्यांनी तो नाद सोडला आणि घरी येऊन निवांत झोपी गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी तिरसिंगरावांना जाग आली तेव्हा त्यांची रात्रीच्या नाटकातली त्यांना चढलेली भीमाची धुंदी जवळजवळ उतरली होती.

रात्री तिरसिंगरावांनी केलेल्या अचाट पराक्रमाची कल्पना कुणीतरी त्यांना दिली.

दिग्दर्शक पी. पांडुकुमार यांसकट नाटकातली सर्व पात्रे तिरसिंगरावांनी आपल्यावर विनाकारण केलेल्या अन्यायामुळे सगळीच त्यांच्यावर रुसून फुगून बसली होती. हातीपायी तर एकही धड राहिला नव्हता. कुणाला मुक्का मार बसला होता तर कुणाच्या डोक्यावर टेंगूळ आले होते. गणेशोत्सवातले महत्त्वाचे आणि उत्साही कार्यकर्ते सगळे तेच होते.... आणि आज गणेशविसर्जनाच्या मिरवणुकीला तर त्यांपैकी कुणाचीच यायची तयारी नव्हती.

" अर्रर्र ऽ असं झालंय म्हणता.... " तिरसिंगरावांना एकूण सगळयाच प्रकाराचं मोठंच दुःख आणि खेद वाटला.

" मग चला तर ! "— अंगावर पैरण आणि पायात वहाणा चढवून तिरसिंगराव रामप्रहरीच एक दोघा साथीदारांबरोबर डुलत डुलत घराबाहेर पडले आणि प्रत्येकाच्या अगदी घरोघर जाऊन, कालच्या झाल्या प्रकाराबद्दल मोकळ्या दिलखुलास वृत्तीनं खेद व दिलगिरी व्यक्त करून, समजूत घालून सगळ्यांचा रुसवा-फुगवा त्यांनी पार अगदी कुठल्या कुठे घालवून दिला.

सायंकाळी गणपतिविसर्जनाची मिरवणूक मोठ्या धूमधडाक्यात निघाली. तिरसिंगरावांनी तर काल नाटकात काम केलेल्या सर्व पात्रांना आणि दिग्दर्शक पी. पांडुकुमार यांनादेखील आग्रह करून, मोठ्या रुबाबात गणपतीशेजारी मिरवणुकीच्या गाडीतच बसवलं होतं. अधूनमधून ते स्वतःच ती मिरवणुकीची गाडी ढकलीत होते. ताशा, ढोल, लेझिम, बँड यांचा धडाका उडाला होता. भुईनळे, जमीनचक्रे, फूलबाजे, बाण, फटाके.... अशा शोभेच्या दारूची नुसती आतषबाजी चालली होती आणि सर्वांच्या आवाजांबरोबर आपला आवाज मिसळून तिरसिंगराव मोठ्या आवेशाने आणि उत्साहाने ओरडत होते.

" गणपतिबाप्पा मोऽरऽया ऽऽऽ पुढच्या वर्षी लौकर या ऽऽ ! "

* * *

# तिरसिंगराव आणि कानाचे स्पेशॅलिस्ट

पुण्याच्या डेक्कन जिमखान्यावरील त्या ऐसपैस आणि प्रशस्त मैदानावर झालेली तिरसिंगराव आणि पंजाबचा हिंदकेसरी पैलवान गेंदासिंग यांची निकाली कुस्ती मोठी रंगतदार होऊन गाजली खरी. परंतु कुस्तीत चितपट झाल्यावर गेंदासिंगाने चिडून जाऊन तिरसिंगरावांच्या डाव्या कानशिलावर कुस्ती संपल्यानंतर जो एक जोरदार तडाखा ठेवून दिला त्यामुळे तिरसिंगरावांच्या कानातल्या नाजूक भागाला मोठीच इजा पोहोचली.

सण्कन सपकाऱ्याने तडाखा बसल्यानंतर कान एकदम बधिर झाला. कानात ठणका भरून, सुस्पष्टपणे काही ऐकू येणे मोठे मुश्किल होऊन बसले.

"काय होतंय आपल्याला? सकाळपर्यंत कान अगदी बरा होऊन, आपल्याला अगदी झकासपैकी ऐकायला येऊ लागेल!" — असा आशावादी दृष्टिकोण मनात बाळगून, रात्री तिरसिंगराव आपल्या निवासस्थानी निवांत झोपी गेले.

परंतु दुसऱ्या दिवशी सकाळी कानात म्हणजे अधिकच ठणका भरला. कानाला सूज चढून, बधिरपणाही वाढला आणि एका कानाने आपण अगदी ठार बहिरे होतो की काय, असा संशय उगीच तिरसिंगरावांच्या मनाला चाटून गेला.

दुसऱ्या दिवशी लागलीच तिरसिंगरावांना खरे म्हणजे कोल्हापूरला परत फिरावयाचे होते. परंतु या कानाच्या दुखापतीमुळे त्यांनी तो आपला बेत पुढे ढकलला. एक दोन दिवस पुण्यातलाच मुक्काम वाढवून, अगोदर इथल्या एखाद्या तज्ज्ञ डॉक्टरला दाखवून, आपल्या कानावर औषधोपचार करून घ्यावेत आणि मगच कोल्हापुरला जाण्याचा विचार करावा, असा नवा बेत तिरसिंगरावांना रचावा लागला.

टिळक रोडने हिंडत हिंडत दुसऱ्या दिवशी तिरसिंगराव ज्या डॉक्टरांकडे कान दाखवायला म्हणून गेले, ते डॉक्टर फडकुले इंग्रजी औषधांप्रमाणे आयुर्वेदिक औषधांचेही मोठे तज्ज्ञ निघाले. ॲलोपथी आणि होमिओपथी अशा दोन्ही वैद्यकीय शास्त्रांत आपण मोठे पारंगत आणि तज्ज्ञ आहोत, असा उल्लेख ते वारंवार आपल्या बोलण्यात मोठ्या अभिमानाने करीत.

या दोन्ही शास्त्रांत आणि त्या शास्त्रांतील तज्ज्ञांविषयी तिरसिंगरावांना कसलेच स्वारस्य वाटत नव्हते. कुठून तरी उपचार लागू पडून एकदाचा आपला हा कान तेवढा बरा व्हावा, एवढीच एक चिंता त्यांना पडली होती.

टिळक रोडवरचे ते डॉक्टर फडकुले, आता थोडेसे तसे वृद्धत्वाकडे झुकलेले होते, परंतु त्यांचा कामाचा उरक आणि उत्साह मोठा दांडगा होता. दवाखानेवजा त्यांच्या त्या हॉलचे सारे आवार पेशंटस्नी भरून गेलेले असतानादेखील, कामाचा ताण पडून डॉक्टर कधी गोंधळून, चिडून, कातावून जात नसत. उलट अशा वेळी अगदी कमीत कमी वेळात जास्तीत जास्त पेशंटस्ना तपासून त्यांच्या औषधांचे 'प्रिस्क्रिप्शन्' कागदावर झटपट लिहून देण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यांनी लिहून दिलेल्या यादीप्रमाणे एकदा का त्यांच्या कंपाउंडरने रंगीत औषधाने बाटल्या भरून दिल्या, किंवा एखाद्या औषधाच्या गोळ्यांच्या पुड्या बांधून दिल्या की पेशंट मोकळा होई.


पाच एक मिनिटांहून अधिक काळ काही पेशंटस्ना त्या दवाखान्यात तिष्ठावे लागत नसे. आणि पेशंटच्या दृष्टीने विचार करता ही गोष्ट मोठीच समाधानाची होती !

तिरसिंगरावांनी दवाखान्यात पाऊल टाकताच मोठ्या सुहास्य मुद्रेने डॉक्टरांनी त्यांचे स्वागत केले. बसायला म्हणून विचारपूर्वक एक भक्कम लोखंडी खुर्ची पुढे केली. आपल्या जाड भिंगांच्या चष्म्यातून रोखून पाहात विचारणा केली,

"बोला, काय होतयं?"

"इशेष काय न्हाई. कालच्या कुस्तीत कानाला इथं जरा मार बसलाय. आतनं कानात सारखा ठणका भरलाय. आन् सूज चढून कान बधीर झाल्यागत झालाय...."

"ठीक....ठीक...." तिरसिंगरावांचे बोलणे पुरतेपणी ऐकून घेण्यापूर्वीच डॉक्टर-साहेब घाईघाईने उठले. त्यांनी छोटासा टॉर्च उचलला आणि तितक्याच घाईघाईने तिरसिंगरावांच्या बरोबर आलेल्या व्यक्तीच्या नाकपुड्या चिमट्याने फाकवून बारकाईने आतील निरीक्षण करू लागले.



विनाकारण कामात दिरंगाई करीत बसण्याची वा वेळ दवडण्याची वृत्ती डॉक्टर फडकुले यांच्यात नव्हती !

" आवो डॉक्टरसाहेब, त्यांना न्हवं मला विजा झालयाली हाये. त्ये निस्तं माज्या-बरोबर आल्यात. पेशंट त्ये न्हवंत. मी हाय मी ! "

" तुम्ही पेशंट आहात म्हणता ? आँ ? "– तिरसिंगराव स्वतःच पेशंट आहेत म्हटल्यावर, डॉक्टरांना आश्चर्याने पसरलेला ' आ ' मिटायला तब्बल दीड मिनिटाचा अवधी लागला !

तिरसिंगरावांसारखा माणूस आजारी असेल, यावर ते स्वप्नातदेखील विश्वास ठेवायला तयार झाले नसते. उलट आज तिरसिंगरावांनी प्रथमच जेव्हा त्यांच्या दवाखान्यात पाऊल टाकले आणि डॉक्टरांच्या रोखाने चाल करून जायला सुरुवात केली त्या वेळी एखादे हत्तीचे पिल्लू सर्कशीतून सुटून आपल्या दवाखान्यात घुसले नाही ना ? असा विचार मनात येऊन बसल्या जागी डॉक्टरांना धडकीच भरली होती !

" ठीक ! ठीक ! "–वस्तुस्थितीची जाणीव झाल्यावर डॉक्टरसाहेब घाईघाईने आणि तितक्याच उत्साहाने तिरसिंगरावांकडे वळले. त्यानी द्रुत गतीने तिरसिंगरावांच्या नाकपुडया चिमट्यात धरून वर उचलायचा व फाकायचा प्रयत्न केला तेवढ्यात....

" अहो, डॉक्टरसाहेब, थांबा. नीट ऐकून तरी घ्या. माझ्या नाकात नव्हे कानात इजा झालेली हाय ! कानात ! "

तिरसिंगरावांच्या या उद्गारांनी झटका बसल्याप्रमाणे डॉक्टर पुन्हा खाली जमिनीवर उतरले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय

पुढे केलेला तिरसिंगरावांचा डावा कान पकडून डॉक्टरांनी कानात टॉर्चचा प्रखर झोत सोडला आणि सूक्ष्म रीत्या निरीक्षण करायला सुरुवात केली.

तेवढ्यावरून काही अंदाज बांधता येईना, तेव्हा डॉक्टरांनी तिरसिंगरावांना आपल्या ड्रेसिंगरूममध्ये चलायला सांगितले. ड्रेसिंग रूममध्ये पोहोचल्यावर एकेक करीत डॉक्टरांनी तिरसिंगरावांच्या अंगावरची एकूण एक वस्त्रे उतरवली आणि फक्त लंगोट लावलेले तिरसिंगराव उघड्याबंब अंगाने ड्रेसिंग टेबलावर आडवे झाले.

"पाठ बघू !"

तिरसिंगराव उपडे झाले.

"पोट बघू !"

तिरसिंगराव पुन्हा सवसे होऊन झोपले.

"टम् ! टम् !" डॉक्टरनी तिरसिंगरावांचे पोट वाजवून कानोसा घेऊन बघितले.

"जीभ दाखवा !"


"आ ऽऽऽ !"

"नाका—तोंडाने श्वास घ्या !"

"झुर्रर्र ऽऽ !"

"श्वास सोडा !"

"फुर्रर्र ऽऽ !"



"ठीक आहे. तुमच्या शरीराला बाकी काही एक इजा झालेली नाही. फक्त कानातल्या नाजूक इंद्रियांना मुका मार बसून थोडीशी दुखापत झाली असावी, असे वाटते !" डॉक्टरांनी गंभीरपणे रोगाचे निदान केले.

"अहो, पण मी मगापास्नं त्येच सांगतोय. मला काय सर्दी-पडसं-खोकला-हिवताप काय वी दुखणं झाल्यालं नाही. फक्त कानात ठणका भरलाय अन् त्योबी कालच्या कुस्तीमुळे...." परंतु तिरसिंगरावांना बोलत असताना मध्येच अडवून डॉक्टरनी पुन्हा सूचना केली,

"जरा खोका बघू !"

"खवाक ! खवाक !"

"कार्र, कार्र, कुर्रर्र, कुर्रर्र !"

"आ ? हा कसला खोकण्याचा आवाज ?"

"आवो, ह्यो खोकन्याचा आवाज न्हवं. मी झोपल्याला तुमचा हा ड्रेसिंग टेबल कुरकुरायला लागलाय !"—आता जर आणखी थोडा वेळ तिरसिंगराव या ड्रेसिंग टेबलावर झोपले तर या टेबलाची नेमकी काय 'अवस्था' होईल, याची कल्पना डॉक्टरसाहेबांना आली आणि त्यांनी झटपट आपली तपासणी आटोपती घेउन, तिरसिंगरावांना गडबडीने ड्रेसिंग टेबलावरून खाली जमिनीवर उतरायला सांगितले.

तिरसिंगराव ड्रेसिंग रूममधून बाहेर निघून गेल्यानंतर, मागे रेंगाळत राहिलेल्या डॉक्टरांनी अगोदर आपला तिरसिंगरावांना झोपवलेला ड्रेसिंग टेबल चाचपून बघितला आणि मग तो अद्याप ठाकठीक आहे याची खात्री पटल्यावर त्यांनी समाधानाने सुस्कारा सोडला !

"हे बघा तिरसिंगराव, फारशी काळजी करण्याची आवश्यकता नाही."

ड्रेसिंग रूममधून बाहेर येत डॉक्टरसाहेब तिरसिंगरावांना उद्देशून म्हणाले, "मी काही गोळ्या आणि औषध देतो. त्या दोन दिवस रोज नियमितपणे दिवसातून चार वेळा घ्या; आणि मग दोन दिवसांनी पुन्हा येऊन मला भेटा."

डॉक्टरांनी तिरसिंगरावांच्या कानाचे ड्रेसिंग करून त्यात ड्रॉपरने औषध सोडले. त्यावर कापसाचा बोळा बसवला आणि मग त्यांच्या कंपाऊंडरकडून कसलेसे बाटलीभर रंगीत औषध आणि साबुदाण्यासारख्या गोळ्या पुडीत बांधून घेतल्या. नंतर तिरसिंगराव परत आपल्या निवासस्थानाकडे आले.

डॉक्टर, त्यांची औषधे, आजार, पथ्यपाणी असल्या गोष्टी चुकूनसुद्धा कधी तिर-सिंगरावांच्या वाटेस फिरकत नसत. त्यामुळे या सर्वांची तितकीशी पत्रास त्यांना वाटत नसे.

परंतु या वेळी कानातल्या नाजूक इंद्रियांना झालेल्या इजेमुळे आणि आता त्या दुखापतीने गंभीर स्वरूप धारण केल्यामुळे, त्याकडे दुर्लक्ष करून तिरसिंगरावांना चालण्यासारखे नव्हते.

म्हणून डॉक्टरनी सांगितल्याप्रमाणे पथ्यपाण्यावर राहून तिरसिंगरावांनी वाटलीतले ते रंगीत कडवट–तुरट–आंबट चवीचे औषध आणि साबुदाण्यासारख्या त्या गोळ्या दोन दिवस अगदी नियमितपणे घेतल्या.

परंतु औषधाने काही एक गुण आला नाही, आणि पूर्वीच्याच स्थितीत तिरसिंगराव पुन्हा दोन दिवसांनी डॉक्टरांच्या भेटीला गेले.

औषधाने काही एक उतार पडलेला नाही हे तिरसिंगरावांच्या तोंडून ऐकताच डॉक्टर फडकुले यांचा चेहरा मोठा सचिंत झाला! त्यांनी पुन्हा एकदा तिरसिंगरावांच्या कानाची अगदी बारकाईने तपासणी केली आणि म्हटले,

" हे बघा तिरसिंगराव, मी माझ्या परीनं करता येतील तितके सर्व उपचार तुमच्या कानाच्या बाबतीत केले आहेत. मला वाटते की, तुम्ही आता आपला कान एखाद्या कानाच्या स्पेशॅलिस्टलाच दाखविणं अधिक उत्तम!"

" ठीक हाय. पण कुठल्या कानाच्या स्पेशॅलिस्टाकडं जावं म्हणता?"

" पुण्यात तसे दोन नामांकित कानाचे स्पेशॅलिस्ट आहेत. एक डॉक्टर पंखावाला आणि दुसरे नूरजहॉन नर्सिंग होमचे डॉक्टर झुनझुनवाला. परंतु तुम्ही डॉक्टर पंखावाला यांच्याकडे जाण्याची आवश्यकता नाही. कारण ते विशेषकरून उजव्या कानाचे स्पेशॅलिस्ट आहेत. तुम्ही डाव्या कानाचे स्पेशॅलिस्ट डॉक्टर झुनझुनवाला यांची भेट घ्या. कँपात बंडगार्डनजवळ त्यांचं मोठं हॉस्पिटल आहे. तुम्ही त्यांच्याकडे जा. मी तुम्हाला एक चिठी देतोच."

मग डॉ. फडकुले यांनी डॉ. झुनझुनवाला यांच्यासाठी लिहिलेली चिठी बरोबर घेऊन तिरसिंगराव तडक टॅक्सी करून, कँपात नूरजहॉन नर्सिंग होमवर जाऊन थडकले.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचना
वि....
नोंद दि....
म. ग्रं. सं. ठाणे,

हॉस्पिटलचा जिना चढून जात असताना, त्याच जिन्याने खाली उतरत असलेल्या एका पेशंटला थांबवून, तिरसिंगरावांनी विचारणा केली.

" डॉ. झुनझुनवाला कुठे भेटतील ? "

" आँ ? काय म्हणालात ? कुठचा ट्रॅक्टर ! "

" ट्रॅक्टर नव्हे, डॉक्टर ! डॉक्टऽरऽ ! "—पेशंटने पुढे केलेल्या कानात तिरसिंगरावांनी ओरडून सांगितले.

" हां, हां, डॉक्टर म्हणताय होय ? "—पेशंटने पुन्हा मोठ्या साळसूदपणे विचारायला सुरुवात केली.

" पण कुठले डॉक्टर पाहिजे आहेत तुम्हाला ? "

" डॉक्टर झुनझुनवाला ? "

" आँ ? डॉक्टर टुणटुणवाला ? टुणटुणवाला डॉक्टर कुणीच नाहीत इथं. या हॉस्पिटलचे एक मुख्य आहेत, पण त्यांचं नाव झुनझुनवाला असं आहे. तुम्हाला डॉक्टर झुनझुनवाला यांची भेट घ्यायची असली तर बघा.... "

या अधू झालेल्या कानाच्या पेशंटच्या नादी लागण्यात अधिक काही अर्थ नाही, असे समजून तिरसिंगरावांनी ती चौकशी तेवढ्यावरच थांबवली आणि स्वत:च डॉक्टर झुनझुनवाला यांची केबिन शोधून काढण्यासाठी वर निघाले.

अधिक चौकशी केली असता डॉक्टर झुनझुनवाला हे तिकडे औरंगाबाद भागात फिरतीवर गेले असल्याचे व दोन दिवसांनी परत येणार असल्याची माहिती मिळाली.

डॉक्टर झुनझुनवाला यांचे नूरजहॉन नर्सिंग होमसारखे एवढे मोठे हॉस्पिटल आणि त्यात औषधोपचार करायला चोवीस तास अपुरे पडतील इतके पेशंटस् भरलेले असून-देखील, आठवड्यातून पाच दिवस डॉक्टरसाहेब औरंगाबाद, जळगाव, कोल्हापूर, सातारा, कराड, बेळगाव असे नेहमी ' व्हिजिट 'वर असत आणि उरलेले दोनच दिवस काय ते स्वतःच्या हॉस्पिटलवर हजेरी लावीत.

त्यांच्या गैरहजेरीत त्यांच्या हॉस्पिटलचा सारा औषधोपचार आणि देखभाल ही त्यांच्या हाताखालचे असिस्टंट डॉक्टर्स, नर्सेस व इतर कर्मचारी पाहात. कानाच्या काही लहानसहान ' केसेस ' असतील तर त्या मुळी डॉक्टर झुनझुनवाला यांच्यापर्यंत पोहोचतच नसत. मधल्यामध्ये असिस्टंट डॉक्टर्स अशा ' केसेस 'ची तपासणी करून औषधोपचार देऊन किंवा इंजेक्शन देऊन विल्हेवाट लावीत. तशा काही महत्त्वाच्या ' केसेस ' असल्या तरच त्यांना डॉक्टर झुनझुनवाला यांचा हात लागावयाचा.... डॉक्टर झुनझुनवाला यांच्या देखरेखीखाली औषधोपचार, इंजेक्शन्स् किंवा ऑपरेशन वगैरे केले जावयाचे....

इतरांनी न तपासता डॉक्टर झुनझुनवाला यांनीच आपला कान तपासावा, अशा प्रकारची इच्छा तिरसिंगरावांनी व्यक्त केल्यामुळे, ' दोन दिवसांनंतर ठीक सायंकाळी चार वाजता हॉस्पिटलवर यावे, म्हणजे डॉक्टर झुनझुनवाला यांची भेट घडेल '— अशा प्रकारची सूचना तिरसिंगरावांना मिळाली.

दुसरा काही इलाज नसल्यामुळे, तिरसिंगरावांनी आपला पुण्यातला मुक्काम वाढवला आणि दोन दिवसांनी पुन्हा परत ठीक सायंकाळी चार वाजता नूरजहॉन नर्सिंग होमवर येऊन पोहोचले.

डॉक्टर झुनझुनवाला यांनी तत्परतेने त्यांना एका विशिष्ट काळोख्या खोलीत नेले व डोळे दिपतील अशा प्रखर रंगीबेरंगी प्रकाशझोतात त्यांचा कान तपासायला सुरुवात केली.

बराच वेळपर्यंत सूक्ष्मपणे निरीक्षण केल्यावर, डॉक्टरांनी निष्कर्ष काढला की, अधिक सुस्पष्ट तपासणी करण्यासाठी तिरसिंगरावांच्या कानाचा एक एक्स-रे घेणे आवश्यक आहे. त्यानंतर त्यांच्या कानावर ' ऑपरेशन ' करून एक नवा नाजूक पडदा त्यांच्या कानात बसवण्याची कदाचित आवश्यकता पडेल आणि या पडद्यासाठी नाजूक कातडीही यांच्याच म्हणजे तिरसिंगरावांच्या मांडीवरून कापून घेऊन कानात बसवावी लागेल.

आणि ‘ ऑपरेशन ’ करावयाचे म्हणजे अगोदर दोन दिवस तिरसिंगरावांनी ‘ इन्-डोअर ’ पेशंट म्हणून हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होणे आवश्यक आहे !

अर्थात मुळातच वेडर आणि निधड्या छातीच्या तिरसिंगरावांना यातली कुठलीच बाब विचकून मागे सरकण्यासारखी वाटली नसल्यामुळे, त्यांनी ऑपरेशनला संमती दिली.

दुसऱ्याच दिवशी ते इन्-डोअर पेशंट म्हणून ‘ ॲडमिट ’ झाले. ज्या ‘ सी ’ वार्डात त्यांना ठेवण्यात आले होते, तिथे सगळे कानाचेच पेशंटस् भरलेले होते. पथ्य-पाण्याची घ्यावयाची खबरदारी म्हणून पेशंटला ‘ खाना ’देखील हॉस्पिटलमधूनच घ्यावा लागे.

हॉस्पिटलमध्ये ‘ ॲडमिट ’ होऊन तिरसिंगरावांचे अद्याप दोन दिवसही पुरतेपणी पार पडले नव्हते की, तेवढ्या काळात त्यांनी सगळ्या हॉस्पिटलभर मोठीच धमाल उडवून दिली होती.

पहिल्या दिवशी, पहिल्याच वेळी इतर पेशंटप्रमाणे तिरसिंगरावांना इंजेक्शन देण्यासाठी एक नर्स त्यांच्यापाशी आली आणि त्यांना इंजेक्शन देता देता स्वतःच हैराण झाली. तिरसिंगरावांनी आपला दंड कितीही सैल सोडला आणि त्या नर्सने दातओठ खाऊन कितीही वेळा प्रयत्न केला तरी इंजेक्शनची सुई तिरसिंगरावांच्या पैलवानी दंडात घुसता घुसेना. शेवटी पाचव्या की सातव्या वेळी प्रयत्न केल्यावर एकदाची ती सुई



दंडात घुसली. परंतु त्या वेळी त्या सुईचे पुढचे टोक चांगलेच वाकदार होऊन, मोडायच्या बेताला आले होते !

अशा प्रकारे तिरसिंगरावांना इंजेक्शन द्यावयाचे म्हणजे एक दिव्यच होऊन बसले होते. तिरसिंगरावांना एकदा इंजेक्शन द्यावयाचे झाले तर दोन-चार तरी सुया निकामी होत. शिवाय इंजेक्शन देणाऱ्या डॉक्टरला अगर नर्सला घामाघूम व हैराण झाल्यानंतर स्वतःलाच एक 'शक्तिवर्धक' इंजेक्शन घ्यायची वेळ येई ती वेगळीच !


ड्रेसिंगरूममध्ये कानाचे ड्रेसिंग झाल्यावर तिरसिंगरावांना एकदा स्ट्रेचरवर घालून त्यांच्या वॉर्डाकडे आणण्याचा प्रयत्न एका वॉर्डबॉयने केला. परंतु वॉर्डबॉयचा तो प्रयत्न पहिला आणि शेवटचाच ठरला.

कारण स्ट्रेचर वाहून नेत असता भार न पेलवून एक वॉर्डबॉय तिरपागडा होत, तंगड्या फाकून मट्दिशी खालच्या फरशीवर रुतला आणि शेवटी त्याला स्ट्रेचरवरून वाहून नेण्यासाठी स्वतः तिरसिंगरावांनाच उठून मदत करावी लागली होती !

डॉक्टर झुनझुनवाला यांची ल्युसी नावाची एक अत्यंत आवडती केसाळ ठेंगणीशी नाजूक कुत्री होती. तिला डॉक्टर महाशयांनी इतकी लाडावून ठेवली होती की, ती दिवसभर कुठल्याही वॉर्डातून कशीही हुंदडत फिरत असे. मनात आले तर कुणाच्याही अंथरुणात शिरून ती खुशाल झोपी जाई. लाडिक चाळे करता करता, कुणा पेशंटचे किंवा त्याच्याबरोबर आलेल्या व्यक्तीचे कपडे दातात धरून ओढून फाडायला कमी करीत नसे. एवढेच काय परंतु कुणी पेशंट जेवत असला तर ती खुशाल तेथे जाऊन त्याच्या जेवण्याच्या ताटात तोंड बुडवायला मागे पुढे पाहात नसे. अशा वेळी त्या पेशंटची व त्याच्या सग्यासोयऱ्यांची मोठीच अवघडल्यासारखी स्थिती होई. या लाडूबाई, आगाऊ, नसते चाळे करणाऱ्या कुत्रीला वाकून एक लाथ घालून हाकलून द्यावे, असा संताप येई. परंतु डॉक्टरांच्या भीतीमुळे तसे करण्यास कुणी धजत नसत. डॉक्टरांचे आपल्या या कुत्रीवर फार प्रेम होते ! त्यामुळे उलट डॉ. झुनझुनवाला यांची मर्जी सांभाळण्यासाठी आतल्या आत जळफळत वरून त्या कुत्रीचे तोंडभर कौतुक करण्यापलीकडे पेशंटना गत्यंतर राहात नसे.

परंतु तिरसिंगरावांचा खाक्या वेगळा होता.

एकदा त्या द्वाड कुत्रीने त्यांच्या बिछान्यात घुसायचा प्रयत्न केला असताना, तिरसिंगरावांनी तिला बेधडकपणे लाथेने उडवून लावले होते आणि दुसऱ्या एका वेळी जेव्हा तिने तिरसिंगरावांचे जेवणाचे ताट हुंगून, त्यात तोंड बुडवायचा प्रयत्न केला,



त्या वेळी तिरसिंगरावांनी चक्क उठून त्या मुर्दाड कुत्रीचे दोन्ही कान धरून, सरळ-उचलून खिडकीबाहेर फेकून दिले होते !

खिडकीतून धाप्‌कन खाली जाऊन आपटल्यावर ती कुत्री जवळ जवळ अर्धा तासपर्यंत तरी दुःखाने केकाटत आणि कोकलत होती.

डॉ. झुनझुनवाला यांना झाला प्रकार समजल्यानंतर ते तणतणत व चडफडतच 'सी' वॉर्डापर्यंत आले होते. परंतु समोर तिरसिंगरावांचा अवाढव्य देह बघितल्यानंतर, ते चुपचाप मनातल्या मनात धुसफुसत तसेच परत निघून गेले होते !

दुसऱ्याच दिवशी तिरसिंगरावांच्या कानावर ऑपरेशन व्हावयाचे होते.

ठरल्या वेळी त्यांना ऑपरेशन थिएटरमध्ये आणून ऑपरेशन टेबलवर निजवण्यात आले. थोड्याच वेळात डॉ. झुनझुनवाला तिथे आल्यानंतर, तिरसिंगरावांना ऑपरेशन करण्यासाठी भूल द्यायला सुरुवात झाली.

भूल आणणारे एक कसलेसे उग्र वासाचे औषध त्यांच्या नाकाशी धरण्यात आले.

"एक, दोन, तीऽऽन, चाऽऽर, पा-पा-पाऽऽ–' तिरसिंगराव सांगितल्याप्रमाणे आकडे मोजत होते. इतर डॉक्टर्स, नर्सेस, ड्रेसर व वॉर्डबॉय आदी हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांनी तिरसिंगरावांचे हात-पाय-डोके अगदी घट्ट टेबलाशी चापून धरले होते.

उद्देश हा की, अर्धवट शुद्धी हरपलेल्या अवस्थेत बेभान होऊन तिरसिंगरावांनी काही गैर प्रकार करू नये किंवा भूल दिलेल्या अवस्थेत शस्त्रक्रियेच्या ऐन मोक्याला त्यांच्या भीमकाय देहाने काही अचाट प्रकार करून, गोंधळ माजवू नये.

आकडे मोजता मोजता एकाएकी नकळत आकडे मोजायचे तिरसिंगराव पार विसरले. यापुढील शुद्धी हरपलेल्या काळात नेमके काय घडले याची काही एक कल्पना तिरसिंगरावांना आली नाही.

परंतु जेव्हा ते पूर्णपणे शुद्धीवर आले तेव्हा त्यांनी पाहिले की, ते ऑपरेशन थिएटरमधील ऑपरेशनच्या टेबलावर नसून ' सी ' वॉर्डमधल्या त्यांच्या बेडवरच त्यांना आणून निजवले गेले आहे, आणि व्हावयाचे ते त्यांच्या कानावरचे ऑपरेशनदेखील झालेले नाही ! त्यांच्या बेडभोवती हॉस्पिटलमधील अनेक कर्मचारी तणतणत अस्वस्थपणे उभे आहेत.

या एकूण प्रकाराने तिरसिंगरावांना भलतेच बुचकळ्यात पाडले ! परंतु त्यातल्याच एका कर्मचाऱ्याने कण्हत कण्हत खुलासा केल्यावर कळले की,

तिरसिंगरावांच्या कानावर व्हावयाचे ऑपरेशन रहित केले गेले आहे. याला कारण तिरसिंगरावच !

जसजशी शुद्धी हरपत गेली आणि ऑपरेशनच्या हेतूने डॉ. झुनझुनवाला यांनी एक तीक्ष्ण हत्यार उचलून त्याचा थंडगार स्पर्श तिरसिंगरावांच्या शरीराला करायचा प्रयत्न केला आणि तेवढ्यात बेभान अवस्थेत तिरसिंगराव जोराने उसळी मारून टेबलावर उठून-बसले !

त्यांचे हात-पाय-डोके जामपणे दाबून धरून उभी असलेली मंडळी तीन दिशेला उडून तीन तऱ्हेने कोलमडून पडली. पाय घट्ट दाबून धरून उभा असलेला एक वॉर्डन तीन ताड हवेत उडून पोटॅशियम परमँगनेट टाकलेल्या पाण्याच्या टबमध्ये जाऊन पडला होता. दुसऱ्या एका ड्रेसरने जाऊन सरळ एका कपाटाच्या काचेच्या तावदानाला धडक दिली होती व तावदान फुटून त्याचे अर्धे शरीर कपाटात व अर्धे कपाटाबाहेर असा तो लोंबकळत होता. तिसरी एक नर्स वर हवेत उडून अल्लाद वर छताच्या पंख्यावर जाऊन लटकली होती. औषधांच्या बाटल्यांवर जाऊन कोलमडलेल्या एका असिस्टंट डॉक्टरचा चेहरा आणि कपडे निरनिराळ्या रंगांच्या औषधांनी, रंगपंचमीचा खेळ खेळल्यासारखे रंगून निघाले होते.



परंतु ऑपरेशन टेबलावर उठून बसल्यानंतर तिरसिंगराव तेवढ्यावरच थांबले नव्हते, तर तशाच बेभान अवस्थेतच समोरच उभ्या असलेल्या डॉ. झुनझुनवालांच्या उजव्या कानशिलावर त्यांनी अशी एक सणसणीत भडकावून दिली होती की, डॉक्टर-साहेब हनुमानाप्रमाणे हवेत तरंगत टेबलावरून उडत जाऊन पलीकडे पार दारापाशी जाऊन कोलमडले होते.

आदल्या दिवशीचा तो 'ल्युसी'चा प्रकार आणि आज हा प्रत्यक्ष डॉक्टर साहेबां-वरच तिरसिंगरावांनी ओढवून आणलेला प्रसंग.... डॉक्टरांच्या अंगाचा नुसता तिळपापड झाला.

तिरसिंगरावांच्या कानाचे ऑपरेशन त्यांनी साफ नाकारले आणि तडकाफडकी तिरसिंगरावांना हॉस्पिटलमधून 'डिस्चॉर्ज' देण्याविषयी त्यांनी आपल्या हाताखालच्या डॉक्टरना फर्माविले.

एकूण सर्व हकीकत ऐकल्यानंतर तिची थोडीशी खंत तिरसिंगरावांना वाटली खरी. त्याबद्दल त्यांनी सर्वांची क्षमाही मागितली. परंतु झाल्या प्रकाराबद्दल डॉ. झुनझुनवाला यांचा 'गैरसमज' दूर करून, ऑपरेशनसाठी पुन्हा त्यांची मनधरणी करावी, असे त्यांना मुळीसुद्धा वाटले नाही.

या कानाला झालेल्या एवढ्याशा दुखापतीचे आपण भलतेच लाड आणि भलताच बाऊ करीत आहोत आणि त्यामुळे काय म्हणता काहीतरीच प्रसंग आपल्यावर ओढवून घेत आहोत असे तिरसिंगरावांना वाटले आणि पुढे काय होईल ते होवो, असे म्हणून

त्यांनी आपल्या कानातल्या त्या जखमेचा व मुक्या माराचा विचार करणे पूर्णतया सोडून दिले. हॉस्पिटलमधून 'डिस्चार्ज' मिळताच नेहमीच्याच बेदरकार वृत्तीने ते लागलीच कोल्हापूरला निघून आले.

डॉ. झुनझुनवाला यांचे 'स्पेशॅलिस्ट–ज्ञान' काहीही सांगत असले तरी आश्चर्य म्हणजे कोल्हापूरला परत आल्यावर तिरसिंगरावांच्या कानातली जखम आपोआपच भरून आली. सूज उतरून कानातला ठणका कमी झाला आणि बधिरपणा हळूहळू कमी होत जाऊन, सुस्पष्टपणे ऐकायलाही येऊ लागले ! यासाठी तिरसिंगरावांनी स्वतःहून मुद्दाम म्हणून कानावर काही एक 'इलाज' केले नाहीत. कोल्हापुरातल्या त्यांच्या डॉक्टर मित्रांनी त्यांना जबरदस्तीने दवाखान्यात ओढून एक-दोनदा त्यांचा कान स्वच्छ करून, त्यात औषध घातले होते, काय ते तितकेच !

होय, परंतु इकडे तिरसिंगरावांचा कान कसा बरा झाला याची हकीकत सांगत असताना, तिकडे डॉ. झुनझुनवाला यांच्याविषयी सांगावयाची सगळी घटना अर्धवटच राहून गेली.

ज्या वेळी हॉस्पिटलमधून 'डिस्चार्ज' घेऊन तिरसिंगरावांनी नूरजहाँन नर्सिंग होम सोडले त्याच वेळी तिकडे डॉ. झुनझुनवाला आपल्या केबिनमध्ये उजव्या कानशिलावर हात ठेवून, तिरसिंगरावांच्या नावाने तणतणत बसले होते.

कारण अचानकपणे तिरसिंगरावांच्या हाताचा जबरदस्त तडाखा खाऊन त्यांचा उजवा कान चांगलाच बधिर झाला होता. कानात ठणका भरला होता आणि सूज पण चढत चालली होती.

एकंदरीत थंडपणे विचार केल्यानंतर डॉ. झुनझुनवाला यांनी आपला दुसऱ्या दिवशीचा कऱ्हाड-साताऱ्याचा दौरा रहित केला आणि आपली काळजी वाहण्यासाठी केबिनमध्ये आपल्या जवळच उभे असलेले आपले सहकारी डॉ. गुप्ते यांच्याकडे वळून कण्हत कण्हत डॉ. झुनझुनवाला इंग्रजीत म्हणाले,

"हे बघा, मिस्टर गुप्ते माझ्या उजव्या कानात, आतल्या बाजूला चांगलीच इजा झाली असावी, असे मला वाटते. तुम्ही जरा उजव्या कानाचे स्पेशॅलिस्ट डॉ. पंखावाला यांना फोन करा. त्यांना मी माझाही कान दाखवावा म्हणतो ! त्याशिवाय दुसरा इलाज नाही !"

* * *

# तिरसिंगराव हॉंगकॉंगमध्ये-

त्याला 'रेड ड्रॅगन्' म्हणून सारे जग ओळखीत असे. कम्युनिस्ट चीनमध्ये तर तो एक अजिंक्य कुस्तीगीर आणि मुष्टियोद्धा म्हणून गाजला होता. पाकिस्तानचा पैलवान बैदाअल्ली याच्याशी मैत्रीखातर दिलेल्या लढतीत, त्याने बैदाअल्लीचे पेकाटच मोडून टाकले होते. घानामधल्या एका प्रख्यात निग्रो पैलवानाचा हातच खुब्यातून निखळून काढला होता.

म्हणून जगातली सारी पैलवान मंडळी त्याचा खासगीत चीनचा 'डेंजर-ड्रॅगन्' म्हणून उल्लेख करीत.

अशा या ड्रॅगन्ने कोल्हापूरचे हिंद-केसरी पैलवान तिरसिंगराव यांना कुस्तीचे आव्हान केले.

आणि तिरसिंगरावांनी ते स्वीकारले !

चीन–हिंदच्या लढाईनंतर या दोन राष्ट्रांतून विस्तूदेखील जात नसताना, तिरसिंगरावांची कुस्ती एका महा भयानक चिनी पैलवानाशी ठरली. हॉंगकॉंगमधल्या एका अलिशान स्टेडियमवर, खास बांधून तयार केलेल्या आखाड्यात ही कुस्ती लढवली जाणार होती.

हॉंगकॉंग शहरावरून जाणाऱ्या एका प्रचंड रशियन विमानातून तिरसिंगरावांचा दिल्ली ते हॉंगकॉंग असा प्रवास होणार होता.

ठरलेल्या दिवशी ठरलेल्या वेळी तिरसिंगराव दिल्लीच्या पालम विमानतळावर पोहोचले आणि त्या रशियन विमानात दाखल झाले.

प्रत्यक्ष विमानाच्या उड्डाणाची वेळ येऊन ठेपली आणि विमानातील ऑटोमॅटिक यंत्राकडून धोक्याची सूचना मिळू लागली. विमानाच्या ठरलेल्या कमाल मर्यादेहून अधिक वजन विमानात भरले गेले आहे !

विमान-संचालक, विमानातील परिचारिका आणि इतर विमान अधिकारी यांची एकच धावपळ उडाली. पुन्हा सर्व सामानाची उचकाउचक झाली. वजने-मापे केली गेली. विमानातून प्रवास करीत असलेल्या सर्व प्रवाश्यांची संख्या पुन:पुन्हा मोजली गेली. सामानाचे वजन मर्यादेत होते आणि प्रवासीदेखील आवश्यक तितकेच बसविले होते.


परंतु त्यातल्या त्यात एका चाणाक्ष अधिकाऱ्याचे लक्ष तिरसिंगरावांच्या कडे गेले. आणि तिरसिंगरावांना वजनाच्या काट्यावर उभे राहण्याविषयी अत्यंत विनम्रपणे सूचना केली.

घाम फुटल्याप्रमाणे, वजनाच्या काट्याने गरा–गरा–गरा तीनचार वेढे घेतले. एकूण तीन प्रवाश्यांचे वजन एकट्या तिरसिंगरावांनी खाल्ले होते !

दिलगिरी व्यक्त करून, विमानात बसलेल्या शेवटच्या दोन प्रवाश्यांना उतरविण्यात आले. त्यांची सोय लागलीच पुढच्या विमानाने करण्यात आली, आणि थोड्याच वेळात विमानाने आकाशात झेप घेतली.

तिरसिंगरावांच्या शेजारी बसलेला प्रवासी रशियन होता, आणि तो ताश्कंदचा रहिवासी होता.

ताश्कंदमध्ये आपण लाल बहादूर शास्त्रींना पाहिल्याचे तो मोठ्या कौतुकाने आणि अभिमानाने सांगत होता. चीनविषयी बोलताना तिरस्काराने त्याच्या कपाळावर आठ्या चढत:आणि नाकाचा शेंडा तांबडालाल होई.



अनुक्रम ... वि ... क्रमांक ... नोंद दि ...

त्याला चांगले हिंदी बोलता येत होते, आणि मोडके तोडके मराठीही येते होते. आश्चर्य म्हणजे तिरसिंगरावांची त्याला अगदी खडानूखडा माहिती होती. तिरसिंगरावांना कधीमधी तपकीर ओढायला आणि तंबाखू खायला आवडते, ही त्यांची आवडदेखील त्याला ठाऊक होती.

एकूण त्या रशियन सहप्रवाश्याची तिरसिंगरावांना मोठीच गंमत वाटली आणि हाँगकाँगला पोहोचेपर्यंत त्या दोघांची अगदी गट्टीच जमली.

हाँगकाँगमध्ये एकमेकांचा निरोप घेण्यापूर्वी चहा घेण्यासाठी म्हणून दोघेही एका हॉटेलमध्ये शिरले.

रिझर्व बॉक्समध्ये बसून चहा घेता घेता त्या रशियन मित्राने खिशातून एक कागद बाहेर काढला आणि त्यावर हिंदीमध्ये काहीबाही लिहून तो कागद तिरसिंगरावांसमोर

---

कुस्तीसाठी म्हणून हाँगकाँगमध्ये आलेल्या तिरसिंगरावांचा खून होणार होता. आणि तोही हाँगकाँगमध्ये शाखा असलेल्या चीनच्या पाताळयंत्री गुप्त हेरखात्याकडून.

कारण....

कारण उघड होते. जर का यदाकदाचित रेडड्रॅगनचा तिरसिंगरावांच्या हातून पराभव झाला असता तर जगभर चीनची नाचक्की झाली असती.

आणि म्हणून काही भाडोत्री बदमाषांच्या साहाय्याने तिरसिंगरावांचा खून करावयाचा किंवा त्यांच्या अन्नातून विषबाधा करून, त्यांची ताकद खच्ची करायची, अशी चिनी हेरखात्याची योजना होती.

घडीभराच्या प्रवासात दोस्त बनलेला तो सहप्रवासी म्हणजे दुसरा तिसरा कुणी नसून, एक प्रख्यात रशियन गुप्तहेर होता.

तिरसिंगरावांनी ती महत्त्वाची चिठ्ठी संपूर्णपणे वाचल्यावर, रशियनाने तो कागद आपल्या लायटरवर धरून जाळून टाकला.

तिरसिंगरावांनी मंद स्मित करून, अत्यंत कृतज्ञतापूर्वक त्या रशियन मित्राचा निरोप घेतला.

विमानतळाबाहेर येऊन ते आपल्याला नेण्यासाठी येणार असलेल्या भारतीय वकिलातीच्या गाडीची वाट पाहू लागले.

परंतु त्यांना फार वेळ तिष्ठत उभे राहावे लागले नाही.

एक चकचकीत निळी मासोळीसारखी गाडी येऊन करकरतच त्यांच्या समोर उभी राहिली. पांढराशुभ्र गणवेष चढविलेला त्या गाडीचा डायव्हर झटपट गाडीतून खाली उतरला आणि त्याने मोठ्या दरबारी थाटाने तिरसिंगरावांना लवून कुर्निसात केला.

आपण भारतीय वकिलातीच्या आज्ञेप्रमाणे तिरसिंगरावांना नेण्यासाठी आलो आहोत, हेही त्याने मोठ्या आदबीने तिरसिंगरावांना सांगितले.

ती आदब आणि तो मुजरा स्वीकारीत तिरसिंगराव त्या आलिशान गाडीत चढले तेव्हा गाडीत फ्रंटसीटवर आणखी एक व्यक्ती बसली होती.

आपण भारतीय वकिलातीतील एक अधिकारी असल्याचा परिचय त्या व्यक्तीने तिरसिंगरावांना करून दिला.

पोषाख आणि बोलण्याची ढबही जरी त्या अनोळखी व्यक्तीने बेमालूम भारतीय चठवली असली तरी शरीरकांतीचा पिवळेपणा आणि डोळ्यांचा बटबटीतपणा लपत नव्हता.

आपल्या मनातला संशय आपल्या चेहऱ्यावर दिसू न देता अगदी बेफिकीर वृत्तीने तिरसिंगराव गाडीत मागच्या सीटवर विराजमान झाले.

वळण घेऊन गाडी क्षणार्धात वाऱ्याच्या गतीने निघाली. द्रुत गतीने धावणाऱ्या फुलांच्या गर्द बिछायतीवर पहुडल्याप्रमाणे तिरसिंगरावांना वाटत होते.

परंतु हमरस्ता सोडून गाडी लौकरच एका आडवाटेला गर्द जंगलात घुसली, आणि निर्मनुष्य झाडाझुडपाच्या आडोशाला गपकन उभी राहिली.

फ्रंटसीटवर बसलेला तो पिवळा इसम, त्याने खिशातून एक सिगरेट आणि लायटर बाहेर काढला. लायटरच्या एका टोकावर ओठावरची सिगरेट पेटली खरी....पण दुसऱ्या टोकातून लखखकन् बाहेर आलेले चाकूचे तीक्ष्ण पाते तिरसिंगरावांच्या रोखाने आपली धार चमकवू लागले.

"ये बगा, मिस्टर तिरसिंगराव, तुमाला आता गप्गुमान आमचेबरोबर आमची बॉसकडे यावा लागेल. मदी काय गडवड केला तर ये चाकू तुमचा ठीक बंदोबस्त करीळ....काय समजलेत?"

परंतु तिरसिंगराव काही एक समजले नाहीत.

चाकूच्या पात्याकडून धरून, शांतपणे तो लायटर तिरसिंगरावांनी आपल्या हातात काढून घेतला. एकदा त्याचे चौफेर निरीक्षण केले. मग कुठलीशी कळ नकळत तिरसिंग-रावांच्या हातून दाबली जाताच, ते चाकूचे पाते लपकन हलले आणि लायटरमध्ये

कुठल्याकुठे लुप्त झाले. तिरसिंगरावांनी ती लायटर उचलून तसाच त्या पिवळ्या इसमाच्या कोटाच्या वरच्या खिशात टाकला. मघापासून मनाला बोचणाऱ्या, त्याच्या बाकदार नाकाला त्यांनी हात लावला. हाताला नाकाचा रबरी स्पर्श जाणवला, आणि जरा हिसडा मारताच ते बाकदार कृत्रिम रबरी नाक निसटून तिरसिंगरावांच्या हातात आले.

आतल्या खऱ्या पिवळ्या बसक्या नाकाकडे पाहात, तिरसिंगरावांनी मग तो रबरी नाकाचा भाग त्या पिवळ्या इसमाला साभार परत केला आणि ते गुरगुरले,

" ये देखो, अबसे ऐसा स्वांग मत खेलो. हम भी तुम्हारे बॉसकोच मिलना मंगताय्. गाडी जरा जल्दी चलाव. "

एव्हानापर्यंत म्हणजे त्या पिवळ्या इसमाला दरदरून घाम फुटला होता. ड्रायव्हर जरा जागी सावरूनच बसला आणि गाडी निघाली.

झाडाझुडपातून वाट काढीत ती पुन्हा हमरस्त्याला लागली. हॅांगकॅांग शहरामधून दिमाखाने धावू लागली, आणि एक मोठे वळण घेऊन लचकत मुरडत जेथे उभी राहिली, त्या ठिकाणी एक चिनी पुस्तकविक्रीचे प्रचंड दुकान होते.

दुकानाची सजावट मोठी आकर्षक होती, आणि दर्शनी भागी काचेपलीकडे माओचे आणि चिनी कम्युनिस्ट पक्षाचे ग्रंथ हारीने लावले होते.

गाडीतून उतरून त्या दोघांच्या पाठोपाठ तिरसिंगरावही पुस्तकाच्या दुकानात शिरले. तो पिवळा इसम काऊंटरवरल्या एका दाढीवाल्याच्या कानात काहीबाही पुटपुटला. तसे त्या दाढीवाल्याने डोळे विस्फारून एकावर तिरसिंगरावांच्या दिशेने बघितले.

आणि मग पुढच्या हालचाली कशा सगळ्या विजेच्या गतीने झाल्या. पुस्तकाच्या दोन कपाटांमधल्या सांदीवजा दिसणाऱ्या दारातून ते सगळेच आतल्या भागात गेले.

चारी दिशा पुस्तकांच्या शेल्फस्नी भरलेली ती खोली म्हणजे विक्रीच्या पुस्तकांच्या साठ्याची खोली असावी असे वाटत होते. जमीन संगमरवरी फरशीची होती. मध्यभागी सुंदर शिसवी फर्निचर अत्यंत कलात्मकरीत्या मांडले होते. जाताजाताच तिथल्या एका आराम-खुर्चीवर तिरसिंगराव ऐसपैस पसरले आणि हॅांगकॅांगमध्ये दुर्मिळ वाटावा असा त्या तिथल्या टिपॉयवरील सुंदर बशीत ठेवलेल्या तंबाखूची चिमूट त्यांनी चोळून तोंडात टकली.

तेवढ्यात त्या दाढीवाल्याने कोपऱ्यातली कुठलीशी गुप्त कळ दाबताच सगळी आखबंद खोलीच विजेच्या पाळण्याप्रमाणे हलली आणि खोल खालच्या अंधारात वेगाने धावू लागली.

दहा एक मिनिटांतच त्या खोलीचा हा प्रवास थांबला. पश्चिमेकडची खोलीची भिंत थोडीशी बाजूला सरकली आणि पलीकडे दिसला तो रंगीबेरंगी प्रकाशाच्या धारांनी न्हाऊन निघालेला झगझगीत आरसेमहाल !

" ये है यहाँका कर्नल....हमारा बॉस ! "

आरसेमहालात शिरताच, समोर उच्चासनावर बसलेल्या एका उग्र राकट चेहऱ्याच्या असामीकडे निर्देश करून कुणीतरी तिरसिंगरावांच्या कानापाशी पुटपुटला.

दाढीवाला घाईगर्दीनेच जरा बॉसला सामोरा गेला आणि कुर्निसात करून त्याने त्याला काहीतरी वर्दी दिली. त्याबरोबर आपला चेहरा अधिकच राकट आणि उग्र करून बॉसने एकवार तिरसिंगरावांना खाल्न वरपर्यंत न्याहाळले, आणि मग तो आपल्या उच्चासनावरून खाली उतरला.

तो खालच्या गुळगुळीत फरशीवर टक् टक् असा बुटांचा आवाज करत अगदी संथगतीने तिरसिंगरावांसमोर येऊन उभा राहिला. मघाशी त्याच्या डाव्या बाजूला खुर्चीवर बसून, त्याच्याशी लडिवाळपणा करणारी ती कुणीशी नखरेल गुलछबू तरुणी त्या बॉस मागोमाग लचकत मुरडत तिरसिंगरावांच्यापर्यंत येऊन पोहोचली. तिने लिपस्टिकच्या कांडीने ओठ लालभडक ताणून रंगविले होते, आणि पापण्यांच्या कडा काजळाने नकोत इतक्या लांबपर्यंत कोरल्या होत्या.

डिवचलेल्या नागिणीप्रमाणे फूत्कार टाकीत, जळफळीत नजरेने तिने एकवार तिरसिंगरावांच्याकडे बघितले. आणि मग बेगुमानपणे काही एक मागचा पुढचा विचार न करता तिने काडदिशी तिरसिंगरावांच्या मुस्कुटात भडकवली.

बहुधा प्रत्येक दुष्मनाला येथे समोर आणल्याबरोबर ती अशीच वागत असावी, आणि तिच्या पाठीशी उभ्या असलेल्या त्या कर्नलचा व त्याच्या बदमाष, अट्टल गुंड अशा साथीदारांच्या सामर्थ्याचा विचार करता, बहुतेक कुणाला मनात असूनही तिच्या या वागणुकीला जशास तसे उत्तर देणेही शक्य होत नसावे.

परंतु आज गाठ तिरसिंगरावांशी होती.

मुस्कटात बसताच क्षणार्धात तिरसिंगरावांनी त्या सटवीच्या पार्श्वभागावर अशी एक सणसणीत लाथ ठेवून दिली की, ती शिष्ट स्त्री फुटबॉलसारखी हवेत उंच उडाली आणि समोरच्या भिंतीशी असलेले काचेचे तावदान फोडून पलीकडे कुठे जाऊन कोसळली. हे निदान तिरसिंगरावांच्या तरी मुळीच लक्षात आले नाही.

झाल्या प्रकाराने आरसे महालातले वातावरण एकदम ताणले गेले. चारी दिशांतून आग ओकणाऱ्या मशिनगन्स तिरसिंगरावांच्या दिशेने रोखल्या गेल्या.

क्रोधाने बॉसच्या मस्तकात भडका उडाला....परंतु तो क्षणभरच. आपल्या क्रोधावर पाणी फिरवून चेहऱ्यावर हसू खेळवीत कर्नल पुढे झाला. त्याने नुसत्या खुणेनेच सगळ्या मशिनगन्सची तोंडे जमिनीकडे वळविली, आणि हस्तांदोलनासाठी हात पुढे करीत तो तिरसिंगरावांना उद्देशून बोलला,

" मिटर तिनशिंगराव....आमी टुमच्या मनापासून स्वागत करत्ये. अंगात सैतानाची ताकद असलेला तुमच्यासारका आदमी जर आमचे दोस्तीत येल, तर आमाला बहुत खुषी होईल ! "

" हुईऽऽक् ! "—तिरसिंगरावांशी केलेले हे हस्तांदोलन कर्नलच्या बोटांना आणि हातातल्या हाडांना थोडे महागातच पडले.

कर्नलने दोस्तीसाठी केलेले हे आवाहन तिरसिंगरावांनी अगदी दिलखुलासपणे स्वीकारले.

तिरसिंगरावांची पोलादी ताकद आणि बेडर धाडसी वृत्ती यांवर कर्नल अगदी बेहद्द खुष झाला होता.

अशा माणसाला ठार मारून वाया न घालवता त्याच्या सामर्थ्याचा आपल्याला काही वापर करून घेता आला तर पाहावा, असा कावेबाज हेतू त्याने मानात योजला होता.

रात्रीच्या जेवणानंतर तिरसिंगरावांना अगदी विश्वासात घेऊन त्याने एक सौदा केला.

एवीतेवी कर्नल आणि त्याच्या साथीदारांची दोस्ती तिरसिंगरावांनी स्वीकारलीच आहे. आता या दोस्तीखातर दोन दिवसांनंतर होणार असलेल्या निकाली कुस्तीत तिरसिंगरावांनी रेड ड्रॅगून या चिनी पैलवानाकडून जाणून बुजून हार खावी आणि त्या बदल्यात मिळणार असलेल्या कुस्तीतील विजयाबद्दलच्या बक्षिसाच्या तिप्पट रक्कम बक्षिसी म्हणून तिरसिंगरावांना चिनी हेरखात्याकडून दिली जावी.

तिरसिंगरावांनी सौदा कबूल केला.

आणि चिनी हेरखात्याच्या हाँगकाँग शाखेचे शाही मेहमान म्हणून दुसऱ्याच दिवसापासून तिरसिंगरावांची मोठी बडदास्त ठेवण्यात आली. चिनी हेरखात्याच्या त्या अलिशान मोटारीतून दिवसभर हाँगकाँग पाहत फिरणे आणि उत्तम प्रकारे चिनी पद्धतीने

शिजवलेल्या कोंबडया चवीने खाणे, यात दुसरा दिवस कसा निघून गेला हे तिरसिंगरावांना समजलेदेखील नाही.

पण तिसऱ्या दिवशी अचानकपणे तिरसिंगराव कर्नलला बोलले,

" हे बघा, तुमची एक गाडी आणि ड्रायव्हर मला बरोबर द्या. येथील भारतीय वकालतीत जाऊन येणे मला आज अत्यंत आवश्यक आहे. " कर्नल अवाक् झाला.

" ज्यायला काय हरकत नाय.... पण ज्यायचा कशासाठी ? "

" विमानातून उतरल्यापासून मी परस्पर तुमच्याकडे आलो आहे. अद्याप माझा पत्ता लागत नाही म्हटल्यावर भारतीय वकालतीत या गोष्टीचा गवगवा होईल आणि मग वृत्तपत्रातूनही त्याची आरडाओरड झाल्याशिवाय राहणार नाही. खबरदारी म्हणून त्या अगोदरच एकदा मी भारतीय वकालतीची भेट घेऊन येतो. माझी राहण्याची व्यवस्था खाजगीत झाल्यामुळे वकालतीने त्याबाबत माझी काळजी करू नये. मी योग्य वेळी कुस्ती-साठी आखाड्यात हजर राहीन वगैरे सांगून येतो. "

तिरसिंगरावांचा हा मुद्दा कर्नलला एकदम पटला, आणि मग तोच शीख ड्रायव्हर व गाडी दिमतीला घेऊन, तिरसिंगराव भारतीय वकालतीकडे निघाले.

वकालतीत पोहोचल्यावर तिरसिंगरावांनी काही विरोधी हालचाली करायचा प्रयत्न केला तर त्यांची आणि स्वत:ची विल्हेवाट कशी लावावी याच्या सूचना आणि त्यासाठी काही घातक सूक्ष्म अस्त्रे ड्रायव्हरच्या हवाली केली होती.

परंतु भारतीय वकालतीत पोहोचल्यावर तिरसिंगराव तिथल्या अधिकाऱ्यांशी अगदी ऐसपैस गप्पा मारून, अगदी डुलत डुलत मोटरीशी परत फिरले.

हाँगकाँगमधला तो प्रचंड स्टेडियम माणसांनी नुसता फुलून निघाला होता. ठरलेल्या वेळी तिरसिंगराव आणि रेड ड्रॅगून मैदानात उतरताच 'हजारो प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

सगळ्या प्रेक्षकवृंदाला मुजरा करून, दोघा महाबलाढ्य पैलवानांनी लढतीसाठी हात मिळविला. मदाने मातलेले दोन बलाढ्य हत्ती एकमेकांना उसळ्या घेऊन भिडावेत तसेच त्या दोन पैलवानांच्या लढतीचे दृश्य दिसत होते.

कदाचित आपल्या हातून हार खाण्याचे तिरसिंगरावांनी मान्य केले आहे, ही गोष्ट रेड ड्रॅगूनलाही माहीत असावी. कारण कुस्ती खेळत असताना त्याच्या वृत्तीत थोडा बेदरकारपणाच दिसत होता; आणि प्रत्यक्ष कुस्ती खेळण्यापेक्षा आपल्या शक्तीचे, डाव-

पेचांचे, प्रदर्शन सगळ्या प्रेक्षकसमूहासमोर करण्यातच तो आपले विशेष श्रम खर्ची घालीत होता.


रेड डूॅगूनचा पवित्रा आक्रमक स्वरूपाचा असला तरी स्वतःचा बचाव करण्यापलीकडे तिरसिंगरावांनी कुठेच आपली ताकद पणाला लावली नाही. त्यामुळे रेड डूॅगूनने पुन:पुन्हा तिरसिंगरावांना मातीत घोळसून घोळसून काढले आणि प्रेक्षकांकडून टाळ्यांवर टाळ्या मिळवल्या.

अशी कुस्ती चांगली पाऊण तास रंगली.

रेड डूॅगूनचा दम फुटायला लागला... आणि आता लौकर एकदाचे तिरसिंगरावांना चितपट करून कुस्ती आटोपती घ्यावी, अशा प्रयत्नाला रेड डूॅगून लागला. दम फुटत चालल्यामुळे त्याच्या नाका–तोंडातून ‘ फास-फुस ’ हवा बाहेर पडत होती.

तिरसिंगरावांनी या साऱ्या गोष्टी मनोमन हेरल्या, आणि एकदम पलट खाल्ली. आतापर्यंत बांध घातल्यासारखी आवरून धरलेली सगळी ताकद पणाला लावली आणि भेंडाळत चाललेल्या रेड डूॅगूनला फेसकून इकडे तिकडे भिरकावून द्यायला सुरुवात केली.

खेळाने अशी पलटी खाताच, सगळा प्रेक्षकवर्ग थक्क होऊन पाहू लागला. परंतु तिरसिंगरावांनी फार वेळ जाऊ दिला नाही. दोन–तीन वेळा रेड डूॅगूनला मैदानात



चितपट मारून त्याला पुरतेपणी हरवल्यानंतर पुन्हा एकदा त्याचे ते हत्तीएवढे धूड वर हवेत उचलले.... आणि आखाड्यालगतच सामान्य वेषात येऊन खुर्च्यांवर बसलेल्या चिनी हेरखात्याच्या त्या कर्नल आणि त्या साथीदारांच्या अंगावर धाडदिशी फेकून दिले.

ते एवढे प्रचंड धूड अंगावर कोसळताच त्या सर्वांचा खुर्च्यांखाली आणि त्या रेड ड्रॅगूनच्या बलदंड शरीराखाली सापडून नुसता बुकणा उडाला.

चिनी हेरखात्याकडून अगोदरच मिळालेली बक्षिसाच्या तिप्पट रक्कम आणि आता रेड ड्रॅगूनला हरवल्यामुळे मिळालेली बक्षिसाची रक्कम खिशात घालून, मिश्यावर ताव देत, मारे ऐटीत तिरसिंगराव जेव्हा विमानाने भारताकडे यायला निघाले, तेव्हा रेड ड्रगून, चिनी हेरखात्याचा कर्नल, मोटरीत तिरसिंगरावांना चाकू दाखविणारा पिवळा इसम, तो दाढीधारी आणि त्यांचे इतर काही खास साथीदार हात, पाय आणि छातीच्या सगळ्या बरगड्या मोडलेल्या अवस्थेत हॉस्पिटलमध्ये विव्हळत चरफडत पडले होते.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ................ दि ...............
क्रमांक ................ नोंद दि ...............

# वीर हनुमान तिरसिंगराव

अशी शुक्राची चांदणी उगवायला, तिरसिंगराव सिद्धनेर्लीच्या गावशिवेजवळ येऊन पोहोचले. तेथून गाव हाकेच्या अंतरावर होता. भवतीभर आंब्या-जांभळीच्या झाडांची गर्दी दाटली होती आणि मध्यभागी मारुतीचे एक प्रशस्त शोभिवंत दगडी देवालय होते. आत गाभाऱ्यात लाल शेंदरी रंगाची मारुतिरायाची केवढीतरी भव्य बांधेसूद मूर्ती उभी होती. नक्षीदार दगडी जाळीने गाभारा चौफेर बंदिस्त होता. एक मोठी दगडी पणती मूर्तीपाशी मिणमिण जळत होती.

बाहेरच्या दगडी ओसरीवर तिरसिंगराव विसाव्याला जरा निवांत बूड टेकून बसले. इकडेतिकडे नजर फिरविताना लक्षात आले की, उजव्या बाजूला दूरवर एका झाडाच्या बुंध्याशी आडोशाला बांधलेले दोन बैल—एक उभा आणि एक बसलेला असा आहे. तिथेच शेजारी एक मोकळी गाडी जमिनीशी लावून ठेवली आहे.

तेवढ्यात देवळातून कसलीतरी खुसपूस ऐकू आली आणि त्यामागोमाग धडाधडा काहीतरी खाली कोसळत गेल्याचा आवाज....तिरसिंगराव तट्कन जागचे उठून उभे राहिले, एका हातातली काठी सावरली. दुसऱ्या हातात विजेरी ( बॅटरी ) पेटवली आणि त्यांनी मंदिरात प्रवेश केला. विजेरीचा झोत देवळात चौफेर फिरविला, परंतु कुठेही कुणाची चाहूल लागत नव्हती.

हां, मात्र मंदिराच्या एका कोपऱ्यात कसलातरी पांढरा ढीग दिसत होता. संथ दमदार पावले टाकीत तिरसिंगराव त्या ढिगापाशी पोहोचले व त्यांनी त्या ढिगाचे मोठ्या बारकाईने निरीक्षण चालविले. मध्यभागी गोदरेजची एक कुलूपबंद जाडजूड तिजोरीवजा पेटी पडली होती, शेजारी पुष्कळसे रंगीबेरंगी तिकिटांचे गठ्ठे पडले होते. भरजरी कपड्यांची तर नुस्ती रास लागली होती. सोनेरी रंगाची गदा होती. बेगड, चांदी,

रंगीबेरंगी कागद चिटकवून सजविलेले धनुष्यबाण होते, जटा होत्या, जिरेटोप होते. सोनेरी-चंदेरी मुकुट, हरिणाजिन, कमंडलू, पायीच्या खडावा होत्या. मिश्या, दाढी नि गंगावने होती. भरजरी शालू, पातळे, केसांचे टोप होते.

आदल्या दिवशी कागलचा उरूस होता आणि म्हणून खास उरुसासाठी तिरसिंगराव आदल्या दिवशी कागलला आले होते. तेवढा कागलचा उरूस करायचा आणि रातोरात पुढे आपल्या आजारी मावशीला भेटण्यासाठी सिद्धनेर्लीला मजल मारावयाची, असा बेत तिरसिंगरावांनी आखला होता. परंतु कागलातल्या त्यांच्या दोस्तमंडळींनी तिरसिंगरावांच्या या बेतावर साफ पाणी फिरविले. रामायण-महाभारतातल्या कथानकावर आधारित नाटके करणारी एक प्रसिद्ध नाटक कंपनी खास उरुसासाठी कागलला आली होती. रामभक्त हनुमानाच्या जीवनावर एक जोरदार नाटकाचा खेळ ती त्या दिवशी करणार होती. तिरसिंगरावांच्या दोस्तांनी मग नाटक पाहण्यासाठी बळेबळेच तिरसिंगरावांना कागलात थांबवून घेतले. नाटकाचा प्रयोग मोठा बहारीचा झाला. खेळ संपला तेव्हा रात्री बारा–एकचा सुमार झाला होता. अशा अपरात्री सिद्धनेर्लीला जायला एस्. टी. कुठली मिळणार ? परंतु झोपा काढून पुढची रात्र वाया घालवण्यापेक्षा पायीच रात्रीत सिद्धनेर्लीपर्यंत आगेकूच करावी....म्हणजे कोल्हापुरासही लौकर परत फिरता येईल. विश्रांती काय परत कोल्हापुरात पोहोचल्यावरही घेता येईल, असा एकूण विचार तिरसिंगरावांनी केला. उरुसासाठी कागलला आलेली काही सिद्धनेर्लीकर गावकरी मंडळीही होती. परंतु अपरात्रीचा पायी प्रवास म्हटल्यावर त्यांतल्या कुणाचीच छाती होईना. मधला भुताटकीचा म्हणून ओळखला जाणारा खडकमाळ, बोराटीचा ओढा, रांजण डोह, पुढची सात मोटेची



पडकी भीषण विहीर....रात्र म्हटल्यावर या सर्वांच्या आठवणीनेच नुसते सिद्धनेर्लीकरांच्या अंगावर शहारे आले आणि मग एका हातात काठी व दुसऱ्या हातात विजेरी घेऊन एकटे तिरसिंगरावच सिद्धनेर्लीच्या वाटेला लागले. वाटेत मध्ये कुठे विसाव्याला न थांबता एका दमात त्यांनी सिद्धनेर्लीची गावशिव गाठली आणि तिथल्या त्या मारुतीच्या देवालयात हा काही वेगळाच प्रकार त्यांच्या दृष्टोप्पत्तीस आला....

थोडा विचार केला तेव्हा तिरसिंगरावांच्या लक्षात आले की, हा सगळा एक चोरीचा मामला होता. चोरी झाली होती ती कागललाच. उरुसाचा मोका साधून....आपण रात्री बघितले होते त्या नाटककंपनीवरच चोरांनी डल्ला मारला होता. एका बैलगाडीत सगळे सामान भरले आणि अधूनमधून पांदीतनं वाट काढीत बघता बघता हे सिद्धनेर्लीजवळचे आडबाजूचे मारुतीचे देऊळ जवळ केले. पहाट होण्यापूर्वी आणखी कुठे तरी 'भोवानी' साधण्यासाठी चोर निघून गेले....लौकरात लौकर आता ते चोर परत फिरण्याची शक्यता होती.

तेवढ्यात तिरसिंगरावांना एक वेगळीच युक्ती सुचली. आपल्या अंगावरची पैरण-धोतर काढून त्यांनी त्या ढिगात फेकली. लंगोटबंद असलेल्या आपल्या उघड्याबंब देहावर, जवळच अगदी बाजूला पडलेला मारुतीचा संपूर्ण वेष त्यांनी त्या कपड्याच्या ढिगातून शोधून अंगावर चढविला. मारुतीचा ताम्रवर्णी मुखवटा, वर ऐटबाज सुवर्णमुकुट, गळ्यांत मोत्यांचा कंठा, पाठीमागे उंचावलेली वाकडी गोंडेबाज शेपूट आणि हातात गदा.... तिरसिंगराव मग थेट देवळाच्या गाभाऱ्यात शिरले आणि मूळ मारुतीची मूर्ती झाकली



जाईल अशा वेगाने व्यवस्थित मारुतीची उभी ' पोज ' घेऊन चोरांची वाट पाहात उभे राहिले.

उंदरासारखे धडधडत चोरटे देवळात शिरले आणि हातातली गाठोडी, डबे नेऊन चाचपडत त्यांनी त्या देवळातल्या कोपऱ्यात रचायला सुरुवात केली. तिरसिंगरावांनी चोरांची संख्या मनोमन जोखली. एकूण पाच जण होते. कोपऱ्यात त्यांची पुन्हा काहीतरी उचकाउचक सुरू झाली.

थोडा वेळ चिडीचिप शांततेत गेला.

आणि मग एक खणखणीत धीरगंभीर आवाज सगळ्या मंदिराच्या आवारात घुमला.

" काय रे ऊकाच्यांनो, काय करतासा तिकडं कोपऱ्यात ? " पाची चोर चमकून एकमेकांच्या चेहऱ्यांकडे संशयाने बघायला लागले.

" कोन रं ? पुंड्या तू बोललास वाटतं ? "

" पुंड्या कशाला बोलतोय....मी बोललो मी...."

" आँ ? "–जिथून आवाज घुमला त्या गाभाऱ्याच्या दिशेने सगळ्यांच्याच एक-टक नजरा रोखल्या. बिचकत बाचकत ते पाचहीजण गाभाऱ्याच्या जवळजवळ पोहोचले आणि पुन्हा पडसाद घुमला.

" थांबा तिथंच. पुढं एक पाऊलदेखील उचलू नका.–" आणि त्याबरोबर मारुतीची शेपूटसुद्धा हलली.

" तोबा....तोबा...."–तसा त्या पाच चोरांचा म्होरक्या गुंड्या पुढे झाला, " आरं परतक्ष मारुतिरायानं अवतार घेतलाय. त्योच बोलतोया....दंडवत घाला दंडवत...." –मग सगळ्यांनी एकसाथ देवाला दंडवत घातलं.

" चांगलं देवाच्या नावानं उरूस करायला गेलासा आणि कागलातनं हयो ' उरूस ' लुटून आणलासा व्हय रं गाडविच्यांनो ! "

–मारुतिरायाची मंत्रवाणी पुन्हा गडगडली.

" कोन्चा ' उरूस ' म्हन्तासा देवा ? " –गुंड्याजवळच उभ्या असलेल्या त्याच्या दुसऱ्या एका साथीदाराने साळसूदपणे विचारले.

तसा देव पुन्हा खवळला.

 मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा. 

अनुक्रम ................ वि ......... नोंद दि.

"कोन्चा 'उरूस' म्हणून पुन्हा आणि वर मलाच विचारतोस....काल रात्री कागलच्या उरुसातली एक सगळी नाटककंपनीच लुटून तुम्ही इथं आणलीत की नाही टोळभैरवांनो?"

"च्या मारी....तुमाला कसं कळलं देवा?"

"आरं ए पुंड्या....गप बस की लेका....परतक्ष मारुतिरायाच त्यो. त्येला कसं कळनार न्हाई? दुनियेतलं समदं काय ते दिव्य दृष्टीनं देव बघू शकतोय....देवा बजरंगा, आगाऊपणानं बोलल्याबद्दल या पुंड्याला क्षमा कर."–पुंड्याच्या वतीने त्यांच्या म्होरक्या गुंड्याने क्षमायाचना केली.

"आणि मघाशी येरवाळीच कुठनं सिद्धनेर्लीतनं लूट मारून आलासा की काय?"

"सिद्धनेर्लीतनं न्हाई देवा. तुमच्यापुढं खोटं आणि कशाला बोलू. बामणीच्या इनामदाराचं घर लुटून आलो. काय बी गावलं न्हाई. दिवाळीचा फराळ भरल्यालं डबं आणि कागलच्या गैबी-पिरासाठी केलेला मलिद्याचा निवेद गावला....त्येच सगळं पळवून आणलं...."

दिवाळीचा फराळ, निवेदाचा मलिदा म्हटल्यावर तिरसिंगरावांच्या तोंडाला पाणी सुटले. रात्री कागलला उरुसाच्या नि नाटकाच्या गडबडीत तसे त्यांचे जेवणही व्यवस्थित झाले नव्हते.

"व्हय रं दिवट्यांनो, एवढं दिवाळीच्या फराळाचं गोडधोड पळवून आणलंसा... आणि मारुतिरायाची काही आठवण ठेवशिला की नाही...."

"व्हय, व्हय देवा, हनुमंता....तुजा निवेद पयला....चलारं धोंड्या, पुंड्या हनुमानाचा निवेद भरा आगुदर ताटातनं...."

नाटकमंडळीची पळवून आणली गेलेली तीन स्टेनलेसची ताटे बाहेर काढून निवेद भरायला सुरुवात झाली....तसा गाभाऱ्यातून मारुतिराया ओरडून म्हणाला,

"काय असंल नसंल ते सगळ्या प्रकारचे पदार्थ ताटांत भरा. बत्तीस बुंदीचं लाडू भरा. चाळीसभर तरी चकल्या, करंज्या आणि आनरसे घाला. पेढं, बर्फी काय पंचवीस पंचवीस तरी भराच...."

मारुतिराया दणक्यात बत्तीस बुंदीचे लाडू खाणार म्हटल्यावर सगळींच 'आ' करून तोंड वासून एकमेकांकडे बघायला लागली.

" लौकर लौकर ताटं घेऊन या रं...." मारुतिरायाने पुन्हा दमबाजी केली.

" न्हाईतर हितनं वळावळा माझी शेपूट सोडली तर तुमची पाची जणांची गठडी वळून वर देवळावर फेकून देईन...." मारुतिराया शेपटीचा 'इंगा' दाखविणार म्हटल्यावर सगळीच जाम टरकली आणि काय असेल नसेल ते सगळे तीन-चार ताटांत भरून त्यांनी भराभरा सगळे गाभाऱ्यात नेऊन ठेवले.

" फराळाचं मिळालं....पण त्यावर मागनं प्यायला पाणी नको व्हय....जावा कुठनं तरी माठ-कळशी भरून पाणी घेऊन या....ये तू गुंड्या-पुंड्या....तुमी दोघंजण पाणी आणायला पळा. "—देवाने पुन्हा हुकूम केला.

तशी गुंड्या-पुंड्या टंगळ-मंगळ करायला लागली.

" देवा, पाणी आणायला काय हरकत नाही....पर हितं जवळपास कुठं विहीर नाही. "

" मग सिद्धनेर्लीतनं पाणी घेऊन या. "

" पण देवा, गावकरी जागं झालं तर आमाला ठोकून काढतील. "

" ठीक आहे....मग आसंच उलट कागलच्या वाटेला लागा आणि सात मोटेच्या विहिरीवरनं पाणी घेऊन या. "

" देवा, ती विहीर लै दूर...."

" आरं तुमच्या, चोऱ्या करायला पाहिजेत आणि माझी कामं करायला नकोत होय...गप गुमान पाण्याला जावा. न्हाईतर पुंड्या, शाप देऊन तुझं माकड करीन आणि गुंड्या तुला लांब कानाचं गाढव बनवीन ! "

बाप रे ! देव शाप देऊन आपले गाढव-माकड करणार म्हटल्यावर गुंड्या-पुंड्या कोपऱ्यातला मातीचा माठ, कळशी उचलून भन्नाट पळत सुटले. उरलेल्या तिघांना देवाने देवळाबाहेर रखवालीस उभे राहण्याची आज्ञा केली....व शिस्तीत आलकट पालकट मांडी घालून, गाभाऱ्यात ऐसपैस बसून फराळाचा एकेक ढीग हाडपायला सुरुवात केली. गुंड्या-पुंड्या पाणी घेऊन आले तेव्हा मारुतिराया ऊर्फ तिरसिंगरावांनी दोन ताटे फस्त करून तिसऱ्या ताटातला शेव-चिवडा आणि शंकर-पाळ्या संपवत आणल्या होत्या. तिसरे फराळाचे ताट साफसूफ करून मारुतिरायाने तो पाण्याचा भरलेला माठच उचलून तोंडाला लावला.... आणि घटाघटा आपली राक्षसी तहान भागवायला सुरुवात केली.

चोरीच्या धावपळीत रात्रभर उपाशी राहिलेले पाची चोरटे मात्र बापडे केविलवाण्या नजरेने टकमक मारुतिरायाकडे, त्याच्या खाण्याच्या उद्योगाकडे पाहात होते.

देवाने एक गरगरीत ढेकर दिला आणि मग पुन्हा चोरट्यांची हजेरी घ्यायला सुरुवात केली.

" काय रं नंदिबैलांनो....असल्या चोऱ्या करून पोट जाळण्यापेक्षा इमानानं कामधंदा करून, मोलमजुरी करून पोटाची खळगी भरायला काय तुम्हांला धाड भरलीय ? "

" एवढया वेळ माफी करावी देवा...."

" तुमचा म्होरक्या कोण त्यो पुढं ये. "—तसा गुंड्या थरथर कापत पुढे झाला.

" गुंड्या, तू या टोळीचा म्होरक्या आहेस होय ? "

" व्हय देवा. "

" आणि हा पुंड्या ? "

" त्यो माजा दोन नंबरचा साथीदार. "

" आस्स व्हय....मग पुंडया, तूही पुढं ये. आणि या गुंडयाचा कान पकड. "— पुंडया थरथर कापत पुढे झाला आणि त्याने गुंडयाचा कान धरला.

" आता त्याच्या उजव्या कानफटीत एक सणसणीत चपराक ठेवून दे. "— पुंडयाने हळूच एक चपराक गुंडयाला हाणली.



“ आरं ये पुंड्या, काय जीव हाय का न्हाई तुज्यात....सगळा नेट लावून जोराची कानसुलात हाण. न्हाईतर मीच देवळाबाहेर येऊन तुझ्याच कानसुलात लगावीन बघ.” —देवच आपल्या कानसुलात हाणतोय म्हटल्यावर पुंड्या हादबडला आणि त्याने गुंड्याच्या कानसुलात एक सणसणीत चपराक लगावली.

“ ओय ! ओय !”

“ शाब्बास ! गुंड्या, आता तू पुढं ये, आणि या पुंड्याच्या पेकाटात एक सणसणीत लाथ घाल बघू !”—कानफटीत खाल्ल्यामुळे गुंड्या पुंड्यावर दात खाऊनच होता. त्याने मारुतिरायाची आज्ञा मिळताच पुंड्याच्या पेकाटात अशी एक सणसणीत लाथ हाणली की तो तीन ताड उडाला आणि खोपड्यात जाऊन बाक्कन् आदळला.

“ आता बामणीच्या इनामदाराचं घर फोडणाऱ्यातला पुढारी कोन रं ?”—तसा उरलेल्या तिघांपैकी एक लटपटत पुढे झाला.

“ म्-म् मी....ख्-ख्....खंड्या, देवा.’

“ खंड्या होय तुजं नाव....बाकीचं तुम्ही दोघंजण या खंड्याच्या मानगुटीवर एकावर एक चढून बसा....” तसे बाकीचे दोघे झटपट खंड्याच्या मानगुटीवर स्वार झाले.

“ हां....आता खंड्या, तू या दोघांना मानगुटीवर घेऊन तशाच उठाबश्या काढ. चल ऊठ....”

उठाबश्या काढता काढता खंड्याचा जीव मेटाकुटीस आला. पण करतो काय बिचारा...देवाची आज्ञा....नेट लावून उठाबश्या काढीत होता...खंड्या पार भेंडाळला तेव्हाच देवाने त्याची सुटका केली.

मग गुंड्या-पुंड्यासकट सगळ्या चोरांना देवाने पुन्हा भिंतीशी खाली डोके वर पाय करून, शीर्षासन करायला लावले. जोर, सूर्यनमस्कार काढायला लावले. देवळातल्या खुंटाळ्यांना उलटे टांगून घेऊन डोळ्यांत, नाकात रक्त उतरेपर्यंत लोंबकळायला लावले. दगडी फरशीवर एकमेकांशी अटीतटीच्या कुस्त्यासुद्धा खेळायला लावल्या.

पुष्कळ वेळ कसरत व सर्कस केल्यावर पाची चोरांची अगदी फॅ, फॅ उडाली. पुन्हा जन्मात कधी चोरी करणार नाही म्हणून ते गयवया करून नाक घास-घासून सांगायला लागले.

तशी मारुतिरायाने उदार मनाने त्यांची पुढची ‘सर्कस’ थांबवली आणि आपण एक-दोन-तीन म्हणायच्या आत मंदिराबाहेर वाट फुटेल तिकडे पसार व्हा, अशी आज्ञा केली.

एवढी सवलत मिळाल्यावर चोर तिथे कशाला राहतात....मारुतिरायानं तीन म्हणण्याच्या आत वाट फुटेल तिकडे ओढ्यातून, काट्याकुट्यातून आणि पांदीतून ते पसार झाले.

तिरसिंगराव मग डुलत डुलत गाभाऱ्यातून बाहेर आले. आधी त्यांनी आपल्या अंगावरचा मारुतीचा वेष उतरविला. नेहमीचा पैलवानी पोषाख चढवला, तसेच जाऊन सिद्धनेर्ली गाठली. सिद्धनेर्लीतील गावकऱ्यांच्या साहाय्याने कागलच्या नाटकमंडळीला आणि बामणीच्या इनामदारांना बोलावून घेतले.

ज्यांची त्यांची चीजवस्त त्यांच्या त्यांच्या हवाली केली. दिवाळीच्या फराळाचा वाण मोठा झकास असल्याचे प्रशस्तिपत्र इनामदारांना दिले आणि नाटकवाल्यांना हितोपदेश केला की, रोज रात्रीची नाटके करीत असला तरी यापुढं एवढे डाराडूर झोपत जाऊ नका !

* * *

# तिरसिंगराव आणि एका अस्वलाचा शोध

सकाळी आठ नऊ वाजण्याचा सुमार. माजी कोल्हापूर संस्थानच्या महाराजांनी कधी काळी राखून ठेवलेल्या हरीण–पार्कात, शिकारखान्यालगतच तंबू ठोकून दोन शिकारी राहुट्या उभ्या केल्या होत्या. बाहेर एक राऊंडटेबल आणि त्या टेबलाभोवती दोन-चार कापडी फोल्डिंग खुर्च्या उघडून ठेवल्या होत्या. मधल्या टेबलावर कॉफीपानाचा सगळा सरंजाम मांडून ठेवला होता. सकाळची कोवळी सोनेरी किरणे पसरत होती—खुर्च्यांवर आमोरासमोर दोन भीमकाय व्यक्ती बसल्या होत्या. दोघांच्या हातात कॉफीने भरलेले दोन मोठे ‘ मिलिटरी जग ’ होते. त्यांचे कॉफीपान अगदी मजेत चालले होते. त्यातली एक व्यक्ती होती, कोल्हापूरचे मशहूर हिंदकेसरी पैलवान तिरसिंगराव आणि दुसरे गडमुडशिंगीचे सुप्रसिद्ध शिकारी खंडोजीराव पाटील, गडमुडशिंगीकर !

खंडोजीरावांची थुलथुलीत सुटलेली ढेरी त्यांच्या त्या खाकी रंगाच्या शिकारी पद्धतीच्या हाफपँटमध्ये, पट्टयाने आवळूनसुद्धा मावत नव्हती. जवळच झाडाच्या फांदीवर बसलेली रानचिमणी खंडोजीरावांच्या छपरी जंजाळ भरघोस मिश्यांत आपले घरटे बांधावे किंवा काय, याचा गंभीरपणे विचार करीत होती. कॉफी पिता पिता मध्येच सहज तिरसिंगरावांनी अस्वलाचा विषय काढला.

“ शक्य आहे.... तिरसिंगराव, अगदी शक्य आहे.... ” अस्वलाचे नाव निघताच खंडोजीरावांचा बोलण्याचा उत्साह अगदी फुटून वाहू लागला. कुठल्यातरी एका दिशेकडे हात उडवून खंडोजीराव पुढे म्हणाले,

“ त्या तिकडे सह्याद्रीच्या डोंगरांच्या रांगाच रांगा पसरल्या आहेत. आणि त्य डोंगरांच्या उतारावर जंगलेसुद्धा कशी घनदाट माजली आहेत. तिकडे अस्वलांच्या वसाहतीही पुष्कळ आहेत. त्यातलेच एखादे अस्वल वाट चुकून भरकटत, भरकटत इकडे

येणेही काही अवघड नाही....हॉ हॉ ! हॉ !" — मध्येच विनाकारण मोठमोठ्याने हसण्याची खंडोजीरावांना भारी खोड होती. आताही ते एवढे भयंकर हसले की क्षणभर ट्रॅक्टरचे इंजिनच धडधडते आहे की काय, असा भास झाला.... आणि फांदीवर बसलेली मत्राची ती रानचिमणी, बिचकून बापडी भुर्ररदिशी उडून गेली !

या हरीण-पार्कात एक भलेमोठे अस्वल आलेले आहे. आसपासच्या रानातल्या नाहीतर गावातल्या वस्त्यांवर ते आमनधपक्याने जाते आणि तिथल्या बायाबापड्यांना, पोरासोरांना ते चांगलेच बिचकवून बावचळून सोडते.... अशा पंचक्रोशीतल्या माणसांच्या तक्रारी खंडोजीरावांच्या कानी वरचेवर येत होत्या.... हे अस्वल असेच माजोरी होत गेले असते, तर उद्या कुणालातरी वाटेवर एकट्याला गाठून, घोसळून ठार मारायला कमी करणार नाही.... त्याचा बंदोबस्त झाला पाहिजे.

तेव्हा हे अस्वल—एक तर त्याला जिवंत पकडायचे, किंवा मग अगदीच नाइलाज झाला तर त्याची शिकार करायची, असा बेत खंडोजीरावांनी आखला. या मोहिमेच्या वेळी कोल्हापूर येथील आपले परममित्र तिरसिंगराव यांना त्यांनी खास आग्रहाने बोलावून घेतले होते. अस्वलाला जिवंत पकडण्यात, आपला शिकारकलेतला सगळा विक्रम प्रत्यक्षात दाखवून, तिरसिंगरावांना अगदी चाट पाडायचे व त्यांच्यावर पुष्कळ भाव मारायचा, असा खंडोजीरावांचा इरादा होता.



परंतु, पराक्रम हातभर आणि गप्पा दीडहात असाच एकंदरीत खंडोजीरावांचा खाक्या असायचा.

त्यांनी पूर्वी कधीतरी एक ढाण्या वाघ मारला होता, आणि त्याचे धूड पेंडा भरून, गडमुडशिंगी येथील आपल्या चौसोपी वाडयात अगदी दर्शनी भागीच सजवून उभे केले होते. या ढाण्या वाघाच्या शिकारीची तिखट-मीठ-मसाला लावून खंडोजीराव मारे रुबाबात आपल्या पराक्रमाची हकीकत अगदी 'टेक्निकलर' चित्रपटासारखी रंगवून सांगत. ढाण्या वाघ चवताळून खंडोजीरावांच्या अंगावर कसा धावला आणि खंडोजीरावांनी त्याला कसा कमरेतच मोडला नि त्याची खांडोळी केली, वगैरे....परंतु खरी गोष्ट अशी होती की, झाडाखाली आपल्याकडे पाहतच शांतपणे उभ्या असलेल्या त्या ढाण्या वाघाचे ठिणगीसारखे डोळे बघितल्यानंतर खंडोजीराव लटपटले आणि वरच्या माचणावरून निसटले ते सरळ खालीच. सुदैवाने खंडोजीरावांचा वरून खाली येणारा तो गतिमान अजस्र देह नेमका ढाण्या वाघाच्या टाळक्यावरच आदळल्यामुळे त्याखाली चेंगरून वाघ अर्धमेला झाला आणि खंडोजीराव सहीसलामत वाचले. तेवढयात वाघाच्या अंगावरून उठून त्यांनी आपली बंदूक सावरली आणि धडाधड गोळ्या झाडून त्या अर्धमेल्या वाघोबांना पूर्ण मोक्ष घडविला !

अस्वलाचे नि अस्वलाच्या शिकारीतले 'पुष्कळच बारकावे नि आडाखेतिडाखे आपल्याला ठाऊक आहेत. आपल्या अंगावरील दाट केसांमुळे जाळ बघितला की अस्वल भीतीने भन्नाट पळत सुटते. अस्वलाची सगळी ताकद त्याच्या पंजात असून, माणसाला ते गुदगुल्या करून, घोसळून घोसळून मारते. श्वास रोखून निपचित पडलेल्या माणसाला मात्र काही एक न करता नुस्तेच हुंगून पुढे निघून जाते....वगैरे अस्वलाविषयीची पुष्कळच मौलिक माहिती खंडोजीरावांनी तिरसिंगरावांना पुरविली. अस्वल अलगद अगदी चोरपावलांनी आल्यासारखे येत असल्याने त्याच्या येण्याचा काही एक सुगावा माणसाला लागत नाही....अशीही एक अस्वलाची 'अंदरकी बात' जाता जाता खंडोजीरावांनी तिरसिंगरावांना सांगून ठेवली.

कॉफीचा पहिला जग रिकामा केल्यावर खंडोजीरावांनी आपल्या मिश्या पुसून साफसूफ केल्या. जरा दूध जास्तीच घालून जग दुसऱ्या वेळा कॉफीने काठोकाठ भरला. जग उचलून तोंडला लावणार....एवढयात....डोळे फाड-फाडून आणि 'आ' वासून ते एकटक तिरसिंगरावांच्याकडे बघू लागले.

" त्-त्-त्-तिंग—तिरसिंगराव...." त्यांच्या ओठांतून धड नीट शब्ददेखील बाहेर पडेना.

" ऑव् ! ऑव् ! अस्वॉल ! अस्वॉल ! "— करीत त्यांनी बसल्या खुर्चीवरून टुण्दिशी समोरच्या राऊंड टेबलावरच उडी मारली. त्यांच्या वजनाने टेबल डगडग हालू लागले. त्यामुळे खंडोजीरावांची आणखीनच फे फे उडाली. अगोदर तिरसिंगरावांना काही एक कळेना, परंतु मग त्-त्-प्-प् करणाऱ्या खंडोजीरावांच्या अस्पष्ट—तुटक बोलण्यातून थोडाबहुत संदर्भ लागला. खंडोजीराव बसले होते त्या खुर्चीखालीच नेमके केव्हातरी थोड्या वेळापूर्वी ते वेटे अस्वल येऊन बसले असावे....अशी जाम खात्री खंडोजीरावांना वाटली आणि तेव्हाच टुण्दिशी उडी मारून ते समोरच्या राऊंड मेजावर विराजमान झाले. तिरसिंगराव ही हकीगत ऐकून मनात थोडे चरकलेच आणि मग लांबूनच सावधपणे त्यांनी खंडोजीराव बसले होते त्या खुर्चीखाली नजर फिरवली.

तिथे, शिकार मोहिमेला येताना आपल्याबरोबर आणलेली खंडोजीरावांची कुलंगी जातीची लाडकी कुत्री ' राणी ' शेपूट हलवीत ऐटीत उभी होती. मोज्यावरच्या पायाच्या उघड्या पोटऱ्यांना कदाचित त्या शेपटीचा स्पर्श होऊन हुळहुळल्यावर.... खंडोजीरावांना तो स्पर्श अस्वलाच्या तोंडाचा किंवा केसाळ पायाचा असावासे वाटून, ते चांगलेच मेमकावून गेले.

वीर खंडोजीरावांनी आतापर्यंत सांगितलेल्या आपल्या शिकारीतल्या पराक्रमाच्या फुशारक्या नि बाढाया....यांच्याशी ही घटना अगदीच विसंगत आणि अशोभनीय होती, अस्वलाच्या नुसत्या कल्पनेने आपली फे फे उडावी आणि तीही तिरसिंगरावांच्या देखत, म्हटल्यावर खंडोजीराव मनोमन चांगलेच ओशाळले. परंतु,

" हॉ ! हॉ ! हॉ ! "—ट्रॅक्टरच्या धडधडत्या इंजिनासारखे आपले प्रचंड हास्य सुरू करून, त्यात त्यांनी आपला ओशाळवाणेपणा कुठल्याकुठे बुडवून टाकला.

पायी किंवा जीप गाडीतून तिरसिंगराव, खंडोजीराव आणि त्यांचे इतर दोन चाकर-नोकर, जीपचा डायव्हर इत्यादींनी मिळून जंग जंग पछाडले....कुकारा करीत सगळे जंगल पालथे घातले, परंतु अस्वलाचा शोध म्हणून काही केल्या लागत नव्हता....

एकदा एक पुरुष-अर्धा पुरुष उंचीच्या खडकापलीकडे आडोशाला एक कसलासा काळा केसाळ प्राणी चरत असल्याचा भर दुपारी, खंडोजीरावांना भास झाला. तसे त्यालाच अस्वल समजून हातातील बंदूक सावरीत लपत-छपत, तर कधी जमिनीशी सरपटत

परंतु, पराक्रम हातभर आणि गप्पा दीडहात असाच एकंदरीत खंडोजीरावांचा खाक्या असायचा.

त्यांनी पूर्वी कधीतरी एक ढाण्या वाघ मारला होता, आणि त्याचे धूड पेंढा भरून, गडमुडशिंगी येथील आपल्या चौसोपी वाड्यात अगदी दर्शनी भागीच सजवून उभे केले होते. या ढाण्या वाघाच्या शिकारीची तिखट-मीठ-मसाला लावून खंडोजीराव मारे रुबाबात आपल्या पराक्रमाची हकीकत अगदी 'टेक्निकलर' चित्रपटासारखी रंगवून सांगत. ढाण्या वाघ चवताळून खंडोजीरावांच्या अंगावर कसा धावला आणि खंडोजीरावांनी त्याला कसा कमरेतच मोडला नि त्याची खांडोळी केली, वगैरे....परंतु खरी गोष्ट अशी होती की, झाडाखाली आपल्याकडे पाहतच शांतपणे उभ्या असलेल्या त्या ढाण्या वाघाचे ठिणगीसारखे डोळे बघितल्यानंतर खंडोजीराव लटपटले आणि वरच्या माचणावरून निसटले ते सरळ खालीच. सुदैवाने खंडोजीरावांचा वरून खाली येणारा तो गतिमान अजस्र देह नेमका ढाण्या वाघाच्या टाळक्यावरच आदळल्यामुळे त्याखाली चेंगरून वाघ अर्धमेला झाला आणि खंडोजीराव सहीसलामत वाचले. तेवढ्यात वाघाच्या अंगावरून उठून त्यांनी आपली बंदूक सावरली आणि धडाधड गोळ्या झाडून त्या अर्धमेल्या वाघोबांना पूर्ण मोक्ष घडविला !

अस्वलाचे नि अस्वलाच्या शिकारीतले 'पुष्कळच बारकावे नि आडाखेतिडाखे आपल्याला ठाऊक आहेत. आपल्या अंगावरील दाट केसांमुळे जाळ बघितला की अस्वल भीतीने भन्नाट पळत सुटते. अस्वलाची सगळी ताकद त्याच्या पंजात असून, माणसाला ते गुदगुल्या करून, घोसळून घोसळून मारते. श्वास रोखून निपचित पडलेल्या माणसाला मात्र काही एक न करता नुस्तेच हुंगून पुढे निघून जाते....वगैरे अस्वलाविषयीची पुष्कळच मौलिक माहिती खंडोजीरावांनी तिरसिंगरावांना पुरविली. अस्वल अलगद अगदी चोरपावलांनी आल्यासारखे येत असल्याने त्याच्या येण्याचा काही एक सुगावा माणसाला लागत नाही....अशीही एक अस्वलाची 'अंदरकी बात' जाता जाता खंडोजीरावांनी तिरसिंगरावांना सांगून ठेवली.

कॉफीचा पहिला जग रिकामा केल्यावर खंडोजीरावांनी आपल्या मिश्या पुसून साफसूफ केल्या. जरा दूध जास्तीच घालून जग दुसऱ्या वेळा कॉफीने काठोकाठ भरला. जग उचलून तोंडला लावणार....एवढ्यात....डोळे फाड-फाडून आणि 'आ' वासून ते एकटक तिरसिंगरावांच्याकडे बघू लागले.

" त्-त्-त्-तिंग—तिरसिंगराव...." त्यांच्या ओठांतून धड नीट शब्ददेखील बाहेर पडेना.

" ऑव् ! ऑव् ! अस्वॉल ! अस्वॉल ! "— करीत त्यांनी बसल्या खुर्चीवरून टुण्दिशी समोरच्या राऊंड टेबलावरच उडी मारली. त्यांच्या वजनाने टेबल डगडग हालू लागले. त्यामुळे खंडोजीरावांची आणखीनच फे फे उडाली. अगोदर तिरसिंगरावांना काही एक कळेना, परंतु मग त्-त्-प्-प् करणाऱ्या खंडोजीरावांच्या अस्पष्ट—तुटक बोलण्यातून थोडाबहुत संदर्भ लागला. खंडोजीराव बसले होते त्या खुर्चीखालीच नेमके केव्हातरी थोड्या वेळापूर्वी ते बेटे अस्वल येऊन बसले असावे....अशी जाम खात्री खंडोजीरावांना वाटली आणि तेव्हाच टुण्दिशी उडी मारून ते समोरच्या राऊंड मेजावर विराजमान झाले. तिरसिंगराव ही हकीगत ऐकून मनात थोडे चरकलेच आणि मग लांबूनच सावधपणे त्यांनी खंडोजीराव बसले होते त्या खुर्चीखाली नजर फिरवली.

तिथे, शिकार मोहिमेला येताना आपल्याबरोबर आणलेली खंडोजीरावांची कुलंगी जातीची लाडकी कुत्री ' राणी ' शेपूट हलवीत ऐटीत उभी होती. मोज्यावरच्या पायाच्या उघड्या पोटऱ्यांना कदाचित त्या शेपटीचा स्पर्श होऊन हुळहुळल्यावर.... खंडोजीरावांना तो स्पर्श अस्वलाच्या तोंडाचा किंवा केसाळ पायाचा असावासे वाटून, ते चांगलेच भेमकावून गेले.

वीर खंडोजीरावांनी आतापर्यंत सांगितलेल्या आपल्या शिकारीतल्या पराक्रमाच्या फुशारक्या नि बाढाया....यांच्याशी ही घटना अगदीच विसंगत आणि अशोभनीय होती, अस्वलाच्या नुसत्या कल्पनेने आपली फे फे उडावी आणि तीही तिरसिंगरावांच्या देखत, म्हटल्यावर खंडोजीराव मनोमन चांगलेच ओशाळले. परंतु,

" हॉ ! हॉ ! हॉ ! "—ट्रॅक्टरच्या धडधडत्या इंजिनासारखे आपले प्रचंड हास्य सुरू करून, त्यात त्यांनी आपला ओशाळवाणेपणा कुठल्याकुठे बुडवून टाकला.

पायी किंवा जीप गाडीतून तिरसिंगराव, खंडोजीराव आणि त्यांचे इतर दोन चाकर-नोकर, जीपचा डायव्हर इत्यादींनी मिळून जंग जंग पछाडले....कुकारा करीत सगळे जंगल पालथे घातले, परंतु अस्वलाचा शोध म्हणून काही केल्या लागत नव्हता....

एकदा एक पुरुष-अर्धा पुरुष उंचीच्या खडकापलीकडे आडोशाला एक कसलासा काळा केसाळ प्राणी चरत असल्याचा भर दुपारी, खंडोजीरावांना भास झाला. तसे त्यालाच अस्वल समजून हातातील बंदूक सावरीत लपत-छपत, तर कधी जमिनीशी सरपटत

घामाघूम झालेले खंडोजीराव एकदाचे कसेबसे त्या खडकापाशी पोहोचले. खडकावर चढून त्यांनी पलीकडे नजर ,फेकली तो खडकाच्या खोबणीत वाढलेले गवत आणि शेजारच्या हिरवळीवर ताव मारण्यात तिथे एक बोकड आणि पाच-सहा मेंढ्या अगदी रमून गेल्या होत्या. दुरून एकत्रित दिसणारा तो मेंढ्यांच्या लहानखोऱ्या कळपाचा पाठी-कडचा भाग खंडोजीरावांना अस्वलासारखाच वाटला. आपले एवढे प्रयत्न वाया गेल्याने खंडोजीराव चांगलेच हिरमुसले झाले.

कसल्यातरी चमत्कारिक आवाजाने एकदा अवचित रात्रीचीच तिरसिंगरावांना जाग आली. तेवढ्यात शेजारीच कॉटवर झोपलेले खंडोजीराव झेप घेऊन पुढे आले आणि त्यांनी तिरसिंगरावांच्या गळ्यालाच मिठी मारली.

" त्-त्-त्-व्-व्...."

" बोला, नीट बोला खंडोजीराव....काय म्हणायचंय तुमास्नी ? "

" ऑप् ऑप्....फ्रु....आस्वाल ! आस्वाल ! "—मघाशी आपण ऐन झोपेत असताना, राहुटीत शिरलेल्या अस्वलाने आपल्या कानाजवळ आणि गालाजवळ हुंगण्याचा प्रयत्न केला, त्याचे काही केस आपल्या नाकातही शिरले होते....वगैरे हकीकत अडखळत, श्वास घेत....खंडोजीरावांनी हलक्या आवाजात तिरसिंगरावांना सांगितली. तिरसिंगरावांनी मग खंडोजीरावांना धीर देऊन नीट अगोदर आपल्या कॉटवर बसविले. उशालगतचा प्रखर प्रकाश-झोताचा टॉर्च उचलून.... खंडोजीरावांच्या कॉटजवळ कॉटखाली आसपास राहुटीचा कानाकोपरा त्या प्रकाश-झोतात धुंडाळला....परंतु खंडोजीराव म्हणत होते, त्या अस्वलाचा कुठे मागमूस नव्हता. कोपऱ्यातल्या राऊंड मेजावर राणी कुत्री झकास निजली होती. तिला काही तरी वास लागून, ती भुंकत उठायला हवी होती....

खंडोजीरावांची गादी इकडे तिकडे करण्याच्या प्रयत्नात गादीखाली लपलेल्या एका गलेलठ्ठ रानउंदराने धापदिशी खाली जमिनीवर उडी घेतली आणि तो उंदीर तडक राहुटीबाहेर पळाला.

एकूण डाराडूर झोपलेल्या खंडोजीरावांना, त्यांच्या उशालगत येऊन चुळबूळ करणाऱ्या त्या उंदराच्याच शेपटीने किंवा मिशीने त्यांच्या कानात आणि गालाला हुळहुळण्यासारखे झाले होते. कदाचित छपरीमिश्यांच्या वरच्या अंगाला असलेल्या खंडोजी-रावांच्या दोन्ही नाकपुड्यांबाबतही उंदराने विशेष कुतूहल दाखविल्यामुळे उंदराच्या तोंडाजवळच्या मिश्यांनीच बहुधा त्यांच्या नाकपुड्यांत प्रवेश केला असावा, आणि

वाचनालय शाखा
वि


त्यामुळे भली मोठ्ठी शिंक देण्यासाठी खंडोजीरावांनी झोपेतच आपला चेहरा बदलायला किंवा घट्ट आवळायला सुरुवात करताच, उंदीरमामांनी तेथून पळ काढला असावा.... त्यानंतर जागे झाल्यावर, मुळातच अस्वलाच्या कल्पनेने घेरलेल्या खंडोजीरावांची मग भलतीच त्रेधातिरपीट उडाली.

आणखी दोन-तीन दिवस निघून गेले. अस्वलाच्या या शोधात अजून किती दिवस हा 'जंगलवास' पत्करावा लागतो कोण जाणे, असाही एक विचार तिरसिंग-रावांच्या मनात तरळून गेला.

पण आकस्मिक रीत्या तो भाग्याचा दिवस उगवला.

त्या दिवशी अगदी पहाटे पहाटे, झुंजूमुंजू झाले होते न होते अशा वेळी तिरसिंगरावांनी हाका मारमारून खंडोजीरावांना उठवायला सुरुवात केली.

" उठा हो....खंडोजीराव, उठा....तुमचं अस्वल सापडलं एकदाचं."

" अस्वल स् सापडलं म्हणता ? क्-कुठाय ?"

" ते काय, तुमच्या शेजारी." खंडोजीराव मट्कन उठू बसले. त्या गडबडीत त्यांचा डावा हात बाजूला कॉटबाहेर पडला तो नेमका मऊ मऊ केसाळ गादीवर. त्या अंधूक उजेडात खंडोजीरावांनी डोळे फाड-फाडून त्या मऊ केसाळ गादीच्या दिशेने बघितले.

खरेच तेथे एक अस्वल खंडोजीरावांच्या कॉटलगतच अगदी मजेत झुलत उभे होते. खंडोजीराव कॉटवरून उडी मारून, राहुटीबाहेर किंवा शिकारीची बंदूक आणायला म्हणून पळ काढणार तेवढ्यात तिरसिंगरावांनी त्यांना आवरले.

" सबूर खंडोजीराव, अस्वल तुम्हांला काही एक करणार नाही."

—मग अस्वलाला आपण कसे पकडले याची रोमहर्षक शिकारकथा उलट तिरसिंगरावांनीच या वेळी खंडोजीरावांना सांगितली.

मध्यान्हरात्र उलटल्यावर तिरसिंगराव बाहेर राहुटीच्या पिछाडीला गेले होते. तिकडे लांबवर जरा बाजूलाच शिकारखान्याच्या एका जुनाट अवाढव्य भिंतीशी थोड्याशा गर्द झुडुपाआडून त्या शांत निवांत वेळी कसलीशी घुरघुर अगदी नियमितपणे ऐकू येऊ लागली. पुन्हा परत राहुटीत येऊन तिरसिंगरावांनी हातात अगोदर आपली भरलेली बंदूक घेतली आणि मग बॅटरीचा झोत फेकीत, आवाजाचा शोध घेत ते त्या झुडपाच्या दिशेने निघाले.

त्या झुडपाच्या आडोशाला भिंतीलगत एक अस्वल पुढच्या दोन पायांवर मान टाकून निवांत पहुडले होते. म्हणजे सगळ्या जंगलभर शोध घेतला ते अस्वल शेवटी राहुटीच्या पाठीमागेच तळ ठोकून मुक्कामाला होते.

बॅटरीचा प्रकाश अंगावर पडल्यानंतर ते अस्वल थोडे चमकले. परंतु मग त्यावर त्याने काही एक हालचाल केली नाही आणि आपल्या हातातली बंदूक सावरून, सज्ज ठेवून धिमे धिमे तिरसिंगराव त्या अस्वलाच्या अगदी जवळ जाऊन पोहोचले. बॅटरीचा प्रकाश जेव्हा अस्वलाच्या पुढच्या पंजावरून फिरला तेव्हा तिरसिंगरावांच्या लक्षात आले की, अस्वलाच्या पुढच्या एका पंजाला जबर दुखापत झाली आहे आणि ती जखम बळावून आता चांगलीच सुजून फुगून बसली आहे. तिच्या असह्य वेदनांनीच ते बिचारे असे दु:खाने गुंग बधीर झाल्यासारखे होऊन, बसून राहिले आहे.

थोडा विश्वास वाटायला लागला तसे तिरसिंगराव त्या अस्वलाजवळच उकिडवे बसले. त्यांनी हातातली बंदूक थोडी बाजला ठेवून दिली. प्रसंग पडला असता तर आता त्या अस्वलाशी दोन हात करून, झुंज द्यायचीही त्यांची तयारी होती. आपला एक हात पुढे करून त्यांनी तो अस्वलाच्या पाठीवर, तोंडावर अबदारपणे फिरवायला सुरुवात केली. अस्वलाने थोडी शरीराची चाळवाचाळव केली आणि मग ते पुन्हा निवांत पडून राहिले. अस्वल काही प्रतिकार करीत नाही म्हटल्यावर, तिरसिंगरावांनी आपला हात अस्वलाच्या त्या जखमी पंजाच्या दिशेने पुढे सरकवला. पंजाचा तो ठसठसता सुजलेला भाग जरा दो-चार वेळा जोराने दाबताच ठस्दिशी जखम फुटली. अस्वलाने क्षणभर आपली स्वत:ची मुंडी हलवली. फुटलेल्या त्या सुजेमधून दूषित रक्त, पू किंवा तत्सम स्वरूपाची काही साचलेली घाण बाहेर येऊ लागली, आणि अस्वलाच्या वेदनांना तसा झराझर उतार पडायला लागला.

तिरसिंगराव परत आपल्या राहुटीकडे गेले आणि प्रथमोपचाराची पेटी घेऊन आले. आपल्याला असह्य वेदनांतून मुक्त करणाऱ्या या कुण्या अनोळखी मित्राविषयी एव्हाना अस्वलाला मोठीच सलगी वाटायला लागली होती....त्यामुळे पोटॅशियममिश्रित पाण्याच्या ओल्या कापसाने तिरसिंगरावांनी त्या अस्वलाच्या पंजावरची जखम धुऊन पुसून काढली. त्यावर बोरीक पावडर, बेंझिन असली औषधे घालून पंजाची जखम सगळी 'घट्ट बँडेज' केली तरी अस्वल आपले निमूट बसून राहिले होते. उलट प्रेमाने ते आता अधून-मधून आपले अंग तिरसिंगरावांच्या अंगाला घासू पाहत होते!

अनुक्रम ............ वि..................
क्रमांक ... ............नोंद दि.................

तसेच पडून राहून, अस्वलाने थोडी विश्रांती घेतल्यावर, तिरसिंगरावांनी त्याला चुचकारून चुचकारू उठून उभे केले तेव्हा लक्षात आले की, त्या अस्वलाची अजून पुरतेपणी वाढदेखील झालेली नव्हती. तसे ते अजून अस्वलाचे थोडे अंगा-पिंडाने एक पिल्लूच होते. त्याला नीट चारी पायांवर चालतादेखील येत नव्हते. कारण 'बँडेज' केलेला जखमी पंजा ते व्यवस्थित जमिनीवर टेकवू शकत नव्हते. आपल्या हाताच आधार देत, अधूनमधून थोडे उचलून घेत तिरसिंगरावांनी त्या अस्वलाला कसेबसे आपल्या राहुटीशी आणि नंतर आत राहुटीत आणले. खंडोजीरावांची गंमत करायची म्हणून त्यांनी मुद्दामच ते अस्वल साखळीने, दोराच्या काढणीने बांधले. ते नेमके खंडोजीराव झोपले होते, त्या कॉटलगत....तोपर्यंत म्हणजे पहाट होत आली....

एक जिवंत अस्वल आपल्या शेजारीच झुलत उभे आहे, असे बघितल्यावर खंडोजीरावांचा थोडा गडबडगुंडा उडणे साहजिकच होते, परंतु मग तिरसिंगराव अगदी त्या अस्वलाच्या तोंडाजवळ जातात व त्याला प्रेमाने कुरवाळतात, चुचकारतात. अस्वलालाही ते आवडते हे बघितल्यावर खंडोजीरावांनाही थोडा धीर आला. ते देखील मग थोडेसे धाडस करून त्या अस्वलाजवळ जाऊ लागले, त्याची पाठ थोपटू लागले व त्याला प्रेमाने चुचकारू लागले.

त्याच दिवशी दुपारी गडमुडशिंगीस जाण्यासाठी सगळा जामानिमा आवरून जीपवर चढविला, आणि अस्वलानेदेखील जीपमध्ये चढून बसावे म्हणून जीपचा मागचा दरवाजा खोलून सताड उघडा केला. खंडोजीराव अस्वलाला गाडीत चढण्यासाठी चुचकारत होते व आवश्यक तेथे 'ट्रेनिंग' देत होते. अस्वलाला व्यवस्थित कळावे



म्हणून एखदा तर त्यांनी स्वतःच गुडघ्यावर रांगत जाऊन जीपच्या मागच्या ‘ कंपार्टमेंट ’-मध्ये चढून दाखविले. परंतु ते अननुभवी अस्वल लेकाचे ढिम् जागचे हालेना !

तेव्हा पुन्हा तिरसिंगरावच पुढे झाले, त्यांनी आपली मुंडी त्याच्या चारही पायांच्या मधल्या भागात सरकवली आणि “ गणपती बाप्पा मोरया ! ”—म्हणत त्या अस्वलाला वर खांद्यावर उचलून अलगत जीपगाडीत मागच्या कंपार्टमेंटमध्ये ठेवून दिले.

“ हॉ ! हॉ ! हॉ ! अस्वलाला जीपमध्ये चढवायची बाकी तुम्ही मोठी नामी युक्ती शोधलीत हां तिरसिंगराव.... हॉ ! हॉ ! हॉ ! — ”

इति खंडोजीराव.

अस्वलाला पकडण्यात यशस्वी झालेली ती सगळी शिकार मोहीम मग अस्वला-सकट थेट जीपने गडमुडशिंगीस येऊन दाखल झाली. आपल्या चौसोपी वाड्यात व्हरां-ड्यालाच एका सुरक्षित कोपऱ्यात खंडोजीरावांनी अस्वलाची मोठी बडदास्त ठेवली होती. अस्वलाच्या सर्व सवयी, त्याच्या खाण्या-पिण्यातल्या आवडी-निवडी यांची बारीकसारीक माहिती खंडोजीरावांना असल्यामुळे, त्यांनी त्यात कुठलीच कमतरता राखली नाही. परंतु तिरसिंगराव जवळ आल्यानंतर अस्वलाला सर्वच बाबतींत जेवढा उत्साह चढत असे, तेवढेच ते इतर कुणाच्याही सहवासात बेटे नाखूष होऊन जाई.

पुढे एक-दोन दिवस खंडोजीरावांचा पाहुणचार झोडल्यानंतर, तिरसिंगराव कोल्हा-पूरला जाण्यास निघाले.

“ तुम्ही काही एक काळजी करू नका तिरसिंगराव, मी त्या अस्वलाच्या खाण्या-पिण्या-राहण्याची मोठी अलिशान व्यवस्था ठेवतो. ” असे आश्वासन देऊन, खंडोजी-रावांनी तिरसिंगरावांना निरोप दिला. तिरसिंगराव निघून गेल्यावर, निरनिराळ्या प्रकारे थोपटून-चुचकारून कधी स्वताच्या हातांनी खायला-प्यायला घालून अस्वलाला स्वतःचा चांगलाच ‘ ळळा ’ लावयाचा आणि मग अस्वलाला मोकळयानेच संध्याकाळी गावात बाहेर फिरावयाला नेऊन पुढे गडमुडशिंगीतल्या आणि आसपासच्या पंचक्रोशीतल्या लोकांवर आपल्या या अस्वलाच्या निमित्ताने नुसता जाम भाव मारायचा....मग अस्वलाला-सुद्धा मोकळेपणी घेऊन फिरणारे शूर शिकारी खंडोजीराव म्हणून लोक आपल्याला टर-कून वचकून राहायला लागतील....वगैरे सुखस्वप्ने पाहण्यात खंडोजीराव मशगुल झाले होते.

परंतु दुसऱ्याच दिवशी त्यांची स्वप्ने धुळीला मिळाली. कारण तिरसिंगराव आपल्याला सोडून निघून गेल्याची 'चाहूल' लागताच ते अस्वलाचे पिल्लू बेटे चांगलेच रुसून-फुगून बसले. ढिम् जागचे हलायला तयार होईना आणि कितीही मिनत्या केल्या, चुचकारले-पुचकारले तरी खाण्यापिण्याला तोंड म्हणून लावेना. गडमुडशिंगीहून, अस्वलाची कोल्हापुराला तिरसिंगरावांच्याकडे रवानगी करण्याशिवाय गत्यंतर उरले नाही. जीपमधून ते अस्वल कोल्हापूरला रवाना झाले.

पुढे पुष्कळ दिवसपर्यंत ते अस्वल कोल्हापुरात तिरसिंगरावांच्याकडे होते. एकदाची त्याची पूर्ण वाढ झाली आणि मग तिरसिंगरावांनी ते अस्वल एका प्रेमळ, विश्वासू दरवेशास वक्षीस देऊन टाकले !

* * *

# समुद्रगर्भात तिरसिंगराव

तिरसिंगरावांनी समुद्रात सातव्या वेळी डुबकी मारली. समुद्राच्या प्रचंड लाटांवर मनसोक्त झेपावून घेतले....आणि मग दमगीर होऊन जेव्हा ते पुन्हा आपल्या मोटरबोटीत दाखल झाले, तेव्हा ती मोटरबोट समुद्रकिनाऱ्यापासून चांगली साठ ते सत्तर मैल दूर आत समुद्रात होती.

मोटरबोटीचे संचलन करीत असलेले, तिरसिंगरावांचे जपानमधले मित्र, मार्गदर्शक आणि कुस्तिशौकीन श्री. किकावा; यांनी मग थर्मासमधली फर्मास कॉफी ' जग् ' मधून तिरसिंगरावांना ' ऑफर ' केली.

तिरसिंगरावांना जपानमध्ये येऊन आता चांगले सात-आठ दिवस उलटत आले होते. एवढ्या काळात जपानमधील कुस्तिशौकीन श्री. किकावा यांच्याशी त्यांची चांगलीच दोस्ती जमली होती. अणुबॉंबच्या स्फोटात जळून बेचिराख झालेल्या हिरोशिमा शहराची छायाचित्रे आणि आज उभे असलेले भव्य अद्ययावत असे हिरोशिमा शहर यांचे तौलनिक निरीक्षण तिरसिंगरावांनी केले होते. बुटक्या, धिप्पाड शरीराच्या राक्षसाप्रमाणे वाटणाऱ्या वटबटीत डोळ्याच्या जपानी पैलवानांच्या अनेक जंगी निकाली कुस्त्या त्यांनी बघितल्या होत्या. आपल्या कोल्हापुरी पद्धतीची कुस्ती आणि तिचे डावपेच यांचे सप्रयोग प्रात्यक्षिक त्यांनी जपानमध्ये ठिकठिकाणी फिरून, करून दाखविले होते. जपानची औद्योगिक क्षेत्रातील प्रगती, त्यांची धडाडी, त्यांचा उत्साह, जपानी घड्याळे, जपानी ट्रँझिस्टर, टेलिव्हिजन, स्कूटर्स, मोटारी यांतली त्यांची किमयागारी बघून तिरसिंगरावांच्या डोळ्यांचे अगदी पारणे फिटले होते.

छोटया मोटरबोटीच्या साहाय्याने पॅसिफिक महासागरातील सागरीसंचाराचा एक धाडसी परंतु मजेदार बेत तिरसिंगरावांसाठी किकावांनी आखला होता आणि त्याप्रमाणे

अनुक्रम ...................... वि ....................
क्रमांक .............................. नोंद दि ..................

नाही नाही म्हणता समुद्रात चांगले सत्तर एक मैलांचे अंतर दोघांनी मोटरबोटीच्या साहाय्याने मजेत कापले होते.


तिरसिंगरावांनी कॉफीचा ' जग् ' उचलून तोंडाला लावला. किकावांनीही बोटीवर नियंत्रण करता करता कॉफीचा एकेक घुटका घ्यायला सुरुवात केली, तेवढ्यात....

" धाड ! धाड ! धडाड् ! धुम् ऽऽ ! "

प्रचंड आवाज झाला. धुराचा लोळच्या लोळ हवेत उसळला आणि बसलेल्या फळीसरशी तिरसिंगराव जे हवेत उंच अंतराळी फेकले गेले ते नेमके समुद्रात कुठे जाऊन आदळले, त्याचा पत्ता निदान तिरसिंगरावांना तरी त्या क्षणी लागू शकला नाही.

समुद्राच्या पाण्याच्या पृष्ठभागाचा जबरदस्त हबका खाल्ल्याने तिरसिंगरावांच्या बलदंड शरीरात सगळ्या शरीरभर झिणझिण्या पसरल्या. पाण्याच्या एका प्रचंड लाटेने तिरसिंगराव जसे हेलकावत वर लाटेवर उसळले गेले, तसे दुसऱ्या लाटेने त्यांना पार समुद्रात बुडवले. सगळ्या शरीरात ग्लानी पसरली. गाढ निद्रेने डोळे पेंगुळावेत, तसे तिरसिंगरावांच्या पापण्या जडावून मिटत चालल्या, मस्तक सुन्न नि बधीर झाले. त्यांचे स्वस्थ शरीर पाण्यात खाली खाली निवाले. तिरसिंगरावांना वाटले की, आता सारे संपले....

उतार पडत चाललेल्या वेदनांनी तिरसिंगरावांनी नकळत एक-दोनदा कण्हल्या-प्रमाणे केले आणि मग सावकाशपणे त्यांनी डोळे उघडले. प्रथम काही काळ त्यांना कशाचाच काही बोध होईना....



मग हळूहळू त्यांच्या लक्षात येत गेले की, आपण एका अत्यंत सुसज्ज आणि हवेशीर अशा दालनात आहोत. मंद, प्रसन्न, परंतु विलक्षण शीतल चेतोहारी अशा हिरव्या रंगाच्या प्रकाशाने ते दालन उजळून निघाले आहे. तिरसिंगरावांना झोपवले गेले आहे, ते स्ट्रेचरदेखील केवढेतरी ऐसपैस आणि अद्ययावत असे आहे.

तिरसिंगरावांच्या शुश्रूषेसाठी त्यांच्याजवळच उभ्या असलेल्या दोन अनोळखी जपानी व्यक्तींनी मग हातवाऱ्यांनी, हावभावांनी आणि मोडक्यातोडक्या इंग्रजीमिश्र हिंदी आणि हिंदीमिश्र जपानी भाषेत तिरसिंगरावांना समजावून द्यायचा प्रयत्न केला की, ते अगदी सुरक्षित स्थळी असून, त्यांना झालेल्या भीषण अपघातातून ते आता पूर्णपणे बचावले आहेत ! ऑपरेशन थिएटरमधल्या डॉक्टर्सप्रमाणे त्या दोन्ही जपान्यांनी आपले वेष परिधान केले होते....त्या दोन्ही व्यक्ती राहून राहून तिरसिंगरावांची देखभाल करीत होत्या.... आणि पंधरा पंधरा मिनिटांच्या अंतराने कसलीबसली औषधे प्यायला त्यांना भाग पाडीत होते. तिरसिंगरावांना औषधे प्यायचा कंटाळा आला होता.

परंतु एवढे मात्र खरे की, औषधाच्या परिणामी तासाभरात तिरसिंगराव अगदी ठणठणीत उठून बसले. त्या जपान्यांशी तिरसिंगरावांनी आपल्या झकासपैकी गप्पा झोडायला सुरुवात केली.

किकावा आणि तिरसिंगराव यांनी ज्या छोट्या मोटरबोटीने पॅसिफिकमधून सागरी पर्यटनाचा प्रयत्न केला ती एक लष्करी मोटरबोट (लाँच) होती. तिरसिंगरावांच्या या प्रवासापूर्वी, काही दिवस जपानी सैन्याने लुटुपुटीच्या सागरी–युद्धासाठी तिचा वापर केला होता. त्याचप्रमाणे काही लष्करी शस्त्रसामग्री आणि दारूगोळ्याच्या सागरी वाहतुकीसाठीही त्यापूर्वी ती वापरली गेली होती. यामुळे शक्यता होती की, लष्करी दारूगोळ्यातलाच एखादा विस्फोटक बॉंब नजरचुकीने किंवा गफलतीने त्या बोटीच्या तळघरात राहिला असावा आणि आता तिरसिंगरावांच्या समुद्रपर्यटनाच्या वेळी, केवळ अपघातानेच तो उडून बोटीच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या असाव्यात...बरे तर बरे त्याच वेळी एक समुद्रतळाचे संशोधन करणारी अद्ययावत पाणबुडी त्या परिसरात पाण्याखालून भटकत होती. मोठाल्या आवाजाने त्या पाणबुडीचा संशय बळावला आणि इकडे तिकडे धावपळ करून शोध घेतल्यावर एकीकडे समुद्रतळाच्या दिशेने प्रवास करीत असलेले तिरसिंगरावांचे शरीर आणि फर्लांग दीड फर्लांग अंतरावर आणखी खोल पाण्यात किकावा यांची शरीरे सापडली होती....

....चौकशी केल्यावर किकावाही पलीकडच्याच एका दालनात झोपले असल्याचे व त्यांचीही प्रकृती झपाट्याने सुधारत असल्याची सुवार्ता तिरसिंगरावांना मिळाली. तसे तिरसिंगराव जागचे उठले आणि आपल्या या दोन जपानी सोबत्यांसह किकवांना पाहण्यासाठी, डुलत डुलत पलीकडच्या दालनात निघून गेले.

पुढे तिरसिंगरावांनी जपानी सोबत्यांबरोबर फिरून ती सगळी इमारत, दालन नि दालन बघून घेतली. इमारत मोठी झकास, अत्यंत आधुनिक पद्धतीची होती खरी, परंतु एक गोष्ट मात्र तिरसिंगरावांच्या लक्षात येईना, की या इमारतीतून बाहेर पडायचा रस्ता आहे तरी कुठे?

तिरसिंगरावांनी बिचकत बिचकतच यावर प्रश्न केला. तेव्हा त्यांना उत्तर मिळाले की, महाशय आपण समजता तशी ही इमारत कुठे भूपृष्ठावर नसून समुद्रात चांगली दीड मैल खोल पाण्याखाली ती इमारत भरभक्कमपणे उभी आहे....समुद्रतळाच्या संशोधनासाठी जपानने बांधलेली ती एक सुसज्ज प्रयोगशाळा आहे आणि तिथले रहिवासी हे सगळे म्हणजे समुद्रतळाच्या संशोधनात नाणावलेले मुरब्बी शास्त्रज्ञ आणि संशोधक आहेत.

आँ! – तिरसिंगरावांच्या भुवया पार अस्मानात उडाल्या. बोलता, बोलता तिरसिंगरावांना मग समुद्रगर्भाविषयी पुष्कळ माहिती कळली. आपल्याकडल्या सह्याद्री-हिमालयांसारखे मोठमोठे पर्वत या समुद्रतळाशी बुडाले आहेत. अशाच एका पर्वताच्या भक्कम माथ्यावर ती प्रयोगशाळा जपानने बांधली आहे. पर्वतच काय पण पूर्वीच्या काळी अस्तित्वात असणारे काही मोठे भूखंड भूकंपाने किंवा पृथ्वीच्या पोटातील प्रचंड घडामोडींनी खचून समुद्रतळाशी पोहोचले आहेत. परंतु या खंडांचा शोध घेत समुद्रतळापर्यंत जाण्यात किंवा पर्वताच्या उताराने समुद्रात खोल त्या पर्वतांच्या पायथ्यांपर्यंत पोहोचण्यात मात्र अद्याप कुणालाच फारसे यश लाभलेले नाही. समुद्रात बुडालेल्या पर्वताच्या उताराच्या रोखाने जेव्हा काही पाणबुड्या समुद्रतळाकडे जाण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा अनेक अडचणी येतात. कधी त्या पर्वतावरच्या एखाद्या प्रचंड खाचेत किंवा खोल प्रचंड गुहेत पाणबुडी अडकून तिथेच घिरटत राहते. कुठे एखादी प्रचंड दरी लागते, तर कधी त्या पर्वतावर वस्ती करून राहणारे काही महाकाय जलचर, पाणबुड्यांवर हल्ले चढवून त्यांचा चुराडा करतात....एक ना दोन अशा अनेक गोष्टी....

मधल्या या दोन-तीन तासांच्या अवधीत किकावा अगदी तब्रियत सुधारले होते. परंतु या जबरदस्त अपघातात त्यांच्या हाताला चांगलाच मुका मार बसून त्यांचा डावा

हात खुब्यातल्या हाडात निखळला होता. आपला प्लॅस्टर केलेला डावा हात बँडेज पट्टीने स्वतःच्या गळ्यात अडकवून तेही तिरसिंगराव आणि त्या जपानी तज्ज्ञ शास्त्रज्ञांच्या मैफलीत सामील झाले होते.

मग तिरसिंगराव आणि किकावा या खास पाहुण्यांच्या सन्मानार्थ एक खास अल्पोपाहाराचा कार्यक्रम प्रयोगशाळेतर्फे आखण्यात आला. किकावा किंवा तिरसिंगराव यांच्या नुकत्याच तंदुरुस्त झालेल्या शरीराला बाधक ठरतील असे सर्व पदार्थ त्या पार्टीत वगळण्यात आले होते, तरीसुद्धा ती अल्पोपाहाराची पार्टी म्हणजे तिरसिंगरावांच्या बलदंड शरीराकडे बघून बेतास बेत आखला आहे की काय, असे वाटत होते. त्यात द्राक्षे, मोसंबी, चिकू, केळी, आणखी कसली कसली जपानी फळे, शिवाय तसाच खुडून ओरबाडून नुसता मीठ लावलेला कच्चा लुसलुशीत भाजीपाला, उकडलेली अंडी, उकडलेले बटाटे, रसरशीत टोमॅटो, उकडलेले हिरवे वाटाणे....वा !– किकावा तर एवढे भुकेजले होते की आपण पार्टीत बसलो आहोत, याचा त्यांना विसरच पडला आणि एकेका खाद्यपदार्थावर नुसते ते तुटून पडले. तिरसिंगरावांचा पैलवानी खाना मात्र आपला धिम्या दमदार गतीने चालला होता. शेवटी नुकत्याच मलईपासून तयार केलेले मोठमोठे ग्लास भरून दही सर्वांनी घेतले आणि पार्टी संपली.

पुढे अर्धा पाऊण तास सर्वांनीच आराम केला.

नंतर प्रयोगशाळेने संगोपलेले मत्स्यालय बघण्याचा कार्यक्रम निश्चित झाला. भव्य कलात्मक अशा त्या मत्स्यालयाच्या दालनात प्रवेश करताच आणि तिथले ते रंगीबेरंगी मासे बघता बघता तिरसिंगरावांची मती अगदी गुंग होऊन गेली. एकदोन कप्प्यातले मासे दाखवून त्यांविषयी माहिती पुरवताना जपानी शास्त्रज्ञाने जेव्हा म्हटले की, हे मासे चवीला मोठे स्वादिष्ट आणि मजेदार लागतात, तेव्हा भान न राहून किकावांनी मिटक्याच मारल्या !

मत्स्यालय बघून परतलेले तिरसिंगराव, किकावा आणि त्यांचे तिथले इतर मार्गदर्शक येऊन, आरामखुर्च्यांवर थोडा वेळ रेलतात न रेलतात एवढ्यात वस्त्रगृहातून आणलेले काही खास वेष परिधान करण्याची नम्र विनंती एक-दोन सेवकांनी केली.

"हे कपडे आणखी कशाला अंगावर चढवायचे ?"–तिरसिंगरावांनी थोडा साचिंत मुद्रेने प्रश्न केला.

"माफ करा, परंतु तिरसिंगराव, आता आपल्याला समुद्रातल्या शिकारीच्या मोहिमेवर जावयाचे आहे."

अनुक्रम ... वि ... क्रमांक ... नोंद दि ...

“ वा ! वा ! तिरसिंगराव तर नेमबाजीचे आणि शिकारीचे मोठे शौकीन आहेत ! ” किकावांनी पुस्ती जोडली.


पाण्यात शिकारीसाठी वापरावयाचे ते खास शास्त्रीय वेष मग तिरसिंगराव, किकावा आणि त्यांच्याबरोबर जाणार असलेल्या काही शास्त्रज्ञांनीही आपल्या अंगावर चढविले.

शिकारीला निघण्यापूर्वी जपानी टेलिव्हिजनवर तिरसिंगरावांनी चित्रवार्ता ऐकली तो स्वतः त्यांच्याविषयीच !

एका अपघाती बॉंबस्फोटात ठिकऱ्या ठिकऱ्या उडालेल्या मोटारलॉंचमधून केवळ सुदैवामुळेच तिरसिंगराव नि त्यांचे साथीदार श्री. किकावा सहीसलामत वाचले असल्याचे, त्या टेलिव्हिजनवरील वार्तानिवेदकाने म्हटले होते आणि मग कुठेतरी ‘ अज्ञातस्थळी ’ मत्स्यालयातील मासे बघण्यात रंगून गेलेल्या तिरसिंगरावांचे आणि किकावांचे रंगीत चलत् दृश्यही टेलिव्हिजनच्या पडद्यावर बराच वेळपर्यंत चमकून वार्ता संपली होती.

दीड पावणेदोन मैल खोल पाण्यात असलेल्या स्थळावरून, केवढया लवकर वार्ता आणि चलत्‌दृश्यही वर जपानच्या भूपृष्ठावर पाठविले जाते, याचे ते जणू प्रात्यक्षिकच होते.

तिरसिंगराव बसले होते त्या हॉलमध्येच एका शास्त्रज्ञाने कुठलीतरी एक यांत्रिकी कळ दाबताच, बेमालूम भिंतीशी एकरूप झालेली, एक चौकट सावकाश निखळून बाजूला सरकली, आणि भिंतीत मोठ्या खिडकीएवढा एक दरवाजा तयार झाला. इतरांच्या बरोबर त्या छोटेखानी दरवाज्यातून पलीकडे जाताना, तिरसिंगरावांना वाटले की, पली-



कडेसुद्धा तसाच एक मोठा ‘ हॉल ’ असावा. पण नाही, त्या छोट्या दारातून पलीकडे माणूस नेमका एका मोठ्या पाणबुडीत प्रवेश करीत होता. ती पाणबुडी टोळाच्या मधल्या शरीरासारखी लांबोडक्या आकाराची होती आणि तिला खाली वर चौफेर काचेच्या छोट्या छोट्या स्फटिकशुभ्र वर्तुळाकार खिडक्या बसवून, पाणबुडीला जण सर्व अंगभर डोळे फुटले होते.

पाणबुडीच्या संचलनस्थळी जाऊन बसलेल्या शास्त्रज्ञाने मग आणखी कुठली तरी हाताजवळची गुप्त कळ दाबली. भिंतीतला तो छोटा दरवाजा पुन्हा भिंतीशी बेमालूमपणे एकरूप झाला आणि ‘ छॅस् ... छॅस् .... ’ असा काहीसा चमत्कारिक आवाज काढीत बघता बघता पाणबुडी समुद्रात घुसली.

पाणबुडीच्या पुढच्या तोंडाशी दोन्ही बाजूंना दोन पाण्यात चालवावयाच्या ‘ मशिनगन् ’ होत्या. पुष्कळ अंतर काटल्यानंतर, पाणबुडीच्या संचालकांपैकी एकाने माहितगारपणे सूचना केली,

“ तिरसिंगराव, समोर तो दूर अंतरावर मोठा पांढरा ठिपका दिसतोय ना ? तोच आहे आपल्याला हव्या असणाऱ्या स्वादिष्ट माश्यांचा थवा. किकावा आणि तुम्ही चालवा तुमची नेमबाजी आणि दाखवा कसब ! ”

मग एक हात गळ्यात बांधलेल्या किकावा आणि तिरसिंगरावांनी मशिनगनला डोळा भिडवून, मशिनगन नेमबाजीच्या ‘ पोझ ’ मध्ये सलाम धरली.

“ धड् धड् धड् धड्.... ”–पाणबुडीच्या दोहो बाजूंनी गोळ्यांच्या फैरी झडल्या. परंतु पहिल्या फेरीत माश्यांची शिकार फारच थोडी हाताशी लागली, त्यापेक्षा गोळ्याच अधिक खर्ची पडल्या !

परंतु पाण्यातल्या नेमबाजीच्या पहिल्या फेरीतून पुष्कळ अंदाज व खूणगाठी मनोमन बांधलेल्या तिरसिंगरावांनी दुसऱ्या व तिसऱ्या फेरीत मात्र अचूक नेमबाजीने अगदी कमाल करून दाखविली. आणि शेवटी त्यांना सूचना करायची वेळ आली की,

“ बस्स करा तिरसिंगराव, आजच्या मेजवानीला एवढे मासे पुरेत... ! ”

नंतर मग पाणबुडीच्या बाहेरून यांत्रिक पद्धतीने एक जाळे फेकून, त्यात एक जिवंत माश्यांची पलटणच्या पलटण पकडण्यात आली.

दुर्बिणीतून दूरवर दिसणारा एक प्रचंड जलचर प्राणी तिरसिंगरावांना दाखवीत, दुर्बीण धरून उभा असलेला दुसरा एक समुद्रतज्ज्ञ मग बोलला,

“ तिरसिंगराव, या अजब प्राण्याकडे आपला मोहरा वळवून लवकरच पाणबुडी आता त्याचा पाठलाग सुरू करील आणि मग एक वेगळीच गंमत आम्ही तुम्हांला दाखविणार आहोत ! ”

बघता बघता पाणबुडीने आणखी वेग वाढविला. तिरसिंगराव दुर्बिणीतून बघत होते...पाच सहा फाटे फुटल्यासारखे अवयव असलेला आणि मध्ये प्रचंड डोळ्यासारखा अवयव असलेला तो थोडा 'अमीबा'सारखा दिसणारा प्रचंड जलचर जरा पाणबुडीच्या टप्प्यात आला, तशा पाणबुडीपासून बारीक वळलेल्या कठीण दोरासारख्या वाटणाऱ्या काही चिवट धातूच्या जाडशीळ तारा त्या प्राण्याच्या दिशेने तीक्ष्ण बाणांच्या वेगात निघाल्या आणि बघता बघता त्या तारांनी त्या प्राण्याचा मधला भाग चौफेर आवळला! तारांच्या बंधनांतून सुटण्यासाठी त्या प्राण्याने मग केवढीतरी विलक्षण धडपड केली....

तिरसिंगरावांच्या आणि किकावांच्याबरोबरच दुर्बिणीतून नजर लावून बसलेला तो अनुभवी शास्त्रज्ञ मात्र विलक्षण थंड आवाजात बोलला,

"तारांच्या कचाटयातून सुटण्याची ही या जलचराची सगळी धडपड व्यर्थ आहे तो सुटू शकणार नाही. खरे म्हणजे या अजब प्राण्यात एवढी ताकद आहे की, आपली. ही संपूर्ण पाणबुडी आपल्या कवेत घेऊन ती तो चुरडून टाकू शकेल...परंतु तेवढी त्याची हिंमत होणार नाही!"

"कारण?"

"कारण,"—आपले निवळशंख समर्थ बोलके डोळे तिरसिंगरावांवर रोखीत तो पुढे म्हणाला,

"पाणबुडीच्या भोवतीभर विजेचे संरक्षक कवच आहे....एकदोनदा या प्राण्यांनी पाणबुडीवर हल्ला चढविण्याच्या प्रयत्नात या विजेचे तडाखे' 'खाल्लेले आहेत.... अनुभवाने आता ते शहाणे झाले आहेत....समुद्रात आणखी खोल जायचा आपण प्रयत्न केल्यास....याहूनही महाबलाढ्य चित्रविचित्र अज्ञात जलचरांशी आपली गाठ पडते... परंतु त्यातले काही प्राणी या विजेच्या संरक्षक कवचालाही दाद देत नाहीत....!"

"ते असो....आता या प्राण्याची खरी गंमत तर बघा!" लागलीच पाणबुडीला गती देणारी सगळी यंत्रे बंद करण्यात आली, आणि दोन्ही मशिनगनमधून त्या समोर दूरवरच्या प्राण्यावर जोरदार गोळ्यांचा वर्षाव करण्यात आला....गोळ्यांच्या वर्षावांनी तो प्राणी एवढा बेजार झाला की, सुटण्यासाठी वेगाने पुढे धावू लागला....आणि त्याबरोबर पाणबुडीही वेगाने पुढेपुढे खेचली जाऊ लागली. तिलाही जोराची गती मिळाली.

मग योग्य त्या तारा खेचून त्या प्राण्याच्या धावण्याला योग्य ती दिशाही वेळोवेळी देण्यात येत होती. असा तो 'पाणरथ' त्या जलचराने पार परत मूळ प्रयोगशाळेपर्यंत खेचून आणला आणि मगच त्याची तारांच्या बंधनातून सुटका झाली!

दुसऱ्या दिवशी तिरसिंगराव व किकावा थोडे लौकरच उठले. रात्री शिकारीतल्या त्या माश्यांच्या कालवणाने जेवणात एवढी रंगत भरली होती की, सकाळी बिछान्यावरून उठता उठवत नव्हते....रात्री मस्त जेवण आणि मग अशी मस्त झोप लागली होती की यंवरे यंव....

परंतु उठणे भाग पडले. कारण लौकरात लौकर जपानच्या भूपृष्ठावर व तेथून पुढे विमानाने तिरसिंगरावांना भारतास यावयाचे होते; शिवाय 'मोटरलाँचच्या स्फोटात तिरसिंगराव सापडले होते, या वार्तेने अगोदरच जपानमध्ये व भारतात मोठी खळबळ उडवून दिली होती.

पाणबुडीने किकावा आणि तिरासिंगराव जेव्हा याकोहामा बंदराकडे यावयास निघाले, तेव्हा वाटेत तिरसिंगरावानी मोठ्या कुतूहलाने एक प्रश्न केला,

"कायहो, रशिया आणि अमेरिकेने समुद्रतळाच्या संशोधनात अशी काही आघाडी मारली असेल ?"

"आघाडी ?"—त्या पाणबुडीतले सानो नावाचे एक वयोवृद्ध जपानी शास्त्रज्ञ मंदपणे प्रथम हसले आणि पुढे बोलले,

"उद्या रशियानं किंवा अमेरिकेनं समुद्राच्या गर्भात मोठमोठी शहरं वसविली आहेत आणि प्रचंड कारखाने उभे केले आहेत, अशी वार्ता जर प्रसिद्ध झाली, तर त्याचं काहीएक आश्चर्य आम्हांला वाटणार नाही !"

याकोहामा बंदरापासून जवळजवळ वीसएक मैलांवर पोहोचल्यावर मग त्या पाणबुडीने पाण्याच्या पृष्ठभागावर तोंड काढले. तेथे ठरलेल्या संकेताप्रमाणे अगोदरच एक मोटरलाँच येऊन उभी होती. समुद्रातल्या प्रयोगशाळेच्या मालकीच्या त्या पाणबुडीच्या, जलसंचाराच्या मर्यादा ठरलेल्या होत्या. मग तिरसिंगराव नि किकावा यांनी कृतज्ञतेने ओथंबलेल्या अंत:करणाने त्या पाणबुडीचा आणि पाणबुडीतल्या शास्त्रज्ञांचा निरोप घेतला.

पाणबुडीतून उतरून मोटरलाँचमध्ये तिरसिंगराव व किकावा चढल्यानंतर हळूहळू त्या मोटरलाँचने गती घेतली. अर्धाएक मैल अंतर काटले असेल नसेल, एवढ्यात 'फाड्दिशी' मोटारलाँचमधून मोठ्यांदा अचानकपणे आवाज आला. तिरसिंगरावांची सावध नजर चौफेर फिरली. किकावा तर पार भेदरून बिचकले आणि त्यांनी मनात पुन्हा संशय बळावून प्रश्न केला,

"काहो, या 'मोटरलाँच'मध्ये पुन्हा एखादा भयंकर बाँबस्फोट होण्याची तर भिती नाही ना ?"

"नाही, नाही." —मोटरलॉंच मध्ये एक जपानी लष्करातला कमांडर बसला होता, तो मिस्किलपणे हसत बोलला,

"आत्ता आवाज झाला तो एक 'लाईफगार्ड' म्हणून वापरली जाणारी हवा भरलेली मोठी टायर फुटल्याचा."—आणि समोर एक टेलिव्हिजनसेटप्रमाणे पसरलेल्या यंत्राकडे बोट दाखवीत तो पुढे बोलला,

"ते बघितलंत? या लॉंचमधल्याचं काम. लॉंचमध्येच काय परंतु आसपास चार पाच मैलांच्या परिसरात कुठं एखादा बॉंब असेल, तर त्याचा नेमका इशारा हे यंत्र देईल व त्या बॉंबच्या स्फोटापूर्वीच तो बॉंब हस्तगत करण्यालाही, हे यंत्र आपल्याला सहकार्य करील!"

तिरसिंगरावांनी सुटकेचा एक निःश्वास सोडला व म्हटले,

"मग चला तर."

मोटरलॉंच वेगात याकोहामा बंदराच्या दिशेने धावू लागली.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ............... दि ...............
क्रमांक ............... नोंद दि ...............

# तिरसिंगराव आफ्रिकेत-

मसाका, किसोबो, बुकोबा, डोडोमा, मॉंझा, नैरोबी....ही सगळी, काही शहरांची नावे आहेत, असे जर तिरसिंगरावांना कुणी सांगितले असते तर त्यांना ते स्वप्नातदेखील खरे वाटले नसते. परंतु आफ्रिका खंडातल्या या शहरांपैकी त्यांतल्याच एका डोडोमा नावाच्या शहराला भेट देण्यासाठी जाणार असलेल्या भारतीय शिष्टमंडळात तिरसिंगरावांची निवड झाली आहे, हे जेव्हा तिरसिंगरावांना कळले, तेव्हा त्यांच्या भुवया अस्मानात उडाल्या ! या शिष्टमंडळाबरोबर जाऊन, तिरसिंगरावांनी भारतीय मल्लविद्येबद्दलची काही 'प्रात्यक्षिके' आफ्रिकेत दाखवावीत अशी अपेक्षा होती. आफ्रिकेत जायला तिरसिंगराव तितकेसे उत्सुक नव्हते. परंतु शिष्ट-मंडळाबरोबर जाणार असलेल्या तिरसिंगरावांच्या काही जवळच्या स्नेह्यांनी फारच आग्रह धरला आणि तिरसिंगरावांची 'स्वारी' तयार झाली.

—चला, म्हणता तर चला !

शिष्टमंडळाबरोबर आफ्रिकेत जाण्यासाठी तिरसिंगराव विमानतळावर दाखल झाले.... परंतु प्रत्यक्ष डोडोमा शहरात पोहोचल्यावर मात्र इतर शिष्टमंडळांबरोबर तिरसिंगरावांचा देखील मोठाच विरस आणि अपेक्षाभंग झाला; कारण डोडोमा शहरापेक्षा, भारतातली फार कशाला, महाराष्ट्रातलीदेखील, पुष्कळशी शहरे कितीतरी पटींनी सुधारलेली, आखीव-रेखीव आणि आकर्षक वाटत होती. डोडोमा शहरातला आपला फुरसतीचा, मोकळा वेळ घालविण्यासाठी तिरसिंगरावांनी मग एक निराळीच युक्ती शोधून काढली. आफ्रिकन सरकारने शिष्टमंडळाच्या तैनातीसाठी देऊ केलेली मोटरगाडी घेऊन असा मोकळा वेळ ते सबंध दिवस डोडोमा शहराभोवतालचा जंगलरम्य (!) परिसर पाहत, फिरण्यात घालवीत आणि सायंकाळी, दिवस बुडायच्या सुमारास, आपल्या निवासस्थानी परतल्यावर बरोबर गाडीतून नेलेले 'शिष्टमंडळ' सुखरूप परत फिरले आहे, की एखाद्या महा-

भागाला गुपचुप जंगलातल्या अफ्रिकन सिंहाने किंवा वाघाने पळवून नेले किंवा काय, याची 'मोजदाद' करीत.

डोडोमा शहरात येऊन पोहोचल्यानंतर, तिसऱ्या की चौथ्या दिवशीचा हा प्रसंग. अशाच मजेच्या सफरीसाठी तिरसिंगराव आपल्याबरोबरच्या सगळ्या शिष्टमंडळासकट बाहेर पडले होते. गाडीने डोडोमा शहरापासून राजरस्त्याने दीड एक मैलाचे अंतर काटले. पुढे त्या राजरस्त्याला, आपल्याकडल्या बैलगाडीच्या वाटेसारखी एक आडवाट फुटली होती आणि ती पार कुठेतरी सुसाट जंगलात घुसली होती. तिरसिंगरावांनी ठरविले की, राजमार्गाने न जाता आज या आडवाटेनेच थोडी जंगलची सफर करून परत फिरायचे. परंतु गाडीचा ड्रायव्हर त्या आडवाटेने गाडी जंगलात घुसवायला का-कू करायला लागला. या जंगलातून वसती करून राहणारे वाघसिंहांसारखे हिंस्र, क्रूर, वन्य पशू, जंगलातल्या वन्य पशूंइतक्याच भयंकर आफ्रिकन वन्य जमाती, शहरी सुधारलेल्या लोकांविषयी यांच्या मनात असलेली द्वेषाची भावना....असे शहरी लोक जंगलात आडबाजूला तावडीत सापडले की, या वन्य रानटी जमातींनी त्यांचा केलेला क्रूर, अमानुष छळ यांच्या नुसत्या विलक्षण कथा सांगता-सांगताच गाडीच्या ड्रायव्हरला दरदरून घाम फुटला!

परंतु तिरसिंगराव कसचे काय जुमानतात? त्यांनी गाडीच्या ड्रायव्हरला खाली उतरवून चक्क त्याला परत पाठवले, आणि इतर सहकाऱ्यांची कुरकूर चालली होती तरी तिरसिंगराव स्वतःच गाडीच्या 'ड्रायव्हिंग व्हील'वर बसले आणि गाडी थेट, त्या आडवाटेने जंगलात घुसवली.

त्या आडवाटेने गाडी किती मैल आत दाट जंगलात घुसली हे लक्षात आले नाही. पुढेपुढे तर ती वाटही पुसट झाली होती. गुडघा ते कमरभर उंचीच्या दाभणकाठी गवताचे जिकडेतिकडे नुसते रान माजले होते. गवताची पाती नि देठ मुरगाळीत गाडी जंगलातून भन्नाट धावत सुटली होती. पुढे गवताच्या भरीला अधूनमधून पाणथळ आणि दलदल सुरू झाली. घटकेघटकेला पाणथळीत नि दलदलीत गाडीची चाके रुतून बसायला लागली.

मग तिरसिंगरावांनी परत शहराकडे वळायचे ठरविले. परंतु परतीची वाट म्हणून नेमकी गवसेना. कारण परतीच्या वाटेवरल्या ज्या म्हणून झाडाझुडपांच्या खुणा तिरसिंग-रावांनी लक्षात ठेवल्या होत्या, तसलीच सगळी झाडे नि झुडपे चौफेर आढळायला लागली. मध्येच कुणीतरी जवळपास खदखदा हसत असल्याचा भास व्हायचा...गाडी थांबवून

इकडेतिकडे शोधक नजरेने पाहावे तर कुणीच दिसत नसे. बारकाईने शोध घेतल्यावर, पुष्कळ वेळाने लक्षात आले की, ती हसणारी झाडे आहेत. वारा वाहू लागला की त्या त्या विशिष्ट झाडांची पाने सळसळतात आणि कुणीतरी खदखदा हसत असल्याचा भास होतो! वाघ-सिंहांच्या डरकाळ्याही दूरवरून ऐकू येत. मध्येच दोन-चार तरी कांतिमान तेज:पुंज असे सर्पराज हिरवे गवत मोडीत सळसळत वेगाने कुठेतरी नाहीसे झाले. तिरसिंगरावांसकट त्यांचे ते सगळे शिष्टमंडळ आणि ती गाडी चांगलीच चकव्यात पडली.

डोडोमा शहराकडे म्हणून निघालेले तिरसिंगराव पुढे मग ज्या ठिकाणी येऊन पोहोचले, तिथे रबराच्या किंवा सूचिपर्णी वृक्षांसारख्या झाडांनी अस्मान नुसते आच्छादून निघाले होते. गर्द पालवीच्या झाडांच्या त्या उंचच उंच शेंड्यांमधून वाट काढीत सूर्याचे किरण कसेबसे जमिनीपर्यंत पोहोचू शकत होते. त्या महाकाय वृक्षांच्या बुंध्यांभोवतीच गाडी कितीतरी वेळ नुसतीच गुरगुरत होती. त्यातूनही डोडोमा शहराकडची वाट शोधण्याचा आणि गांगरलेल्या आपल्या इतर सहप्रवाश्यांना धीर देण्याचा प्रयत्न तिरसिंगराव मोठ्या कसोशीने करीत होते.

परंतु तेवढ्यातच अचानक चमत्कारीक आरोळ्या ऐकू आल्या आणि तीक्ष्ण दुधारी तीरकमठ्यांच्या टोकदार बाणांचा गाडीवर चारी दिशांनी नुस्ता एकच वर्षाव झाला. बाणांच्या वर्षावाने गाडीचा टप तर ताशासारखा तडतंडा वाजायला लागला.... आणि नेमका रबरी टायरांचा वेध घेतलेल्या बाणांनी तर भासदिशी टायरीतली हवा जाऊन गाडी भुईसपाट झाली.

निरुपाय होऊन तिरसिंगराव आणि त्यांचे सहकारी जेव्हा गाडीबाहेर आले, तेव्हा रंगीबेरंगी, चित्रविचित्र अशा पिसांचे मुकुट डोकीवर चढवलेल्या, कमरेखालच्या शरीरावर चर्मवस्त्र गुंडाळलेल्या आणि हातांत तिरकमटे, धनुष्य व इतर भाले, कुऱ्हाडींसारखी ओबडधोबड हत्यारे धारण केलेल्या जंगली निग्रो वन्य जमातीच्या एका टोळक्याने त्या गाडीभोवती कोंडाळे केले. झाडाझुडपामागून आणि उंचउंच झाडांच्या फांद्यांवरून खाली जमिनीवर उड्या घेऊन, हे सगळे जंगली योद्धे तेथे जमा झाले होते. तांबड्या, हिरव्या, पिवळ्या.... अशा विविधतर रंगांनी त्यांची तोंडे रंगवली होती आणि पापण्यांच्या कडांवर काजळाप्रमाणे, पांढरे फराटे ओढले होते. अंगात नालसाब भरल्याप्रमाणे हातातली सगळी हत्यारे उंचावून, ती थरथरवीत आणि कसलेबसले चमत्कारिक, कर्णकर्कश चीत्कार काढीत ते त्या गाडीभोवती कडे करून, दाणदाण भुई हादरवीत नाचू लागले. आपल्या शत्रूला किंवा शिकारीतल्या सावजाला पूर्णपणे कैचीत पकडल्याचा विजयोन्मादच जणू ते अशा प्रकारे साजरा करीत होते.

तिरसिंगरावांनी आपल्या सर्व सहकाऱ्यांसह हात उंचावून आपली 'शरणागत' स्पष्ट केली. मग त्या निग्रो टोळक्यातल्या काही जणांनी पुढे येऊन तिरसिंगरावांना आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनाही हाताला काढण्या लावल्या. उंचउंच झाडांच्या दाटीतून वाट काढीत ते लटांबर मग कितीतरी वेळ पुढेपुढे चालले होते.

पुष्कळसे अंतर चालून गेल्यावर झाडांची गर्दी विरळ झाली. मध्यभागी ऐसपैस गवताळ पटांगण पसरले होते. आजूबाजूला काही दगडी गुहा आणि झाडाझुडपांपासून तयार केलेली झोपडी–पर्णकुटीवजा घरे पसरली होती. हीच ती त्या वन्य जमातीची वसाहत असावी. वसाहतीच्या मध्यावर एक माणसांचे कोंडाळे बसले होते. तिथेच एका उंचच उंच लाकडी आसनावर एक मग्रुर चेहऱ्याची आणि अधिकाधिक जंगली पद्धतीच्या वेषभूषेने मढवली गेलेली भरभक्कम असामी बसली होती. बहुधा तो त्या टोळीचा नायक, म्होरक्या किंवा राजा असावा. कारण तिरसिंगराव आणि त्यांच्या सर्व बंदिस्त सहकाऱ्यांना त्याच्यासमोरच नेऊन हजर करण्यात आले. कुणीतरी एकाने पुढे होऊन वर्दी दिली. त्यावर तो म्होरक्या विकट हसला आणि काडकाड काहीतरी कर्कश बोलला.

मग तिरसिंगरावांची आणि त्यांच्या सहकाऱ्यांची फारकत करण्यात आली. बाकीच्या सगळ्या सहकाऱ्यांना नेऊन एका गुहेत कोंडण्यात आले आणि तिरासिंगरावांना एका भल्याभक्कम झोपडीत डांबून टाकण्यात आले.



आता पुढे काय, हा प्रश्न तिरसिंगरावांसमोर होताच. परंतु दिवसाचा तिसरा प्रहर सुरू होण्याच्या सुमारास तिरसिंगरावांना त्या बंदिखान्यातून बाहेर काढण्यात आले. काढण्या लावलेल्या तशा बंदिस्त अवस्थेतच चालविण्यात आले.

मघाच्या त्या ऐसपैस पटांगणात, आता वसाहतीतली सगळी वन्य जमात एकवटली होती. एका बाजूला उच्चासनावर मघाचा तो म्होरक्या आणि त्याच्या दोन्ही बाजूंना त्याचे सरदार—मानकरी आपआपल्या आसनावर विराजमान झाले होते.

पटांगणाच्या अगदी मध्यभागावर आणून तिरसिंगरावांना मोकळे करण्यात आले. दूरवर टोकाला एका माजलेल्या रानगेंड्याला धरून दोघेचौघे शिकारी उभे होते. तिरसिंगराव आणि तो रानगेंडा दृष्टीस पडताच, बघ्यांच्या समुदायाला कसे उत्साहाचे भरते आले! तेवढ्यात जवळच एका मोठमोठ्या धोंड्यांनी बंद केलेल्या गुहेतून वाघ-सिंहांच्या डरकाळ्या ऐकू आल्या म्हणजे अगोदर तिरसिंगराव आणि त्या चवताळलेल्या रानगेंडयाची 'झुंज' लावून द्यायची आणि नंतर तिरसिंगरावांच्या सगळ्या सहकाऱ्यांना त्या भुकेजलेल्या वाघ-सिंहांच्या तोंडी द्यायचे, असा एकूण प्रेक्षणीय कार्यक्रम होता तर !

बघता बघता निग्रो शिकाऱ्यांनी मागल्या बाजूने त्या रानगेंडयाला पराण्या टोचल्या.... तिरसिंगरावांचा रोख धरून रानगेंडा मुसंडी मारून धावायला लागला...आणि निग्रो शिकाऱ्यांनी त्याला ( रानगेंड्याला ) पूर्णपणे मोकळे सोडले.

रानगेंडा अगदी जवळ येईपर्यंत तिरसिंगराव जागीच सावध होते.... परंतु आता रानगेंडयाची प्राणांतिक धडक आपल्याला बसणार एवढयात त्यानी शिताफीने त्या गेंड्याला झुकांडी दिली आणि गेंडा जो उधळत तसाच पुढे निघून गेला तो पार त्याने प्रेक्षकांचे कडे मोडून एकच धावपळ उडवून दिली. पुढे एका प्रचंड वृक्षाच्या बुंध्याशी डोस्कीची धडक झाल्यावरच क्षणभर तो जाग्यावर थांबला....

परंतु झाडाशी धडक खाल्ल्यानंतर त्याचे मस्तक अधिकच भडकले. त्याने पलटी खाल्ली आणि तिरसिंगरावांच्या रोखाने पुन्हा नव्या जोमात गती घेतली....हल्ला चढविण्यासाठी गेंडा आपल्या दिशेने पुन्हा येत आहे हे बघितल्यावर तिरसिंगराव त्याच्याकडे पाठ फिरवून तसेच बेफामपणे पुढे धावत सुटले.... जाता जाता मध्येच एका बाजूला पडलेला एक तीक्ष्ण दुधारी भलाभक्कम भाला मात्र झटकन् उचलून हातात घेतला.... पटांगणापलीकडे लगतच असलेल्या एका उंच झाडाच्या बुंध्यापाशी ते थबकले. या झाडाची एक लांबलचक भक्कम फांदी त्याच्या डोकीवरून हात दीड हाताच्या उंचीवर

पसरली होती. तिरसिंगरावांनी भाला आपल्या तोंडात आडवा धरला आणि गेंडा अगदी जवळ येऊन पोहोचताच कागदिशी उडी घेऊन ते वर झाडाच्या फांदीवर गेले !

काय होतं काय नाही हे कळण्याअगोदरच गेंडा या दुसऱ्या वेळीही झाडाच्या भक्कम खोडालाच धडकला.... पुन्हा त्याच्या मस्तकात आणि डोळ्यापुढे काजवे चमकले.... परंतु क्षणार्धात शिताफीने तिरसिंगरावांनी फांदीवरून जी झेप घेतली ती नेमकी गेंडयाच्या पाठीवरच !

गेंडयाच्या पाठीवर मांड ठोकून तिरसिंगराव अगदी जाम स्वार झाले. गेंडयाने मागचे आणि पुढचे पाय हवेत उडवून.... आडवेतिडवे धावून, उसळ्या घेऊन.... तिरसिंगरावांना पाठीवरून फेकून देण्यासाठी लाख कोशिस केली, परंतु शेवटी त्याचीच दमछाक निघाली....

मग तिरसिंगरावांनी पुन्हा दुसरी संधी साधली. आपल्या हातातल्या भाल्याचे लांबलचक निमूळते पाते ओणवे होऊन आणि हात लांबवून, गेंडयाच्या फुसांडत असलेल्या एका अंगाच्या लिबलिबीत नाकपुडीत इतक्या जोरात हाणले की ते भासदिशी दुसऱ्या नाकपुडीतून बाहेर आले. मग मासे पकडायच्या गळासारखा, ताकदीने वाकवून तिरसिंगरावांनी त्या भाल्याचा आकडा तयार केला आणि गेंडयाच्या पाठीकडच्या बाजूला लांबपर्यंत पसरलेली भाल्याची मागची फेकीची बाजू आपल्या हातात धरून गेंडयाला लगलीच 'लगाम' घातला. नाकात घातलेल्या त्या 'लगामा'ला पाठीवरून तिरसिंगरावांनी जरा हिसडा दिला तरी आता गेंडा हवा तिथे एकाच जागेवर थांबत असे, नाहीतर तिरसिंगरावांनी इशारा करताच त्यांना हव्या असेल त्या दिशेने, गतीने धावायला सुरुवात करीत असे.

एवढे झाल्यावर तिरसिंगरावांनी गेंड्याची मुसंडी वळविली ती नेमकी तो म्होरक्या बसला होता त्या उच्चासनाकडे....तिरसिंगराव स्वार झालेले गेंडयाचे धूड आपल्याच रोखाने येत आहे म्हटल्यावर, म्होरक्याजवळच्या सरदार–मानकऱ्यांत एकच पळापळ उडाली....आपल्या उंच आसनावरून उतरून, पळ काढण्यापूर्वीच त्या म्होरक्याच्या आसनाला गेंड्याने धडक दिली व त्या आसनासकट तो म्होरक्या मागच्या अंगाला उताणा कोसळला !

पण तेवढयातल्या तेवढयात उठून त्याने पळायला सुरुवात केली. तिरसिंगरावांनीही त्याच्या मागोमाग आपल्या गेंडयाला पळवायला सुरुवात केली. जिवाच्या भीतीने म्होरक्या मग मध्येच सरसर एका झाडावर चढून बसला. परंतु तिरसिंगराव कसले वस्ताद ! त्यांनी गेंड्याला थोडे मागे घेतले आणि धडाधड त्या झाडालाच धडका द्यायला सुरुवात केली ....रानगेंड्याच्या धडकांनी ते झाड गदगदा मुळासकट हलायला लागले.

आणि माकडासारखा झाडाच्या फांदीवर चढून बसलेला तो म्होरक्या आता मात्र हातापाया पडल्यासारखा आविर्भाव करीत, केविलवाण्या आवाजात तिरसिंगरावांना गयावया करू लागला. दीनपणे त्यांची क्षमा मागू लागला....तसे 'लगाम' ओढून तिरसिंगरावांनी गेंड्याची धडक थांबवली. करड्या हुकमी आवाजात त्या म्होरक्याला झाडावरून खाली उतरायला लावले. तसाच गेंड्यापुढे घालून त्याला पळवत मूळ त्याच्या वस्तीवर आणले. आपल्या सगळ्या सहकाऱ्यांना बंधमुक्त करविले. सकाळी मोटारगाडीवरच्या हल्ल्यात लुटून आणलेली सगळी चीजवस्त परत करायला भाग पाडले. त्यात दोन-तीन शिकारी बंदुकाही होत्या !-आणि मगच तिरसिंगराव आपल्या गेंड्यावरून खाली उतरले व निग्रो शिकाऱ्याच्या साहाय्याने त्यांनी तो गेंडा दोन झाडांच्या मध्ये बांधला.

—रात्रीची वेळ. सर्वत्र शुभ्रधवल चांदणे पसरले होते. त्या निग्रो जंगली वसाहतीत एकच धावपळ उडाली होती. तिरसिंगराव व त्यांच्या सहकाऱ्यांच्या सन्मानार्थ त्या वन्य निग्रो जमातीने एक जंगी मेजवानीचा बेत आखला होता. मशाली आणि पलिते जागजागी ढणढणा जळत होते. तिरसिंगरावांचे सगळे सहकारी व इतर त्या वन्य



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ........................ वि ..............................

जमातींचे पुढारी नेते येऊन आपआपल्या जागेवर केव्हाचेच विराजमान झाले होते. अद्याप तिरसिंगरावांचा आणि त्या निग्रो म्होरक्याचाच पत्ता नव्हता.

परंतु तेवढ्यात ललकारी घुमली. ढोल, डमरू, शिंग, शंख अशा नानाविध चमत्कारिक आवाजांचा वाद्यमेळ झंकारला व त्या तालावर तिरसिंगराव, तो म्होरक्या आणि त्याचा लवाजमा डुलत, डुलत त्या मेजवानीच्या स्थळाकडे येऊ लागला.....तिरसिंगरावांचा वेष नखशिखान्त बदलला होता ! त्या निग्रो म्होरक्याप्रमाणेच मस्तकावर त्यांनी रंगीबेरंगी पिसांचा उंची मुकुट चढविला होता. जंगलातील पक्ष्यांच्या पांढऱ्याशुभ्र पिसांची सुंदर कलाकुसर केलेल्या सुरेल उंची गर्भवस्त्राने त्यांनी आपले कमरेखालचे अर्धे अंग आच्छादिले नि भूषविले होते. दंडांत नि मनगटांत हस्तिदंती कडे घातले होते. गळ्यात उंची लखलखीत हिऱ्या-माणकांसारख्या दिसणाऱ्या मण्यांच्या माळा घातल्या होत्या. त्रिशूळध्वजा एक उंच भाला त्या निग्रो म्होरक्याइतकाच ऐटीत तिरसिंगरावांनी आपल्या हातात धरला होता. चेहऱ्यावर वेगवेगळ्या रंगांची वर्तुळे उठवली होती.

तिरसिंगराव आणि तो म्होरक्या टेबलाजवळच्या आपल्या मुख्य आसनाजवळ येऊन पोहोचताच टाळ्यांचा नि आरडाओरडीचा एकच जल्लोष उडाला. मग त्या म्होरक्याबरोबर हात उंचावून तिरसिंगरावांनीही सर्वांना अभिवादन केले.

थोड्याच वेळात मेजवानीच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. आपल्यासमोरचा मेजावरचा नारळीच्या करवंटीचा मोठासा कुंभ त्या म्होरक्याने उचलला नि तोंडाला लावून त्यातले पेय गटागटा प्यायला सुरुवात केली. तिरसिंगरावांनीही मग मागेपुढे न पाहता आपल्यासमोरचा दुसरा कुंभ उचलून बेधडकपणे अगदी रुबाबात तोंडाला लावला. आतले पेय मोठेच मधुर आणि थोडेसे मादकही होते. पेय पिऊन होताच म्होरक्याने तो कुंभ पुन्हा समोर टेबलावर ठेवला आणि हाताचा पंजा तोंडाजवळ धरून जोरात पुकारा केला,

"यलोलोलोलो ऽ ऽ ऽ बापाढ्र ऽ बापाढ्र ऽ कुंबा !"

—या विचित्र प्रकाराने तिरसिंगराव क्षणभर विस्मयात पडले, परंतु जेव्हा त्यांना कळले की, आपल्या मनातला आनंद व्यक्त करण्याची ती त्या वन्य जमातीची पद्धती आहे. तसे आपल्या समोरच भारतातून आलेले बंधूही या मेजवानीला हजर आहेत, हे आपल्या गावीही न ठेवता, तिरसिंगरावांनीही आपल्या डाव्या हाताचा पंजा तोंडावर आडवा धरला आणि त्या म्होरक्यापेक्षाही सवाई आवाजात पुकारा केला.



“ यलोलोलोलो ऽ ऽ ऽ वापाळ्ळ ऽ वापाळ्ळ ऽ ऽ कुंबा ! ”

—दुसऱ्या दिवशी सकाळी त्या वन्य जमातीतले पुष्कळसे म्होरके व नेते तिरसिंगराव व त्यांच्या सहकाऱ्यांना पार त्यांच्या त्या भुईसपाट झालेल्या गाडीच्या स्थळापर्यंत पोहोचवायला आले होते. गाडी दुरुस्त करून ती वाटेला लावण्यापर्यंतच्या ‘ कार्या ’तही मग त्या रान-दांडग्या राकट गड्यांनी, तिरसिंगरावांना पुष्कळ मोलाचे सहकार्य दिले.

★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ... ... दि ...
क्रमांक ... ... नोंद दि ...

# तिरसिंगराव आणि शिवजयंत्युत्सव

पहाटे, रामप्रहरचा वेळ.

नुकतेच झुंजूमुंजू होत चालले होते. रंकाळा तलावाकाठच्या तालीमखान्यात पहाटे चार-साडेचार वाजल्यापासून चाललेला तिरसिंगरावांचा व्यायाम....जोर, बैठका, मलखांब, वजन उचलणे, करल फिरविणे, एक ना दोन, अनेक पद्धतींचा व्यायाम घेऊन तिरसिंगराव अगदी घामाघूम झाले होते. हौदाच्या काठावरल्या एका खांबाला रेलून आता त्यांचे दम खाणे चालले होते. तेवढयात तालीमखान्याच्या अतूट उंचीच्या दरवाज्यातून एक माणसाची आकृती आतमध्ये डोकावली आणि चिचकत बाचकत बोलली,

" त्-तिरसिंगराव.... पैलवान तिरसिंगराव हाईत काय ?"

" हाय की...." घोगऱ्या दमगीर आवाजात तिरसिंगराव डरकाळले,

" कोन आलंया ?"

" तिरसिंगराव...मी बारीकराव !"

" या आत, काय काम काढलंय ?"

" काम तसं काय न्हाई जी, गडमुडशिंगीच्या पाटलांनी.... ?"

" कुणी खंडोजीराव पाटलांनी ?"

" व्हय त्येनीच....तुमास्नी निरोप धाडाल्याला हाय, पर्वाच्याला गडमुडशिंगीत शिवजयंत्योक्....त्योक्....त्योक्...."

" त्योक्....त्योक् काय भानगड हाय ?"

" न्हवं. पर्वाच्याला आमच्या गडमुडशिंगीत शिवजयंत्योक्...त्योक्"

" हां, हां, शिवजयंत्युत्सव ! मग सरळ शिवजयंती साजरी करायची हाय म्हना की "

" त्येच; शिवजयंतीच साजरी हुनार हाय गडमुडशिंगीत पर मी पत्रिकेत छापल्या-परमानं बोलायचा प्रयेत्न करीत हुतो. त्येनं जिभ आडत हुती माजी...तर खंडोजीरावांनी एस्प्रेस सांगावा धाडलाया तुमास्नी की तुमी याळाच पायजे. तुमीच पेईंग गेष्ट हायसा या समारंभाचं ".

" पेईंग गेष्ट न्हवं मेन् गेष्ट म्हणा. "

" त्येच; मेन गेष्ट आणि अध्यक्षबी हाईसा या शिवजयंत्योक्....त्योक्...."

" शिवजयंत्युत्सव ! " मग बारीकरावांनी पुढे केलेली उत्सवाची निमंत्रणपत्रिका तिरसिंगरावांनी आपल्या हातात घेतली. समारंभाचे अध्यक्ष आणि प्रमुख पाहुणे म्हणून चक्क या पत्रिकेवर तिरसिंगरावांचेच नाव छापलेले होते. इतर कुणी असता तर तिरसिंग-रावांनी स्पष्ट नकार दिला असता आणि वर न विचारता समारंभाच्या पत्रिकेवर नाव छापल्याबद्दल जाबही विचारला असता. परंतु शिवजयंत्युत्सव आणि त्यातही गडमुड-शिंगीच्या खंडोजीराव पाटलांसारख्या जिवलग स्नेह्याचा आग्रह म्हटल्यावर, तिरसिंगराव काय नाही म्हणतात ?

जरा इकडे तिकडे आढेवेढे घेतल्यासारखे करून, तिरसिंगरावांनी होकार दिला आणि बारीकरावांचा जीव भांड्यात पडला.

तिरसिंगरावांकडून येण्याचे ठाम आश्वासन मिळाल्यावर, बारीकराव तुरूतुरू जायला निघाले.

" बरं तिरसिंगराव, जातो मी. "

" अहो बारीकराव, थांबा. "

" आँ ? "

" न्हवं, माझ्या तालमीच्या वेळेत आलासा तर एवढं खुराकात घोटलेलं मसाल्याचं दूध तरी पिऊन जावा गलास भर. "

" हां...हां....पेतो की. "

ग्लास कसला, चांगला मोठा काचेचा जग भरून तिरसिंगरावांनी तो बारीकरावा-पुढे ठेवला. दोन्ही हातांनी जग उचलून घेऊन, कसाबसा त्यातला पाव एक भाग बारीक-रावांनी नेटाने रिचवीत आणला.

" गुडुक्....गुडुक्....बुड्....बुड्....गुडुक ! " अर्धा जगभर दूध पोटात गेले आणि मग बारीकरावांनी आपला चेहरा कसाबसासा करून म्हटले,

“ तिरसिंगराव, आता काय पुडं पेववत न्हाई....बास्!” खरे म्हणजे दुधाने भरलेला तो जग बघूनच अगोदर बारीकरावांना हुडहुडी भरली होती.

“ आरं हॅट पिववत न्हाई म्हणून कसं भागल....एवढं मर्द जवान गडी तुमी.... उठा, लंग कसलेली हाये न्हवं ?”

“ हाय की.”

“ कापडं काडा, आनि सुरू करा माझ्याबरोबर व्यायाम. मग दूध कसं रिचत न्हाई त्ये मी बघतो....”

मग तिरसिंगरावांनी आग्रहाने बारीकरावांना अंगावरचे सगळे कपडे काढायला भाग पाडले. तिरसिंगरावांच्या सांगण्याप्रमाणे बारीकराव व्यायाम करायला—जोर बैठक काढायला उभे राहिले....पाच पन्नास बैठका मारल्या.

“ एक्कावन, बावन, त्रेपन....अयाया ! तिरसिंगराव मांडी भरून याला लागली हो ?”

“ मग आता जोर मारा.”



वीस बावीस जोर मारले आणि दम फुटल्याने बारीकराव मुरगाळून जमिनीवर उताणे पडले.

परंतु तिरसिंगराव कसले बारीकरावाला दम खाऊ देतात ? तसेच त्या बारीकरावाला उचलले आणि तिरसिंगरावांनी त्याला आत तालमीच्या आखाड्यात लाल मातीत ओढले.

इकडूनतिकडून चार झपाटे देऊन घुमवल्यागत केले आणि दोनचार वेळा वर उशा देऊन लाल मातीत उद्दार फेकले. बस्स् दोनचार उशा खाल्यावर या झटापटीने बारीकरावाच्या पोटात वायुगोळा उठल्यासारखे झाले आणि मघाशी प्यालेल्या दुधाची म्हणजे पार हवा झाली !

" काय, मघाचं दूध जिरलं न्हवं बारीकराव ? "

" जिरलं....जिरलं....पार समदं जिरलं ! " चटदिशी बारीकरावांनी आखाड्याबाहेर उडी घेतली तिरसिंगरावांच्या भितीने. दुधाने अर्धा अधिक भरून उरलेला तो जग उचलून त्यातले दूध आधी गटगटा पिऊन संपविले, भराभरा अंगावर कपडे चढविले.

आणि मग तिरसिंगराव " अहो बारीकराव ! अहो बारीकराव ! " म्हणून हाका मारताहेत तेवढ्यात समोरच्या खिडकीत उडी घेऊन बारीकरावांनी केव्हाच सूंबाल्या केला होता.

शिवजयंतीच्या दिवशी अगदी पहिल्या एस्. टी. ने तिरसिंगराव गडमुडशिंगीस पोहोचले. त्यांच्या स्वागतासाठी पुष्कळशी मंडळी गडमुडशिंगीच्या एस्. टी. स्टँडवर जमा झाली होती. तिरसिंगरावांचे आगमन होताच, एक्कावन्न बैलजोड्या जोडलेल्या गाडीतून शिवरायाच्या पुतळ्याची जंगी मिरवणूक गावातून मिरवत निघाली. मिरवणुकीच्या समोर बँड, ताशा, सनई इ० वाद्ये घुमत होती. हलगीच्या तालावर लेझमीचे पथक बेभानपणे नाचत होते. त्याच्यापुढे धनगरी गजनृत्याने फेर धरला होता. दारू भरलेले बाण, फटाके, भुईनळे, उडत होते. तिरसिंगरावांच्याबरोबर गडमुडशिंगीतील अनेक प्रतिष्ठित मंडळी त्य शिवजयंतीच्या मिरवणुकीत सामील झाली होती.

गाववेशीजवळच्या एका प्रशस्त पटांगणात आंब्याच्या टहाळ्यांनी आणि केळीच्या खांबांनी सजवून सुरेख मांडव घातला होता. त्या मांडवात एका चबुतऱ्यावर मग शिवरायाच्या पुतळ्याची प्रतिष्ठापना झाली. इतर गावकऱ्यांबरोबर तिरसिंगरावांनीही शिवाजीमहाराजांच्या पुतळ्यास मोठ्या भक्तिभावाने हारफुले वाहिली. काही वक्त्यांनी शिवाजीच्या गुणगौरवपर भाषणे केली, आणि राष्ट्रगीतानंतर सकाळचा कार्यक्रम संपला.

अनुक्रम ........ वि ........

क्रमांक ........ नोंद दि ........

शिवजयंतीनिमित्त होणार असलेले खरे भरगच्च कार्यक्रम मात्र सगळे दुपारीच होते. दुपारची उन्हे थोडी कलली आणि गाववेशीजवळचे ते ऐसपैस पटांगण माणसांनी नुसते फुलून निघाले. तिरसिंगराव, गडमुडशिंगीकर पाटील खंडोजीराव, तालुका मामलेदार, पोलीस सबइन्स्पेक्टर व गावातील इतर काही प्रतिष्ठित मंडळी यांच्या उपस्थितीत कार्यक्रमांना सुरुवात झाली.

प्रथम गडमुडशिंगीच्या तालमीतल्या पोरांनी हलगीच्या तालावर झिन्नाक्, झिन्नाक् नाचत धुमसान लेझीम खेळून दाखविली. मग सुरू झाले ते दांडपट्ट्याचे खेळ. गोल रिंगणाच्या मध्यभागी दांडपट्टे मांडून ठेवले होते. दांडपट्टा खेळणारा त्या रिंगणाच्या मध्यभागी येई. 'जय बजरंग !', 'हर हर महादेव !' किंवा 'शिवाजी महाराज की जय !' अशा आरोळ्या देत सलामी करून तो दांडपट्टा उचली आणि कधी एका हातात तर काही वेळा दोन्ही हातात दांडपट्टे घेऊन, आपली दांडपट्टा फिरविण्याची शिताफी, त्यातली चपळाई आणि कौशल्य दाखवून, बघणारा सगळा लोकसमुदाय चकित करून सोडी. मध्येच एक एका पायाने लंगडा असलेला दांडपट्टेवाला रिंगणात आला. त्याने 'शिवाजी-महाराज की जय !' अशी गर्जना करीत, एक दांडपट्टा उचलून त्याच्या तीक्ष्ण टोकाकडून आपल्या कपाळावर अधांतरी हवेत उभा केला. आपल्या काखेतली कुबडी दूर फेकली. एका पायावर झेपावत उड्या घेत, कपाळावर अधांतरी उभ्या केलेल्या त्या दांडपट्ट्याचा तोल सावरीत अंगावरचे सगळे कपडे त्याने काढून दाखविले. नुसता लंगोट लावलेल्या स्थितीत तो रिंगणात उभा राहिला. कपाळावर उभा केलेला तो दांडपट्टा सावरीत मग त्याने जमिनीवर निजून आणि पुन्हा उठून उभे राहून दाखविले.

रोमहर्षित होऊन लोकांनी अक्षरशः टाळ्यांचा कडकडाट केला.

खंडोजीराव पाटलांनाही मग एकदम स्फूर्ती आली. रिंगणाच्या मध्यभागी येऊन तीन वेळा त्यांनी दांडपट्ट्याला नमस्कार केला व दांडपट्टा उचलला.

'हुर्यो !' करून लोकांनी आपल्या डोक्यावरचे शेमले-पटके व टोप्या उंच आभाळात उडवल्या. मग त्यांनी जमिनीवर मध्यभागी एक जुना चांदीचा बंदा रुपया आणि त्यावर पिवळे रसरशीत लिंबू ठेवले. एवढ्या प्रौढ वयातही खंडोजीरावांनी आपला दांडपट्टा खेळण्यात एवढी सफाई आणि कौशल्य दाखविले की, लोक आ वासून बघत राहिले. तेवढ्यात रुपयावर ठेवलेल्या त्या लिंबापाशी येऊन पोहोचताच, खंडोजीरावांनी एवढ्या चापल्याने आपल्या हातातला दांडपट्टा त्या लिंबातून फिरवला की लिंबू बरोबर मध्यभागी कटून उडाले, परंतु रुपया मात्र जागचा हलला नाही !

पुन्हा लोकांनी हर्षभरित होऊन, एकच हलकल्लोळ उडवला. शेवटी मोठ्या मिस्किल नजरेने खंडोजीरावांनी तिरसिंगरावांकडे बघितले. तिरसिंगरावांना जणू ते आव्हानच होते.

खंडोजीराव परत फिरताच तिरसिंगराव डुलत डुलत रिंगणाच्या मध्यभागी गेले. त्यांनी एक नव्हे, दोन्ही हातांत दोन दांडपट्टे बसवले! पुन्हा जमिनीवर चांदीचा बंदा रुपया आणि त्यावर एक रसरशीत लिंबू चढवले. हलगी घुमायला लागली आणि आपल्य दोन्ही हातांतले दांडपट्टे गरगरा घुमवीत कधी झेपावत तर कधी पलटी खात तिरसिंगरावांनी नुसती धमाल उडवून दिली. पावनखिंडीत दोन्ही हातांत तलवार घेऊन, एकट्याने चौफेर लढणाऱ्या बाजीप्रभू देशपांडयांसारखे ते त्या वेळी शोभून दिसत होते. बघता बघता त्या लिंबापाशी त्यांनी मोठ्या शिताफीने आणि विजेच्या गतीने दांडपट्ट्याचा हात फिरविला आणि ते बाजूला उभे राहिले.

चांदीचा रुपया आणि त्यावरचे लिंबू तसेच जागेवर होते! बघ्या लोकांना वाटले की तिरसिंगरावांचा वार चुकला—परंतु “प्रेक्षकांतून कुणीतरी पुढे येऊन लिंबू उचलावे” असे आव्हान तिरसिंगरावांनी केले. दुसरे कोण कशाला! स्वत: खंडोजीरावच पुढे आले आणि त्यांनी लिंबू उचलले....आश्चर्य लिंबू मधोमध कटून त्याचे दोन तुकडे झाले होते. परंतु लिंबू मात्र जागचे रेसभरही हलले नव्हते. किती तरी वेळ प्रेक्षकांतून टाळ्या आणि शिट्या घुमत होत्या.

त्यानंतर मग आपल्या शक्तीची करामत करून दाखवायला सुरुवात झाली. कुणी बुक्तीत नारळ फोडून दाखवला. कुणी आपल्या दंडातल्या बेटकुळीवर धरून बदाम कटाकट फोडून दाखविले. दोन्ही खांद्यांवर दोन भरलेले पाण्याचे हंडे घेऊन कुणी धावून दाखविले. हनुमान व्यायामशाळेच्या वस्तादांनी एका मोकळ्या बैलगाडीत पुष्कळ पोरेटोरे बसवून ती बैलगाडी एकट्याने ओढून दाखविली. कार्यक्रमास आलेल्या साळुंखे फौजदारांनी मग जवळच असलेल्या एका विहिरीत नारळ टाकवून, पाण्यावर तरंगत हलत असलेले ते नारळ वरून बंदुकीने उडवून, आपल्या नेमबाजीची करामत दाखविली.


आता पुन्हा सगळे तिरसिंगरावांकडे मोठ्या अपेक्षेने बघायला लागले. तिरसिंगरावांसारख्या भीमबळाच्या आणि भीमकाय पैलवानाने आपल्या ताकदीचीही काही किमयागारी दाखवायला हवी खरी....!

तिरसिंगरावही जागचे हलले. जवळच विहिरीच्या मोटेचे ‘जू’ मोकळे पडले

होते. ते त्यांनी उचलले.... मोटेचा मालक मोटेला जोडण्यासाठी बैल आणायला धावला, परंतु तिरसिंगरावांनी त्याला थोपवले.

मोट मागे मागे नेत पाण्यात बुडविली. बघता बघता ओठावर दात रुतवले. त्यांच्या मानेवरच्या नसा फुगून गळ्यातल्या पेटीचा काळा दोरा तटतटून, पेटी जागच्या जागी उडायला लागली. कुई, कुई, कुई मोटेचे चाक बोलू लागले आणि दोन बैलांनी ओढायची ती मोट एकट्या तिरसिंगरावांनी ओढली. धो, धो करून मोटेचे पाणी पाटातून खळखळले. या वेळी मात्र लोकांनी तिरसिंगरावांना अक्षरशः डोक्यावर घेतले आणि त्यांची या विहिरीपासून गाववेशीपर्यंत जणू मिरवणूक काढली....

रात्री शिवजयंतीनिमित्त गावातल्या एका हौशी नाटक मंडळाने बसविलेला शिवाजीच्या जीवनावरील नाटकाचा प्रयोग झाला. नाटकाच्या पहिल्या दोन अंकांनंतर या कार्यक्रमाचा समारोप करण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून तिरसिंगराव जेव्हा स्टेजवर हजर झाले तेव्हा नाटकातला तानाजी मालुसरे किंवा धिप्पाड बाजीप्रभू देशपांडे स्टेजवर



आला की काय असा भास प्रेक्षकांना झाला. माणसाने मनगटातले सामर्थ्य वाढवावे आणि पराक्रमाची पूजा व जोपासना करावी ! -- असा शिवजयंती साजरी करण्यामागचा खरा हेतू तिरसिंगरावांनी स्पष्ट करून सांगितला. या उत्सव कमिटीच्या चिटणिसांनी, मग तिरसिंगरावांनी आपल्या उपस्थितीने एकूण कार्यक्रमांना खरी रंगत आणल्याबद्दल त्यांच्या गळ्यात एक भला प्रचंड फुलांचा हार घालून व हातात एक मोठीशी फुलांची गदा भेट म्हणून देऊन त्यांचा सत्कार केला व त्यांचे आभार मानले.

रात्री बराच वेळापर्यंत तिरसिंगरावांच्या गावकऱ्यांशी गप्पागोष्टी चालल्या होत्या. तरीही सकाळी ते मोठ्या येरवाळीच उठले आणि कोल्हापूरला परतण्यासाठी अगदी पहाटे—तांबडे फुटायच्या वेळी गडमुडशिंगीहून सुटणारी एस्. टी. त्यांनी धरली.

एस्. टी. त, दोन-तीन बाके सोडून पलीकडे तिरसिंगरावांच्या समोर एक व्यक्ती पाठमोरी बसली होती. त्या व्यक्तीजवळच दुधाची एक मोठी बंदिस्त केन होती. बहुधा दूध घेऊन ती व्यक्ती कोल्हापूरला विक्रीसाठी चालली होती. परंतु का कुणास ठाऊक ती असामी तिरसिंगरावांकडे बघितल्यावर एकदम बिचकल्यासारखी करायची व तोंड झट्कन बाजूला वळवून बघू लागायची. गडमुडशिंगीहून दोनतीन मैल पुढे गेल्यावर मध्येच ड्रायव्हरने रस्त्याच्या कडेला नेऊन गाडी थांबविली. काही यांत्रिक दुरुस्तीसाठी गाडी दहा-पंधरा मिनिटे तेथेच थांबेल असे कंडक्टरने जाहीर केले.

तिरसिंगरावांनी ठरविले की, या निवांत वेळात मिळाले तर शेर अर्धाशेर दूध पिऊन घ्यावे. म्हणून त्यांनी मघाच्या त्या गवळीबुवांना प्रश्न केला,

"का हो दूधवाले, दूध मिळेल का ?"

"अँ ? म्–म्- मिळेल की शेर द्-द्-दीड शेर !" ती व्यक्ती चांगलीच बावचळली आणि कशीबशी बोलली.

"हां, मग दुधाची केन आणि दुधाचं माप घेऊन या खाली..."–तिरसिंगराव एस्. टी. तून खाली उतरले आणि बाजूला रानात जाऊन कोवळ्या पोपटी उन्हात जाऊन तो दुधावाला एस्. टी. तून उतरण्याची वाट बघत बसले. परंतु गवळीबुवा काही लौकर एस्. टी. तून उतरण्याची चिन्हे दिसेनात....तशी तिरसिंगरावांनी पुन्हा साद दिली.

"आहो गवळीदादा, या की लौकर !" गवळीबुवा मग मोठ्या नाखुषीनेच खाली उतरले. कशीबशी हातातली दुधाने भरलेली केन व दुधाचे माप घेऊन ते तिरसिंग-रावांपर्यंत पोहोचले. परंतु त्यांच्या नजरेतला संशय अधिकच बळावला.

आणि गवळीदादांच्या हातून, दुधाचे माप हातात घेण्यासाठी तिरसिंगरावांनी हात पुढे करताच, बुवांनी टुणदिशी उडी मारली आणि "म्-म् .. मी प्-पेनार न्हाई पेनार न्हाई–" असे काहीतरी म्हणत हातातले माप तेथेच टाकून, गडमुडशिंगीच्या दिशेने वेगाने पळायला सुरुवात केली.

गाडीतल्या अनेक प्रवाश्यांना आणि तिरसिंगरावांनाही गवळीबुवांच्या या अनपेक्षित वागण्याने मोठेच विस्मयात टाकले.

परंतु तिरसिंगरावांना गवळीबुवांचा चेहरा पूर्वी कुठेतरी पाहिला आहे, असा राहून राहून भास व्हायला लागला....कुठे बरं पाहिला असेल या गवळीबुवाला ?....कोण म्हणायचा हा ?....अरे हां....बरोबर आठवले :

हा तर गडमुडशिंगीचा बारीकराव !

आणि सगळ्या शिवजयंतीच्या कार्यक्रमात दिसला नाही तो कुठे ? बरोबर, या केनमध्ये भरलेले दूध आता आपण त्यालाच प्यायला लावणार अशा भीतीने तो पळून गेला !


तिरसिंगरावांनी मग दुधाची केन तशीच कोल्हापूरला नेली. दुसऱ्या की तिसऱ्या दिवशी दुधाची ती मोकळी केन, केनमधल्या दुधाच्या बिलाची योग्य ती रक्कम व दुधाचे माप गडमुडशिंगीच्या एका विश्वासू परिचितामार्फत, बारीकरावांकडे गडमुडशिंगीला पाठविले. आणि सांगावा धाडला की, बारीकरावांनी अगदी निर्भयपणे आपल्या ( म्हणजे तिरसिंग-रावांच्या ) भेटीस केव्हाही यावे. बारीकरावांची इच्छा नसेल तर तिरसिंगराव त्यांना दूध पिण्याचा अग्रह यापुढच्या भेटीत कधीच करणार नाहीत !

* * *

# तिरसिंगरावांची गाडी

एखादी अलिशान मोटरगाडी खरेदी करावी आणि तिच्यातून 'ड्रायव्हिंग' करीत मारे मिरवीत सगळ्या कोल्हापुरातून हिंडावे, असला आंबट शोक करावासे तिरसिंगरावांना कधीच वाटले नाही. परंतु तिरसिंगरावांच्या तालमीतल्या आणि बाहेरच्या दोस्त मंडळींनी तिरसिंगरावांच्या मागे लकडा लावला की, तिरसिंगरावांसारख्या महशूर हिंदकेसरी पैलवाना-जवळ मोटरगाडी नाही म्हणजे काय बात आहे!

तेव्हा एखादी चांगल्यातली मोटरगाडी खरेदी करण्याचा बेत तिरसिंगरावांनी जाहीर केला. सगळ्या कोल्हापूर, पुणे आणि मुंबईतून बहुतेक जुन्या-नव्या गाड्या धुंडाळून झाल्या. परंतु तिरसिंगरावांच्या पसंतीस उतरणारी आणि त्यांना साजेल अशी एकही गाडी सापडेना. काही अद्ययावत पद्धतीच्या गाड्या इतक्या सुटसुटीत आणि आटोपशीर होत्या



की, तिरसिंगरावांचा पैलवानी देह, धड त्या गाड्यांतून शिरणेही मुश्किल झाले. बरे, कसाबसा प्रयत्न करून त्या छोटेखानी दरवाजातून तिरसिंगराव गाडीत शिरले तरी आतल्या लहानखोऱ्या सीटवर त्यांना नीट ऐसपैस बसणेही मुश्किल होई. एखादी नाजूक-नार गाडी तिरसिंगरावांना 'सीट' म्हणून बसवून घेऊन धावायला कुरकूर करी आणि फर्लांग दीड फर्लांग अंतर कापल्यावर "फड्ाक्, फड्ाक् फड्ार!" असला काहीसा चमत्कारिक आवाज काढून ती धुसमुसळेपणाने फुसफुसत अर्ध्या वाटेवरच आपला कार-भार आटोपता घेई. पुण्यामध्ये एका नवीन कोऱ्या गाडीची 'टेस्ट' घेण्यासाठी तिरसिंग-राव 'ड्रायव्हिंग'ला बसले होते. परंतु गाडी सुरू करण्याच्या प्रयत्नात जरा कुठे जोराचा हिसडा बसताच हातात धरलेले ड्रायव्हिंग व्हीलच निखळून तिरसिंगरावांच्या हातात आले. तिरसिंगरावांनी ते जसेच्या तसेच मोटर-दुकानदाराच्या हवाली केले आणि तिथून आभारपूर्वक काढता पाय घेतला.

खास रेससाठी म्हणून तयार केलेली एक लांबलचक मासोळीसारखी गाडी मुंबईत पाहात असताना तिरसिंगराव त्या गाडीत विराजमान झाले. परंतु फार काळपर्यंत त्या गाडीत बसण्याची तसदी तिरसिंगरावांना घ्यावी लागली नाही. तिरसिंगराव गाडीच्या इंजिनाला गती देतात न देतात इतक्यात तिरसिंगरावांचा भार असह्य होऊन ती कोम-लांगी गाडी एकाएकी भुईसपाट झाली आणि तिची चारी चाके निखळून चार दिशांना घरंगळत निघून गेली. मुंबईतच खरेदीच्या निमित्ताने पाहिलेली आणखी एक मोटरगाडी वजनात इतकी हलकीफूल होती की, सवारी म्हणून तिरसिंगरावांना त्या गाडीने उचलण्याऐवजी उलट तिरसिंगरावांनीच ती गाडी वर हवेत अधांतरी उचलून आपल्या शक्तीचा एक अचाट प्रयोग दाखविला आणि मोटरदुकानदारास दरदरून घाम फोडून डोळे पांढरे करायची वेळ आणली! तिरसिंगराव दुकानाच्या पायऱ्या उतरून केव्हाच निघून गेले, पण तो बापडा शेटजी तोंडाचा 'आ' वासून कितीतरी वेळ तिरसिंगराव निघून गेले त्या रस्त्याकडे पाहत होता!

तिरसिंगरावांची गाडी खरेदी करण्यासाठी तिरसिंगरावांबरोबर फिरणारी त्यांची दोस्तमंडळी अखेरीस या मोहिमेला कंटाळली आणि एक एक करीत मोहीम सोडून निघून गेली.

परंतु पुढे मध्यंतरी आठएक दिवस तिरसिंगराव अचानक कुठे तरी गायब झाले आणि परत आले तेव्हा त्यांनी जाहीर केले की, आपण एक झकास गाडी खरेदी केली असून सध्या ती दुरुस्तीसाठी व तिच्यात आवश्यक त्या नवनवीन सुधारणा करण्यासाठी

कोल्हापुरातच एका कुशल तंत्रज्ञाकडे दिली आहे. बरोबर आठ दिवसांनी आपण ती गाडी जुन्या राजवाड्यासमोरच्या मैदानात आणून पळवून दाखवू !

या मधल्या काळात तिरसिंगरावांच्या गाडीविषयी सर्वांचीच उत्सुकता अगदी शिगेस पोहोचली. तिरसिंगराव स्वत:साठी गाडी घेणार म्हणजे एखादा बुलडोझर, एखादा ट्रॅक्टर, किमानपक्षी एखादा फोर्ड, मर्सिडीझ कंपनीचा दणदणीत ट्रक खरेदी करणार असावेत, अशा प्रकारचे नानाविध तर्ककुतर्क बांधले जाऊ लागले. नाही–होय करता करता शेवटी एकदाचा तो दिवस उजाडला, आणि स्वत:ची गाडी स्वत:च पळवीत आणून तिरसिंगरावांनी सर्वांच्याच तर्ककुतर्कांना आणि अपेक्षांना एक जबरदस्त टोला हाणला.

कारण, शोधून शोधून तिरसिंगरावांनी कोल्हापूर दरबारची एक जुनी संस्थानी काळातील गाडी खरेदी केली होती. तिचा तांबडा वैशिष्टयपूर्ण रंग आणि नंबरची खास तांबडी प्लेटसुद्धा त्यांनी बदलली नव्हती. फक्त आठ दिवस म्हादबा मिस्त्रीसारख्या कुशल तंत्रज्ञाच्या कारखान्यात ती आवश्यक त्या दुरुस्तीला आणि फेरबदलासाठी ठेवून दिली होती. ही गाडी तिरसिंगराव वापरणार आहेत, म्हटल्यावर मिस्त्रींनीही जरा डोकं लढवून गाडीच्या सांगाड्यात पोलादासारख्या कठीण धातूच्या पत्र्यांचा वापर करून, गाडी अधिक भक्कम मजबूत केली होती.

"कु कूऽऽच् कूऽऽ !"–तिरसिंगरावांनी गाडीचा हॉर्न वाजवताच एखाद्या डौलदार तुऱ्याच्या कोंबडयाने जोरदार बांग द्यावी तसला दाणेदार आवाज त्या हॉर्नमधून बाहेर येई आणि ऐकणारा विस्मयचकित होई. गाडीचे पुढचे दोन दिवे, दोन पांढरे प्रखर प्रकाशाचे झोत फेकीत धावत. त्यामुळे जवळजवळ फर्लांगभराचे तरी अंतर त्या प्रकाशात उजळून निघे. परंतु स्टिअरिंग व्हीलजवळची एक कळ फिरवीत नेली की, हाच प्रकाश बदलून झळझळीत ज्वालेसारखा तांबडा, पिवळा तर दुसऱ्या वेळी शीतल प्रसन्न चांदण्या-सारखा दुधी परंतु निळ्या रंगाचा प्रकाश ओतीत राही. गाडीच्या मागील बाजूस तांबडया व हिरव्या रंगाच्या दिव्यांची सोय होती.

तिरसिंगरावांच्या काही जवळच्या दोस्तांनी मात्र त्या मोटरीला 'खटारा', 'वेगात धावणारी म्हैस', 'पेट्रोलची टाकी' असली नावे ठेवून त्या गाडीची व तिरसिंगरावांची रेवडी उडवायचा प्रयत्न केला, परंतु तिरसिंगरावांनी या असल्या टीकेला मुळीच भीक घातली नाही.


तिरसिंगरावांच्या तडाख्यात ही गाडी किती दिवस आणि किती काळ टिकेल, याबद्दल अनेकांनी शंका व्यक्त केली.

परंतु तिरसिंगरावांनी एके दिवशी जाहीर केले की, आपण एका खास पाहुण्याला घेऊन गाडीतून सगळ्या कोल्हापूरभर फिरू व त्यामुळे गाडीचा दणकटपणा सप्रमाण सिद्ध होईल.

तिरसिंगरावांच्या गाडीतून येणार असलेल्या या खास पाहुण्याला बघण्यासाठी नियोजित दिवशी बरीच मंडळी गाडीची वाट पाहत जुन्या राजवाड्याच्या वेशीपाशी उभी होती.

“ कुकूऽऽचकूऽऽ ! ” तिरसिंगरावांच्या गाडीचा हॉर्न दूरून ऐकू आला.

बघतात तो नुकत्याच कोल्हापुरात येऊन उतरलेल्या एका सर्कशीतले हत्तीचे पिल्लूच तिरसिंगरावांनी त्याचे दोन पाय गाडीच्या मागील सीटवर आणि दोन पाय ड्रायव्हरजवळच्या पुढील सीटवर ठेवून झकासपैकी गाडीत उभे केले होते. हवे तेव्हा गाडीचे टप गाडीवर चढवण्याची व टप मुडपून बाजूला करण्याची आटोमॅटिक, यांत्रिक सोय गाडीस होती. या वेळी उघड्या मुडपलेल्या टपाच्या त्या मोटरीत तिरसिंगराव ड्रायव्हिंग करीत होते, आणि ते हत्तीचे पिल्लू लेकाचे मजेत आपली शेपटी हलवीत, तर कधी आपली सोंड हवेत उडवीत, नाहीतर लाडात येऊन, त्या सोंडेने तिरसिंगरावांचा चेहरा कुरवाळीत किलकिल्या डोळ्यांनी इकडेतिकडे पाहत उभे होते. धावत्या गाडीतले ते हत्तीच्या पिल्लाचे अद्‌भुत दृश्य बघून रस्त्यातील मंडळी चाट होऊन, बुचकळल्यासारखी रस्त्यातच बघत उभी राहत होती. सर्कशीतल्या त्या हत्तीच्या पिल्लास घेऊन तिरसिंगरावांनी गाडीतून कोल्हापुरात पुष्कळ चकरा मारल्या आणि मग पुन्हा परत नेऊन ते हत्तीचे पिल्लू सर्कशीच्या ठिकाणी पोहोचविले.



त्या दिवशी संध्याकाळच्या सर्कशीच्या खेळात सर्कशीच्या मॅनेजरसाहेबांनी वरील भुत पराक्रमाबद्दल तिरसिंगरावांचा आणि त्या हत्तीच्या पिल्लाचा जाहीर रीत्या सत्कार ा. तिरसिंगरावांच्या गाडीच्या दणकटपणाबद्दल शंका घेण्याचे धाडस मात्र त्यानंतर ी कधीच केले नाही.

तिरसिंगरावांनी आपल्या या अद्भुत मोटरगाडीचे नाव 'एव्हररेडी' असे ठेवले ते. 'एव्हररेडी' म्हणजे केव्हाही तयार. तिरसिंगरावांची ही गाडी केव्हाही आणि कुठेही यला नेहमी तयार असे. वाटेने, आडवाटेने आणि वाट नसेल तर माळरानाने, ाडाधोंड्यांतून कशीही पळविली तरी गाडीला फारशी इजा होत नसे. डोंगराच्या चढावर, ाचखळग्यातून आणि दऱ्याखोऱ्यांतून गाडी तितक्याच दाणगटपणाने धावत असे.

तिरसिंगराव शिकारीचे शौकिन होते. आपल्या एका शिकारी दोस्ताबरोबर एकदा का बिबळ्या वाघाच्या मागावर ते शिकारीला गेले होते. सपाट मैदानावरून हुलकावणी ेऊन तो बिबळ्या वाघ जंगलात घुसला. पण आपल्या एव्हररेडीच्या ड्रायव्हिंग व्हीलवर सलेल्या तिरसिंगरावांनी आपली गाडीदेखील थेट त्या वाघाच्या मागोमाग बेगुमानपणे ंगलात घुसवली. वाघोबा तेवढ्यातूनही हुलकावणी देऊन सटकले आणि करवंदीच्या ्का दाट जाळीत घुसले. वाघोबांना वाटले असावे की, करवंदीच्या जाळीच्या कचाट्यात ाठलाग करीत मोटरगाडी कसली काय घुसतेय! परंतु तिरसिंगरावांनी त्या वाघाच्या ाठोपाठ आपली एव्हररेडीदेखील बेधडक करवंदीच्या जाळीत घुसवली! गाडीवर टप बसवले होते म्हणून ठीक. एकदा करवंदीच्या निबिड जाळीत गवसल्यावर मग वाघोबांची मोठीच पंचाईत झाली. जाळीमुळे धड पुढे जाता येत नव्हते आणि मागे वळावे तर तर पाठीवर गाडी येऊन ठाकलेली.

'कुकूऽऽचूकूऽऽ"–तिरसिंगरावांनी गाडीचा हॉर्न वाजवून आणि गाडीच्या पुढल्या दिव्यांचे रंगीत प्रकाशझोत वारंवार त्या वाघोबावर फेकून वाघोबांना एकदम बिच-कवून सोडले. तिरसिंगरावांच्या या खट्याळपणाने वाघोबा चांगलेच चवताळले आणि आपला मोहरा गाडीच्या दिशेने फिरवून ते गाडीवर झेप घेणार...इतक्यात धडाधड गाडीतून बंदुकीच्या गोळ्या सुटल्या आणि वाघोबांचे धूड रक्ताच्या थारोळ्यात खाली भुईवर कोसळले.

बेफाम वारा वाहत होता. तिरसिंगराव आपल्या दोस्तमंडळींसह गाडी घेऊन मजेत एके दिवशी संध्याकाळी एका आडरस्त्याने चालले होते. त्या रस्त्याला पुढे एक नदी लागली. नदीवर छोटासा पूल बांधून रस्ता त्या पुलावरून पुढे नेला होता. पावसाळ्याचे

दिवस. गाडी अगदी त्या पुलापाशी आली आणि एकाएकी तिरसिंगरावांच्या लक्षात आले की, दुपारच्या बेफाम पावसाने आणि वादळाने पूल खचून केव्हातरी नदीत कोसळला आहे. गाडीत बसलेल्या सर्वांनाच वाटले की, गाडी सरळ नदीत कोसळून आता सर्वांचाच कपाळमोक्ष होणार.

परंतु तेवढयातल्या तेवढयात हिकमत योजून तिरसिंगरावांनी गाडीचा वेग कमाल मर्यादेपर्यंत वाढवून, गाडीचे सगळे ब्रेक अशा क्रमाने आणि कौशल्याने आवळले की गाडी जागीच उसळी घेऊन वर अलगद हवेत उंच उडाली आणि आतल्या प्रवाश्यांसकट तो छोटासा पडलेला पूल ओलांडून थेट पलीकडच्या रस्त्यावर सुरक्षितपणे उतरली.

'तिरसिंगरावांचे यशस्वी मोटर उड्डाण!' या शीर्षकाखाली कोल्हापुरातल्या स्थानिक वृत्तपत्रांनी तिरसिंगरावांच्या या पराक्रमाचे रकाने भरभरून कौतुक केले.

मुंबईला एक मोटरींची धावण्याची 'शर्यत' होणार होती. सबंध भारतातले नामवंत मोटररेसपटू या शर्यतीत भाग घेणार होते. तिरसिंगरावांनीही आपले नाव या रेससाठी स्पर्धक म्हणून नोंदविले.

"अहो तिरसिंगराव, कुठली इतिहासकाळातली तुमची मोटर! अद्ययावत यंत्र-सामग्री बसविलेल्या आणि खास 'रेस-कार्स' म्हणून नावाजलेल्या मोटरींबरोबर शर्यतीत ती कशी काय सरासरी खेळणार?"— तिरसिंगरावांच्या हितचिंतकांनी अशा अनेक शंका-कुशंका व्यक्त केल्या. पण—

"कुकूऽऽच् कूऽऽ!" तिरसिंगरावांनी वाजविलेल्या आपल्या मोटरच्या हॉर्नमध्ये त्या कुठल्या कुठे विरून गेल्या.

रेसला निघण्यापूर्वी तिरसिंगरावनी आपली मोटर एकदा म्हादबा मिस्त्रीच्या कार-खान्यात नेऊन दाखवून आणली, तिची वेगमर्यादा वाढविणारी काही नवीन यंत्रे तीत बसवली.

मुंबईत प्रत्यक्ष रेसमध्ये धावताना, तिरासिंगरावांची गाडी सुरुवाती सुरुवातीला स्पर्धेतल्या इतर गाड्यांच्या पाठीमागेच पडत चालली होती. परंतु मग काही वेळ गेल्यावर तिरासिंगरावांनी गाडीचा वेग वाढवीत नेला आणि बघता बघता तिरसिंगराव स्पर्धेत त्या एकेक गाडीवर मात करीत पुढे निघाले. स्पर्धेत धावणाऱ्या मोटरींसाठी प्रत्येकी स्वतंत्र 'रेस-पिच' होता.


पहिल्या नंबरने धावणाऱ्या गाडीलादेखील तिरसिंगरावांनी जवळजवळ रेसमध्ये गाठत आणले. परंतु कितीही आटोकाट प्रयत्न केला तरी त्या पहिल्या नंबरच्या गाडीवर मात करून पुढे निघून जाणे तिरसिंगरावांना शक्य होईना.

चाकाला चाक घासत इरेसरीने दोन्ही गाड्या धावत होत्या. मग तिथेही तिरसिंग-रावांनी आपला हातखंडा प्रयोग केला. गाडीचा वेग एकदम कमाल मर्यादेवर नेऊन, गाडीचे ब्रेक अशा कौशल्याने अचानकपणे आवळले की, गाडीने एकाएकी रस्त्यावरून उसळी घेतली आणि काही क्षण ती एकदम विमानाप्रमाणे उड्डाण करून हवेतून निघाली.

तिरसिंगरावांबरोबर अटीतटीने गाडी पळविणारा तो पहिल्या नंबरचा स्पर्धक तिरसिंगरावांच्या मोटरीचे ते हवेतील अपूर्व उड्डाण बघून एकदम चमकला...परंतु तेवढ्या काळात तिरसिंगराव त्या स्पर्धकावर मात करून वेगात पुढे निघून गेले.

तिरसिंगरावांचे हे स्पर्धेतील 'मोटर-उड्डाण' स्पर्धेतील परीक्षकांच्या दृष्टीने मोठीच चर्चेची आणि वितंडवादाची बाब ठरली. परंतु शेवटी ही स्पर्धा पहिल्या नंबरने तिरसिंग-रावांनीच जिंकली, असे सर्वांना एकमताने जाहीर करणे भाग पडले.

मोटर-रेस तिरसिंगरावांनी जिंकली खरी, परंतु रेसकोर्सवरील हे मोटरउड्डाण तिरसिंगरावांच्या 'एव्हररेडी'ला काही फारसे मानवले नाही, या प्रकारात तिचे सगळे सांधे बरेच खिळखिळे झाले. तरीसुद्धा विजयी तिरसिंगरावांना घेऊन, मुंबई ते पुणे, पुणे ते सातारा व सातारा ते कोल्हापूर अशी मजल मारण्यात तिने यश मिळविले.



कोल्हापुरात पोहोचल्यावर लगोलग तिरसिंगरावांनी आपली ' एव्हररेडी ' दुरुस्ती-साठी व डागडुजीसाठी यंत्रज्ञाकडे जी सोपविली ती दुरुस्त होऊन आल्यावर पुन्हा फारशी ' गॅरेज ' बाहेर काढली नाही. गरजेपुरताच ते तिचा वापर करीत.

कोल्हापुरातून डुलत डुलत पायीच फिरण्याचा जुना शिरस्ता त्यांनी पुन्हा सुरू केला व अशा प्रकारे तिरसिंगरावांनी आपली ' एव्हररेडी ' गाडी जवळजवळ पेन्शनीत काढली !

* * *

# तिरसिंगरावांची काश्मीर-सफर

" सावधान ! सुमारे फर्लांगभर अंतरावरील समोरच्या त्या डोंगर-कपारीआडून हिममानव पुढे येत आहे. आघाडीवरील छावणी नंबर १ ने हल्ला चढवावा. फास टाकून जिवंतपणीच हिममानव जाळ्यात फसवावा. छावणी नंबर १ हुशार ! " आघाडी-मागच्या, छावणी नंबर २ मधून रेडिओ संदेश आला. आघाडीवरील छावणीतील सगळे संशोधक सावध झाले. सगळ्या दुर्बिणी समोरच्या बर्फाच्छादित हिमकड्यावर रोखल्या गेल्या—आणि....आणि थोड्याच वेळात भुरभुरत्या हिमाने नखशिखांत आच्छादिला गेलेला एक हिममानव त्या हिममय डोंगरकपारीमागून प्रकट झाला. सर्वसामान्य मानवापेक्षा त्याची आकृती चांगलीच अवाढव्य, उंची-पुरी आणि बलदंड वाटत होती. त्याच्या जंजाळ मिश्या इतक्या दुरूनही दुर्बिणीतून अगदी स्पष्टपणे दिसत होत्या. चालता चालता हिममानव थोडा वेळ जागीच थबकला...आणि आश्चर्य म्हणजे छावणी नंबर १ च्या दिशेनेच त्याने आपले मार्गक्रमण करायला सुरुवात केली परंतु आता अधिक विचार करीत बसायला वेळ नव्हता. योग्य त्या शस्त्रसाधनांनिशी आघाडीच्या छावणीतील मेजर शर्मा झट्दिशी पुढे झाले आणि चित्त्याच्या सावधपणे हिममानवाच्या दिशेने झेपावू लागले. मेजर शर्मा हिममानवाच्या जेव्हा अगदी जवळ पोहोचले तेव्हा हिममानव आपले दोन्ही हात दोन बाजूंना कमरेवर जोडून जागीच थबकला. ती संधी हिममानवसंशोधक मेजर शर्मा यांनी साधली आणि चट्कन हिममानवाच्या गळ्यात लांबूनच दोरखंडाचा फास आवळला आणि छावणी नंबर एकच्या दिशेने हिममानवाला खेचायला सुरुवात केली.

दोराचा फास गर्दनीवर आवळला जाऊन जेव्हा त्याला हिसडे बसायला लागले तेव्हा मात्र हिममानवाला राहवले नाही. त्याने आपल्या दोन बळकट मुठीत तो दोरखंड धरल आणि एकच हिसडा मारला. साप्दिशी मेजर शर्मांच्या पायाखालची जमीन घसरली आणि एका हिसड्यात मेजरसाहेब हिममानवाच्या पायापाशी येऊन पोहोचले.

अनुक्रमांक ... वि ... नोंद दि. 29/11/2022

"तत्-प्र्" – मेजरसाहेबांची बोबडीच वळली. आता हिममानव आपल्याला दोन-चार वेळा खालच्या गार बर्फावर आदळून आपले धिरडे करणार. नुसत्या या कल्पनेनेच शर्मासाहेबांना हुडहुडी भरली.

"हू....हू....हू...हिम्....हिम् हिममानव...."

"हिममानव ?"–हिममानवाने इकडे तिकडे बघितले आणि चक्क मेजर शर्मा यांना विचारले,

"कौन हिममानव ?"

"अप्-अप्-आप !"

"मैं ?"–मग हिममानवाने हसून पुन्हा खुलासा केला,

"मैं हिममानव नहीं हूँ. मैं हूँ तिरासिंगराव !"

"त्-त्–तिरासिंगराव ?"

"हां...हां....हिंदकेसरी पैलवान तिरासिंगराव !" –आपण ज्याला शिताफीने जिवंतपणी पकडायचा प्रयत्न केला व शेवटी आपणच ज्याच्या जाळ्यात अडकलो तो कुणी हिममानव नसून, एक आपल्यासारखाच सर्वसामान्य मानव आहे, हे लक्षात आल्यावर कुठे मेजर शर्मांच्या थोडा जिवात जीव आला.



" नाव काय तुमचं ? "–तिरसिंगराव.

" मेजर शर्मा "–अशी एकमेकांची ओळखपाळख झाली आणि मेजर शर्मांबरोबर पैलवान तिरसिंगराव डुलत डुलत आघाडीच्या छावणीच्या दिशेने चालू लागले. तिरसिंगरावांना शर्मा यांच्याबरोबर छावणीच्या दिशेने येताना बघून, पहिल्याप्रथम तर छावणीत मोठाच गोंधळ उडाला; परंतु मेजर शर्मा यांनी जेव्हा ओरडून सांगितले की, " माझ्याबरोबर हिममानव येत नसून, हिंदकेसरी पैलवान तिरसिंगराव येत आहेत ! "–तेव्हा कुठे छावणीत सामसूम झाली.

छावणीत पोहोचल्यावर, तिरसिंगरावांसकट सर्वांनी गरम गरम कॉफी घेतली. आघाडीच्या छावणीतील संशोधक टोळक्यांपैकी एक मेजर बनातवाला यांनी मग कॉफी पिता पिता तिरसिंगरावांना माहिती पुरवली की, येथून जवळच आपल्या एका छोटेखानी अलिशान बंगलीत आणखी एक मुंबईचे महशूर पैलवान राहतात. त्यांचं नाव आहे, " गबदूल-ए-हिंद ! "

मुंबईकडे ' गबदूल-ए-हिंद '–या नावाचा कुणी महशूर पैलवान राहतो, हे तिरसिंगरावांच्या कधी ऐकिवातदेखील नव्हते. त्यामुळे या ' गबदूल-ए-हिंद 'ला भेटण्याची तिरसिंगरावांनी मोठीच उत्सुकता दाखविली. कॉफीपान आणि इकडच्या तिकडच्या गप्पासप्पा झाल्यावर, मेजर शर्मा आणि मेजर बनातवाला यांच्याबरोबर तिरसिंगराव मग पैलवान गबदूल-ए-हिंदच्या भेटीसाठी निघाले.

उंचच उंच आकाशभेदी गर्द काश्मिरी वृक्षांच्या छायेत गबदूल-ए-हिंदची ही टुमदार बंगली वसलेली होती. दारापाशी डुलक्या देत बसलेल्या दरवानाने धावतच आत जाऊन गबदूल-ए-हिंदला वर्दी दिली आणि पाच-दहा मिनिटांच्या अवकाशातच गबदूल-ए-हिंदकडून तिरसिंगराव आणि त्यांच्या दोन साथीदारांना बंगलीत येण्याचा परवाना मिळाला.

" मैं हूँ पैलवान तिरसिंगराव...." मोठ्या विनम्रपणे तिरसिंगरावांनी जेव्हा स्वतःचा परिचय पैलवान गबदूल-ए-हिंदला करून दिला तेव्हा गबदूलच्या कपाळावर आठ्या पसरल्या आणि तो कुत्सितपणे फूत्कारला,

" हूँ ! "

" स्वतःला हिंदकेसरी म्हणवणारे पुष्कळ पैलवान भारतात पडलेले आहेत. परंतु असल्या कच्चयाबच्चयांशी मी लढत नसतो. माझी लढत होते आंतरख्यातीच्या बहादूर पैलवानांशी ! " गबदूलने जाता जाता जरा उद्दामपणे खुलासा केला आणि मग गमती-

गमतीत अचानकपणे तिरसिंगरावांच्या छाताडावर असा एक जोराचा बेलगाम गुद्दा ठेवून दिला की, तिरसिंगराव जागच्या जागी डळमळलेच आणि खाली कोसळता कोसळता आवरून उभे राहिले

"हॉ....हॉ....हॉ..."–विकट हास्य करून तिरसिंगरावांना खिजविण्यासाठी मग गबदूल पुढे बोलला,

"अरे, स्वतःला चांगले हिंदकेसरी पैलवान म्हणवता....आणि एक साधा गुद्दा छातीवर लगावला तर तो पेलवत नाही...." गबदूल-ए-हिंदच्या स्वागत करण्याच्या या चमत्कारिक पद्धतीने तिरसिंगराव आणि कंपनी थोडी बुचकळ्यात पडली.

"आता तिरसिंगराव...."–मिजाशीत गबदूल पुढे बोलला,

"....तुम्ही एक जोराचा गुद्दा माझ्या छाताडावर ठेवून द्या. आणि मी बघ जागचा टस से मस होतो का...."

तिरसिंगराव पुरते सावध झाले होते. त्यांनी मग दात ओठात रोवला. गळ्याच्या शिरा तणावल्या आणि सगळी ताकद एकवटून असा एक सणसणीत ठोसा गबदूल-ए-हिंदच्या छाताडावर उडवून दिला की, तोबा....तोबा

"ओयाक!"–करून गबदूल-ए-हिंदचे धूड, तीन ताड उंच हवेत उडाले आणि धबालदिशी जमिनीवर उताणे आदळले.

आ वासून बाकीची मंडळी आणि तिरसिंगराव हत्तीचे पिल्लू कोसळावे तसे जमिनीवर कोसळलेल्या गबदूल-ए-हिंदकडे पाहत होते. तिरसिंगरावांनी मात्र नंतर तितक्याच अगत्यानं आधार देऊन गबदूल-ए-हिंदला उठून उभे राहण्यासाठी मदत केली.

वरकरणी गबदूल-ए-हिंदच्या चेहऱ्यावर जरी कृत्रिम केविलवाणे हास्य विलसत असले तरी मनातून मात्र तो चांगलाच जळफळत होता.

"....हे भारतीय पैलवान म्हणजे लेकाचे अगदीच रानटी..." बोलता बोलता हात चोळीत गबदूल-ए-हिंदनं पुन्हा 'रिमार्क' मारला,

"या पैलवानांना परदेशी शास्त्रशुद्ध पद्धतीनं करल फिरविणं, डंवेल्स खेळणं, वजनं उचलणं, मलखांबाचा खेळ....काही म्हणून काही एक जमत नाही...."

ठीक आहे. तिरसिंगरावांनी गबदूल-ए-हिंदचे हेही आव्हान स्वीकारले. डंवेल्स खेळून दाखविले, मोठमोठी वजने उचलली, मलखांबावरची कसरत करून दाखविली.

"सगळं झालं....पण करल....ती करल फिरवून दाखविणंदेखील तितकंच महत्त्वाचं आहे तिरसिंगराव!"– गबदूल गुर्मीत बोलला. तिरसिंगरावांच्या लक्षात आले

की, गब्दूलची पैलवानकीची मस्ती अद्याप उतरलेली नाही. कोपऱ्यातली करल उचलून तिरसिंगरावांनी आपल्या हातात घेतली आणि ती उलटीसुलटी गरागर फिरवून दाखविली. करल फिरविण्याचा कार्यक्रम संपल्यावर शांतपणे तिरसिंगरावांनी करल कोपऱ्यात ठेवून दिली आणि झापूदिशी कमरेत हात घालून गबदूल-ए-हिंदलाच अधांतरी हवेत उचलले आणि गरागर उलटापालटा करलप्रमाणे फिरवून जमिनीवर ठेवला. आता मात्र गब्दूल चांगलाच हबकला.

एकंदरीत तिरसिंगरावांची अचाट ताकद, कुस्तीच्या क्षेत्रातील त्यांचा अधिकार आणि या सर्वांवर मात करणारी त्यांची विनम्र वृत्ती यांमुळे गब्दूल-ए-हिंदचा तिरसिंग-रावांवरील विश्वास दृढ होत चालला. इतका वेळ ताटकळत उभ्या असलेल्या त्या तिघांना गबदूलनं आता आसनस्थ होण्याविषयी विनंती केली. खानसाम्याला सर्वांच्यासाठी ग्लासग्लासभर केशरी दूध घेऊन येण्याविषयी फर्मान सोडले. तिरसिंगरावांनी केलेल्या चर्चेतून गब्दूलच्या लक्षात आले की, तिरसिंगराव हे कुस्तीच्या क्षेत्रातील एक अत्युत्तम जाणकार आहेत!

गबदूल मग तिरसिंगरावांवर इतका बेहद्द खूष झाला की, या काश्मीरच्या सफरीत तिरसिंगरावांनी आपल्याकडेच राहावे असा आग्रह त्यांनी चालवला.

मूळ कोल्हापूरहून येताना सफरीस आपल्याबरोबर आलेले आपले दोन पैलवान



मित्र हॉटेल 'महाराजा'मध्ये आपली वाट पाहात आणि काळजी करीत बसले असतील, अशी एक अडचण तिरसिंगरावांनी गबदूलपुढे उभी करताच, गबदूलने ताबडतोब हॉटेल 'महाराजा'त फोन लावला, आणि त्या हॉटेलमध्ये खरोखरच तिरसिंगरावांची काळजी करीत बसलेल्या त्यांच्या दोन मित्रांना सगळा बाडबिस्तारा घेऊन आपल्याकडे येण्याविषयी मोठ्या आग्रहाने सांगितले.

तिरसिंगरावांचे दोघे कोल्हापूरकर मित्रही मग गबदूलकडे येऊन उतरले आणि दुसऱ्या दिवशी भल्या सकाळपासून काश्मीरमधली अनेक सौंदर्यस्थळे पाहण्याचा त्या तिघांचा कार्यक्रम सुरू झाला तो गबदूल-ए-हिंदच्या सहवासात आणि त्याच्या मार्ग-दर्शनाखाली.

काश्मीरमधील हिरवेगार सृष्टिसौंदर्य, त्याच्या पार्श्वभूमीवर पसरलेले निळेशार आकाश, विस्तीर्ण सरोवरे, दऱ्या-खोरी आणि डोंगरमाथे....एकंदरीत काश्मीर पाहण्यात मोठी मौज होती खरी—

"तिरसिंगराव, तुम्हांला बर्फावरचं 'स्केटिंग' येतं की नाही?"— एकदा एक बर्फाच्छादित पर्वताचा चढ चढत जात असताना गबदूल-ए-हिंदने तिरसिंगरावांना पृच्छा केली. गबदूल-ए-हिंदच्या या मिजासदार बोलघेवड्या व्यक्तिमत्त्वाने काश्मीरच्या या सफरीत एक नवीच रंगत भरली होती. त्याच्या स्वतःविषयीच्या एकेक बढाया आणि फुशारक्या तर मोठ्या ऐकण्यासारख्या होत्या..."

"नाही बुवा....बर्फावरचं स्केटिंग नाही जमत आपल्याला"—तिरसिंगरावांनी मन-मोकळी कबुली दिली.

"हुडुत तुमच्या, अहो! काश्मीरमध्ये येऊन स्केटिंग नाही शिकून घेतलं तर राहलं काय...चला तुम्हांला दाखवितो बर्फावरचं स्केटिंग...."

त्या रांगेतील एका पर्वताच्या शिखरावर पोहोचताच गबदूल-ए-हिंदने स्केटिंगची साधने मग एका धंदेवाइकाकडून भाड्याने मिळविली.

आणि इकडेतिकडे बघत मोठ्या ऐटीत आणि मिजाशीत हिमाच्छादित पर्वताच्या उतारावरून मग गबदूल-ए-हिंदचे स्केटिंग सुरू झाले....स्केटिंगने गती घेतली. तिर-सिंगरावांसकट त्याची मित्रमंडळी गबदूल-ए-हिंदचे हे स्केटिंग मोठ्या कौतुकाच्या नजरेने पाहत होते. तेवढ्यात बघता बघता काय चमत्कार झाला देव जाणे....गबदूल-ए-हिंदच्या पायाखालची बर्फाळ उताराची जमीन सप्‌कन निसटली. रपदिशी गबदूलसाहेब जमिनी-वर पालथे झाले. खडी दाबायचा रूळ गडगडावा तसे गडगडत पर्वताच्या पायथ्याच्या

दिशेने द्रुत गतीने निघाले. बरे तर बरे, मध्येच एक मोठया झाडाचा बुंधा आडवा लागल्याने गबदूल महाशयांचा हा गडगडत निघालेला प्रवास थांबला. धावत जाऊन तिरसिंगरावांनी मग गबदूल साहेबांना आडव्याचे उठवून बसते केले. या आकस्मित घडलेल्या चमत्काराने गबदूलसाहेब मनोमन मोठेच ओशाळे आणि खजिल झाले असावेत. परंतु चेहऱ्यावर तसे काही त्यांनी दाखविले नाही. जरा इकडे तिकडे अंग झटकल्यासारखे केले, चेहरा साफसूफ केला आणि तिथेच बैठक मारून, गबदूल-ए हिंद सकट सगळ्यांनी थर्मासमधील गरम गरम कॉफीचे घुटक्यावर घुटके आणि आस्वाद घ्यायला सुरुवात केली.

दोन-तीन दिवसांनंतरची गोष्ट. एका भाड्याच्या शिकाऱ्यामध्ये बसून तिरसिंगराव, गबदूल-ए-हिंद आणि कंपनीचा सरोवरातला विहार चालला होता. एकाएकी गबदूल-साहेबांना गंमत करायची लहर आली.

"अहो तिरसिंगराव, इकडे या, हे बघा कसले सुरेख रंगीबेरंगी मासे पाण्यात धावताहेत...."

"कुठाहेत?"– शिकाऱ्याच्या काठाशी उभे राहून तिरसिंगराव डोकावून खाली पाण्यात पाहू लागले. तेवढ्यात गबदूल-ए-हिंदने कावा साधला आणि तिरसिंगरावांना मागच्या बाजूने उचलल्यासारखे करून इतक्या जोरात ढकलून दिले की, तिरसिंगराव धडामदिशी पाण्यात पडले.

परंतु तिरसिंगरावही काही कमी वस्ताद नव्हते....असं काय बच्चमजी! शिकाऱ्याच्या काठावर खो खो करून हसत उभ्या असलेल्या गबदूल-ए-हिंदला तिरसिंगरावांनी पाण्याचा एवढा जोराचा सपका दिला की, गबदूलसाहेब जागच्या जागी डुलडुल डचमळले आणि बुडुकदिशी पाण्यात लवंडले. शिकाऱ्यात एकच हशा पिकला. मग शिकाऱ्याच्या जवळपासच गबदूल-ए-हिंदने आणि तिरसिंगरावांनी डुंबण्याची मनसोक्त मौज लुटली आणि पोहून पोहून चांगले दमगीर झाल्यावरच ते पुन्हा वर शिकाऱ्यात चढले. सरोवरातले पाणी मात्र नेहमीच्या पाण्यापेक्षा अधिक गार गार लागत होते.

शिकाऱ्यात चढून तिरसिंगराव आणि गबदूल-ए-हिंद आपली ओलीउघडी अंगे टर्किश टॉवेलने खसाखसा पुसत होते. तेवढ्यात शिकाऱ्यावरच असलेल्या छोटेखानी घर-कुलामधून लव्हबर्डसारखे दिसणारे एक एवढेसे रेशिमकाळे काश्मिरी पाखरू भुर्रदिशी उडून बाहेर आले. प्रथम त्या चिमुकल्या पाखराने विराजमान होण्यासाठी गबदूल-ए-हिंदला नसलेल्या मिश्यांचा आश्रय घेण्याचा प्रयत्न केला. परंतु....

अनुक्रम ........ वि ........
क्रमांक ........ नोंद दि........

" आक् आक् आकशीऽऽऽ!"– नुकतेच पाण्यातून बाहेर आलेले गबदूलसाहेब इतक्या जोरात शिंकले की, ते पाखरू तेथून विचकून उडाले आणि उघडया विशाल प्रशस्त अशा तिरसिंगरावांच्या ओलसर खांद्याचा त्या पाखराने बसण्यासाठी आश्रय घेतला. हा नवा आसरा मात्र त्या पाखराला अगदी मनपसंत वाटला असावा. कारण मान वाकडी करून शेपटी नाचवीत ते पाखरू मग मोठ्या डौलात आवाज देऊ लागले.

" बिटूर्रर्ऽ बिटूर्रर्ऽ बिट्रिक ! "

परंतु तेवढ्यात त्या पाखरामागोमागच एक काश्मिरी ग्रामकिशोरी आणि तिचा लहानगा कुमारवयीन भाऊ धावतच त्या शिकाऱ्यावरील घरकुलातून बाहेर आले. ज्यांच्या खांद्यावर तो गोजिरवाणा पक्षी विराजमान झालेला आहे त्या तिरसिंगरावांना आणि त्यांच्या लगतच उभ्या असलेल्या गबदूल-ए-हिंदला बघितल्यावर ती चंचल, अल्लड आणि अवखळ किशोरी जागीच थबकली; तिच्या लहान भावाचे तर डोळेच विस्फारले.

" अरे, ओ देखो.... भीम और दारासिंग खडे हैं, हमारे शिकारे में ! " परंतु मग गबदूलसाहेबांनी पुढे होऊन त्या लहान मुलाला समजावून दिले की, आपण कुणी भीम आणि दारासिंग नसून, एक आहेत गबदूल-ए-हिंद आणि दुसरे आहेत हिंदकेसरी पैलवान तिरसिंगराव !

काही का असेना, परंतु शिकाऱ्यावरच्या त्या बहीणभावंडांना तिरसिंगराव आणि गबदूल-ए-हिंदसारख्या व्यक्ती बेहद्द आवडल्या आणि तिरसिंगरावांना आवडला तो त्या



*दोन बहीणभावंडांनी पाळलेला* नाजूक रेशमासारख्या अंगाचा पक्षी. परंतु तसला एकच नव्हे अनेक पक्षी शिकाऱ्यावरल्या त्या घरकुलातल्या पिंजऱ्यात बाळगले असल्याचे तिरसिंगरावांच्या नंतर लक्षात आले.

शिकाऱ्यावर अचानकपणे भेटलेल्या त्या चिमुकल्या बहीणभावंडांविषयीचा स्नेह हा काश्मीर सफरीत अगदी अखेरच्या काळपर्यंत तितकाच गाढा राहिला. तिरसिंगराव आपली कोल्हापूरकर मित्रमंडळी बरोबर घेऊन गबदूल-ए-हिंदबरोबर निरनिराळ्या ठिकाणी काश्मीर-मधली सौंदर्यस्थळे, ऐतिहासिक स्थळे पाहण्यासाठी इकडेतिकडे जात परंतु परत जेव्हा ते सायंकाळी विश्रामासाठी गबदूलसाहेबांच्या बंगल्यावर येत तेव्हा ती दोघे बहीणभावंडे त्यांची वाट पाहात तेथे थांबलेली असत. त्या काश्मिरी कन्येने काहीतरी रानमेवा नाहीतर काश्मिरी पद्धतीने तयार केलेले वैशिष्ट्यपूर्ण पदार्थ भेटीसाठी आवर्जून आणलेले असत आणि तिच्या छोटया भावाला तिरसिंगरावांच्या बरोबर किंवा गबदूलसाहेबांबरोबर व्यायाम करण्यात, जोरबैठका काढण्यात किंवा असलेच काही मर्दानी खेळ खेळण्यात मोठा अभिमान वाटे. तिरसिंगरावांप्रमाणेच भारतीय कीर्तीचे महशूर पैलवान होण्याची स्वप्नेच आता तो छोटा भाऊ बघायला लागला होता.

काश्मीर-सफर संपवून तिरसिंगराव आपल्या दोन पैलवान मित्रांसह जेव्हा कोल्हापूरला परत फिरायच्या तयारीला लागले तेव्हा तिरसिंगरावांच्या होणाऱ्या या वियोगाच्या कल्पनेने गबदूलसाहेबांचा जीव गलबलून आला. तिथलीच आसपासची आपली पुष्कळशी मित्रमंडळी जमवून गबदूल-ए-हिंदने मग तिरसिंगरावांसाठी एक खास मोठा निरोपसमारंभच घडवून आणला. या प्रसंगी तिरसिंगरावांना पुष्कळ भेटवस्तू मिळाल्या. त्यात एक भेट शिकाऱ्यावरच्या त्या लहान बहीणभावंडांचीदेखील होती. एका तांबडया जाळीदार पिशवीत ठेवलेली कसलीतरी चौकोनी पेटी होती. काश्मीर सफरीच्या खास आठवणी म्हणून या सगळ्या भेटी जपून कोल्हापूरला घेऊन जायचे तिरसिंगरावांनी ठरविले.

काश्मीर ते मुंबईपर्यंत विमानाचा प्रवास आणि नंतर मुंबई ते कोल्हापूरपर्यंतच्या आरामगाडीच्या प्रवासाने तिरसिंगराव दमून गेले. एवढ्या दगदगीनंतर कोल्हापूरला पोहोचल्या पोहोचल्या तिरसिंगरावांनी अगोदर घेतली ती एक दोन तासांची झोप.... झोप झाली. थंडगार पाण्याने प्रशस्त अंघोळ आटोपली आणि एकदाचे ताजेतवाने होताच तिरसिंगरावांनी काश्मीरहून आणलेल्या एकेक भेटवस्तू आता शांतपणे निरखून बघायला सुरुवात केली. कुणी छोटया करंडीतून सफरचंदे दिली होती तर कुणी उंची काश्मिरी शाल....कुणी काश्मिरी सुका मेवा सुरेखशा बंद डब्यातून भेट म्हणून दिला होता तर

कुणी कागदापासून तयार केलेला काश्मिरी फुलांचा रंगीबेरंगी सुंदर गुच्छ....गबदूल-ए-हिंदनं दूध पिण्यासाठी तिरसिंगरावांना एक नक्षीदार मोठे उंची भांडेच भेट म्हणून दिले होते....या भेटवस्तूंच्या पसाऱ्यात तिरसिंगरावांना एकदम आठवण झाली ती त्या शिकाऱ्यात घर करून राहणाऱ्या कुटुंबातल्या, दोन लहान बहीणभावंडांची...! काय भेट दिली असेल बरं त्यांनी ? तिरसिंगरायांनी त्या पसाऱ्यातून झटदिशी ती तांबडी पिशवी हाताशी ओढली.


पिशवीत हात घालताच, हाताला लागला तो एक नाजूक लाकडी पिंजरा. परंतु पिंजरा त्या पिशवीबाहेर काढण्याच्या भरात कदाचित त्या पिंजऱ्याचा छोटेखानी दरवाजा एकाएकी उघडला गेला असावा. कारण तो पिंजरा पिशवीबाहेर येण्याअगोदरच भुर्र्रदिशी एक रेशमी काळ्या रंगाचे गोजिरवाणे पाखरू हवेत उंच उडाले. बराच वेळपर्यन्त वर छपराशी ते भिरभिरत राहिले आणि मग टपकन येऊन तिरसिंगरावांच्या खांद्यावर विराजमान झाले. मान कलती करून, शेपटी नाचवीत मोठ्या ऐटदारपणे मग त्याने साद दिली—

"बिटुर्र्रऽ बिटुर्र्रऽ बिट्रिक् !"

* * *

# निरसिंगराव व पावसाळा

सरत्या वैशाखातली उन्हं वणव्यासारखी उसळतात. माणसाच्या जिवाची काहिली व्हायला लागते. वारा एकदम पडतो....पण दिवसाचा असा तिसरा प्रहर सुरू व्हायला वारा भिंगरीत उसळतो, बघता बघता आभाळ भरून येते. चपाचपा पावसाच्या धारा उभ्या आडव्या बडवायला लागतात. माणसांची, गुरा–पाखरांची तिरपीट उडते. भिजून चिंब होता होता, हे सगळे जीव झाडाखाली नि झाडाच्या फांद्यांवर आसरा घ्यायला धावतात न धावतात....एवढ्यात म्हणजे पाऊस गपगार कुठल्या कुठे रानोमाळ उधळतो. पावसाच्या या फसगंमतीने माणूस गालातल्या गालात हसत, झाडाचा आसरा सोडून मार्गाला लागतो. कान पाखरून गुरे, वासरे, हुंदडत निघतात आणि पंखात भिजलेली पाखरं कलकलाट करीत पुन्हा बाणासारखी सुई सुई आभाळभर झेपावतात. पहिल्या पावसाने भिजलेली माती अत्तराचा गंध सांडीत दरवळायला लागते.



अनुक्रम ............ वि....... नोंद वही ............ क्रमांक ....



वळवाचा पाऊस सुरू होतो.

परंतु, वळवाचा पाऊस म्हणजे काही खरा पाऊस नव्हे. खरा पाऊस सुरू होतो, तो त्यानंतरच. वळवाचा पाऊस हा त्यापुढच्या पावसाची नुसती चाहूल असते.—हळूहळू पाऊस चढत जातो.

रंकाळा तलावाकाठच्या तालमीत मग तिरसिंगरावांची उपस्थिती अनिश्चित आणि अनियमित होते. कधीकधी ते दोनदोन, चारचार दिवस परागंदा होतात. तालमीकडे फिरकतदेखील नाहीत. तालमीतली एक-दोन वर्षे काढलेली तरणी अनुभवी पोरे ओळखतात की पावसाळा सुरू झाला !

ट्रॅक्टर चालविण्यात तिरसिंगराव मोठे वाकबगार आहेत. पहिल्या पावसाचे पाणी पिऊन, जमीन जरा ओली भुसभुशीत झाली की, पंचगंगेच्या काठावरच्या आपल्या मळईच्या जमिनीत तिरसिंगरावांची जातीने मेहनत-मशागत सुरू होते. नांगरणी, कोळपणी सगळी ट्रॅक्टरने आणि आधुनिक अवजारांनीच केली जाते, आणि ट्रॅक्टर चालवायला बसलेले असतात स्वतः तिरसिंगराव. रानातल्या पक्क्या बांधणीच्या वस्तीवरच मग त्यांचा मुक्काम पडतो आणि दिवसाभराच्या कामाच्या रामरगाड्यातून त्यांना फुरसत म्हणून मिळत नाही. नांगरट, कोळपणी, भांगलण आटोपून रान एकदा पेरणीच्या तयारीचे झाले की, तिरसिंगराव मग जरा कुठे समाधानाचा—सुटकेचा निश्वास टाकतात.

तेवढ्यात इचलकरंजी रस्त्यावरच्या साजणीसून येसबा बुरूड तिरसिंगरावांचा दुम घेत, त्यांच्या रानातल्या वस्तीवर टपकतो.

" काय येसबादादा, कसं काय येणं केलं ? " रानमळ्याच्या कामातून माणसाला फुरसत मिळू नये, असली ही वेळ. आणि अशा वेळी कामधाम सोडून साजणीसून बुरडाचा येसबा आपल्याकडे यावा, याचे तिरसिंगरावांना नवल वाटले.

" पेरणीच्या तयारीचं झालं असंल तुझं रान ? "

" कसली पेरणी घेऊन बसलासा देवा. आजून नांगरट—कोळपणी दिकुन झाली नाही—" येसबाजवळ स्वतःची बैलजोडी नाही. नांगरटीची—कुळवणीची चांगली अवजारे नाहीत. रानाचा एवढासा तुकडा आणि बुरूडकामाच्या कमाईवर जे मिळते त्यात बैल शेतीची अवजारे खरेदी करण्याची ऐपत उभी राहत नाही.

नांगरटीपासून पेरणीपर्यंत रानातली कामे जशी उभी राहत जातात तशी येसबाची अशी ही दर वर्षाची रड सुरू होते. कधी अवजारे मिळतात तर बैलं मिळत नाहीत आणि बैलं रानातल्या वस्तीवर आणून उभी करावीत तर, चांगली अवजारं मिळत नाहीत

दर वर्षाचा हा अनुभव जमेस धरून तिरसिंगराव पुन्हा प्रश्न करतात—

" बरं, मग येसबा, आवंदाच्याला काय मिळवलंस ? बैलं मिळवलीस की अवजारं मिळवलीस म्हणायची ! "

परंतु यावर काहीच उत्तर न देता येसबा खाली मान घालून गुळमुळीत उभा राहतो. कारण आवंदाच्या वर्षाला या दोन्हींतली कोणतीच वस्तू तो मिळवू शकलेला नाही. आवंदाच्या वर्साला जरा वळवाने वड काढल्याने सगळ्यांचीच शेत-निगराणीची कामे लांबणीवर पडली आणि आता स्वतःच्या कामाचा खोळंबा करून, येसबाची नड कुणी भागवायची ?

" देवा, आवंदाच्याला कसलीच जोडणी न्हाई. सगळी जोखीम तुमच्यावर. न्हाई म्हनू नका.... " चिमणीएवढे तोंड करून, बुरूड बोलायला लागतो. तसे तिरसिंगराव एकदम अंग झटकायचा प्रयत्न करतात. आपल्या मागच्या कामाचा व्याप सांगतात. पुष्कळ खळखळाट करतात.

परंतु बुरूड जागचा ढिम हलत न्हाई.

" तू असा कुटं ऐकणार हाईस वय मर्दा....बरं जा....सगळी रानातली जोडणी करून ठेव. उद्या सकाळी दिवस उगवायला ह्यो ट्रॅक्टर तुझ्या दारात आणून हुबा करतो, बग..."

" माज्यावर कोसळल्यालं आभाळच उचलून धरलंसा बगा तिरसिंगराव. पण देवा— " पुन्हा येसबा घुटमळतो.

" त्यो ट्रॅक्टर चालवायचा कुणी ? " ट्रॅक्टर चालवायला दोन दिवसांच्या मजुरीनं ड्रायव्हर ठेवायचा तर ते बुरुडाला कसं जमावं ? स्वतःचं दोन वेळचं पोट भरायचं आणि सगळा संसार चालवायचा तर बुरुडाची पंचाईत होते. बायकोनं कुठं दुसऱ्याच्या शेतातनं वरकाम, मोलमजुरी करावी तेव्हा कुठं तेल, मीठ, मिरची असा वरखर्च भागायचा...ही पुन्हा नवीच उचापत उभी राहते.

" जा तू....ट्रॅक्टर चालवायला मीच येणार हाय....पेट्रोलचं तेवढं बघ...जा, लाग जोडणीला. "

" आता थांबत न्हाई....चाललोच बगा...उद्या दिस उगवायला वाट बघतो तुमची ! "

दुसऱ्या दिवशी भल्या सकाळपासूनच तिरसिंगरावांचा ट्रॅक्टर बुरुडाच्या रानात धडधडायला लागतो. येसबा बुरुडाची, त्याच्या बायकोची आणि पोराबाळांची नुसती

धावपळ उडालेली असते. येसबाची बायको मग मधूनच स्वयंपाकाचं बघायला घरात निघून जाते. टळटळीत दुपार होते. ऊन रणरणायला लागते....परंतु तिरसिंगराव कामातून उसंत म्हणून घेत नाहीत. एक-दीडच्या सुमारास दुपारचे ट्रॅक्टरवर बसूनच येसबाच्या कारभारणीने आणलेली कांदाभाकरी, तेलचटणी काय असेल ती मोठ्या चवीने खातात आणि कामाने भूकदेखील अशी सपाटून लागलेली असते की, कोंड्याचा मांडा दिला तरी गोड लागावा. दिवस बुडायला म्हणजे सगळ्या कामाचा फन्ना उडतो आणि तिरासगराव ट्रॅक्टरमधून उतरून विहिरीच्या काठावर विसाव्याला येतात.

"बरं येसाबादादा, घेतो निरोप. न्हाईतर कोल्हापूरला पोहोचायला रात्र व्हायची...."

पण येसबा तिरसिंगरावांना असा जाऊ देत नाही. त्याचे डोळे कृतज्ञतेने ओले होतात. सख्ख्या थोरल्या भावासारखी तिरसिंगरावांच्यावर भक्ती करणारी येसबाची कारभारीणही मग आग्रहाला पडते आणि रात्री खास तिरसिंगरावांसाठी म्हणून केलेलें पुरणपोळीचे जेवण जेवूनच दुसऱ्या दिवशी तिरसिंगरावांना परत फिरणे शक्य होते.

पावसाने जोर धरला की नदी पंचगंगा दुथडी भरून वाहायला लागते. तालमीतले चार दणकट गडी घेऊन तिरसिंगराव मग पंचगंगेच्या काठावर येतात. पुराने फुसांडत चाललेल्या त्या पंचगंगेत मग वरच्या पुलावरून तिरसिंगराव आपल्या पट्टीच्या पोहणाऱ्या साथी सोबत्यांसकट बिनदिक्कत धबाधब उड्या घेतात. तो तसला पूर पोहून जाण्यात अंगची रग आणि पराक्रम पणाला लागतो....मग मोठ्यांच्या कर्तुकीने तालमीतली कच्चीबच्चीही चेकाळतात आणि अननुभवीही पुराकडे उसळ्या घेतात. परंतु या पोरासोरांवर तिरसिंगरावांची सक्त नजर असते. अजून मिसरूडही न फुटलेल्या या पोरांना पुरातले पोहणे जमणार नाही आणि झेपणारही नाही !

परंतु त्यातूनही मस्तीला आलेले एखादे आगाऊ कारटे तिरसिंगरावांचा डोळा चुकवून पुरात झेपावते आणि मधल्या मोठ्या धारेत जाऊन वाहायला लागते; तशी बोंब उडते.

"तिरासिंगराव, त्यो नाइकाचा सुभान्या पुरात धारेला लागून वाहत चाललाय."

"वाहत चाललाय ना. मग जाऊ द्या!" तिरसिंगरावांना या न ऐकणाऱ्या पोरांचा चांगलाच संताप येतो. ते तडातड बोलतात. पण फक्त बोलतातच, कारण लगेच लांग कसून चार पट्टीचे सराईत पोहणारे बरोबर घेऊन पंचगंगेवर धावतात. नदीच्या या अंगाने दोघे, त्या अंगाने दोघे, असे पुरात उतरतात. नदीच्या खळाळणाऱ्या त्या मधल्या धारेत घुसणे कुणालाच शक्य नसते, म्हणून दोन्ही अंगांनी गटांगळ्या खात वाहत चाललेल्या सुभान्याजवळ पोहोचल्यावर ते त्याला धीर देतात.

"हे बघ सुभान, तसाच हात मारत राहा. घाबरू नकोस. धीर सोडू नकोस. मोठ्या वळणावर नदीची धारं तुला धारेबाहेर फेकील, आणि मग आम्ही आहोतच तुला घ्यायला...."

आणि होतेही तसेच. दीड दोन मैल वाहत तसेच पुढे गेल्यावर, नदीबरोबर पाण्याच्या मधल्या धारेलाही एवढे मोठे वळण घ्यावे लागते की, त्या वेगात सुभान्या धारेबाहेर फेकला जातो आणि तिरसिंगरावांबरोबर पोहत तेथपर्यंत पोहोचलेले साथीदार मग सुभान्याला हाताचा आधार देऊन नदीच्या काठावर आणतात. सुभान्या वाचतो. .

पाऊस ऐनभरात येतो आणि घाटमाथ्यावरच्या धनगर वस्तीचा मुखिया बिऱ्या धनगर तिरसिंगरावांकडे येतो.

"ये बिरा, बैस!"

"दंडवत देवा, पावसात भिजून वस्तीवरची मेंढरं सगळी पाक मरायला लागली..."

"मग आता तुला मेंढरांची आठवण झाली व्हंय? जरा पावसाअगोदर कायतरी तरतूद न्हाई करायनी?"

"आमच्याकडनं करायचं तेवढं केलं की.... पण, मंजूर होऊन छतावर टाकायचं शिमिटाचं पत्रं ताब्यात मिळावं, म्हणून तालुक्याला अर्ज, विनंत्यावर विनंत्या केल्या.... पन कशाची काय दाद लागना...."

"मग तालुक्याला जाऊन सरकारात प्रत्यक्ष भेट घेऊन बघ."

"आमी भेटून काय हुनार हाय? तुमीच चला, तुमचं नाव, दरारा हाय सरकारात. तुमच्याबिगर हे काम जमायचं न्हाई. तुमाला फुडं घालून न्यालाच आलोय."

बिरा धनगर असा हटून पडतो आणि तिरसिंगराव त्याच्याबरोबर तालुक्याच्या गावाला जातात इलाज उरत न्हाई. बिरा धनगराबरोबर तिरसिंगराव तालुक्याच्या गावी योग्य त्या अधिकाऱ्याची भेट घेतात आणि सिमिटाचे पत्रे तातडीने ताब्यातच मिळतात. तिरसिंगराव मग तालुक्याच्या गावाहून तसेच कोल्हापूरला परत फिरायच्या गोष्टी करतात, पण बिरा-धनगर जाऊ देत नाही. तसाच त्यांना पुढे घालून घाटमाथ्यावर धनगराच्या वस्तीवर नेतो. बैलगाडीने सिमिटाचे पत्रे धनगरवस्तीवर पोहोचताच रातोरात कामाला सुरुवात होते आणि दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत म्हणजे वस्तीतली सगळी मेंढरे आडोशाला राहू शकतील एवढ्या मोठ्या त्या रूफकामाचे उद्‌घाटनही तिरसिंगरावांच्या हस्तेच होते! पुन्हा पाऊस जोर धरतो. चपाचपा उभा आडवा बडवायला लागतो. मग जमलेले सगळे

वस्तीकर आणि तिरसिंगराव बिरा धनगराच्या छपराखाली आसऱ्याला धावतात. बिराच्या घरात गप्पाटप्पा आणि सगळ्यांच्या चहापाण्याची जोडणी सुरू होते. तेवढ्यात,

"कार्ऽ कार्ऽ कर्र्र्र्ऽऽ!"

"आरं, छप्पार कोसळतया. पळा, बाहेर पळा..." बिरा धनगराच्या खोपीतली सगळी माणसं, बाया–बापड्या, पोरंटोरं जिवाच्या ओढीनं बाहेर धावतात. परंतु खोप कोसळता कोसळता मधेच सावरली जाते, आणि पुष्कळ वेळ झाला तरी तिरसिंगराव खोपीबाहेर येत नाहीत. मग बिरा धनगर बिचकत बाचकत खोपीत डोकावतो.

"देवा, खोप कोसळतिया न्हवं भायेर या की...."

"बिरा, गड्या कुणीकडनं एवडा मोठा झालास म्हनायचा?"

"का? काय झालं?" बिरा काळजात लाप्कन हालतो.

"आरं, खोप अंगावर कोसळतिया म्हनून तुमी सारीजनं भायेर धावलासा, पण ते पाळण्यातलं तान्हं पोर, त्येनं कसं भायेर धावायचं?"

आणि बिरा धनगराच्या सुनेला आठवण होते, तशी आमनधपक्यानं आक्रोश करीत ती खोपीत धावते.

"बया, माजं पोर खोपीतच ऱ्हायलं." खोपीत पाळण्यातलं खेळतं तान्हं पोर साबूत हाय. मुठी चोखत पडलेले दिसल्यावर तिचा आईचा जीव हरखून पान होतो. बिऱ्याची सून तान्ह्या पोराला पोटाशी धरून बाहेर पडते आणि इतक्या वेळ मधून मोडून



पडत चाललेल्या छपराच्या आधारभूत तुळईला रेटा देऊन भक्कमपणे उभे असलेले तिरसिंगराव तुळईचा आधार हलकेच सोडून देऊन झटक्यात खोपीबाहेर येतात. तशी त्यांच्या पाठोपाठ काडकाड करीत खोप कोसळून भुईसपाट होते.

रंकाळा तलावाखाळच्या तालमीत येणारी बहुतेक पोरेसोरे आता मनोमन खट्टू होतात. कारण पावसाळ्याच्या या दोनतीन महिन्यांत तिरसिंगरावांची नेहमीसारखी तालमीत हजेरी लागत नाही आणि तिरसिंगराव नाहीत, म्हणजे तालमीत मजा नाही!

उसंत मिळते...एक दिवस आठवण होते आणि तिरसिंगराव आपली गॅरेजमधली 'एव्हररेडी-हाफटन' गाडी बाहेर काढतात. तालमीतली सगळी पोरेटोरे तीत भरतात आणि हाफटन उघड्यानंच पळवीत आणतात ती थेट कागलच्या सात मोटेच्या विहिरीवर. तिरसिंगरावांच्या बरोबर आता आपल्याला पोहायला मिळणार, म्हणून सगळे तालीमबाज गडी अगदी खूष होतात. सातमोटेची विहीर पाण्याने तुडुंब भरलेली. लांगा कसलेली पोरे उघड्या अंगाने टणाटण विहिरीत उभ्या आडव्या उड्या मारतात....तिरसिंगराव मात्र लांग आणि वर हनुमान चड्डी कसून झाल्यावर चढतात ते थेट त्या विहिरीच्या काठावरच्या चिंचेच्या झाडावर...आणि झाडाच्या शेंड्यावरून जी कमानीत डौलदार सुळकी घेतात ती विहिरीच्या पाण्यात थेट मध्यावर....चिंचेवर चढून तिरसिंगराव आता उडी घेणार म्हटल्यावर काठावरची सगळी पोरे धुम इकडे तिकडे पळतात...कारण तिरसिंगरावांच्या हबक्याने वरपर्यंत उडालेल्या पाण्याचा असला सपकारा बसतो की, काठावर उभी असणारी पोरे एक तर पाण्यात, नाहीतर पाण्याबाहेर रपारप कोसळतात. तिरसिंगरावांच्या सुळकीने उसळलेले पाणी थेट चिंचेचा शेंडा भिजवून खाली येते.

पुष्कळ वेळपर्यंत पाण्यात डुंबून पोरांची शरीरे सर्दावून हुडहुडायला लागतात... तिरसिंगराव मग ती हुडहुडणारी पलटण तशीच हाफटन गाडीत भरून हायवेवरच्या स्वामीच्या हॉटेलात आणतात आणि स्वामीला 'ऑर्डर' सुटते, "सगळी पोरं मोज आणि प्रत्येकाला आकडी दुधाची पावशेर पावशेर कढत कॉफी पाज!" कॉफीच्या घुटक्या-घुटक्याने पोरांत तरतरी व हुशारी भरते.

....असा पावसाळा येतो व जातो. त्या पावसाच्या पाऊलखुणा ओल्या मातीत हिरव्या पात्यापात्यांतून कशा तरारून उभ्या राहतात....पण घाटमाथ्यावरच्या धनगरवस्तीत मनामनाच्या ओल्या मातीत रुजून राहतात—ते कोसळल्या छपराला व धनगरवाडीला पावसाळ्यात वेळोवेळी आधार देऊन कणखरपणे उभे राहणारे पोलादी तिरसिंगराव!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ५७०६८ वि.. आ. ७६७/१३
क्रमांक ५८६२ नोंद दि. ५।११।१९८८

ठाणे, वाचनालय शाखा
म. ग्रं. २६ मो. रे.
वा. क्र. ५ ०९१०
दि. ८

IRBK-0112898

IRBK-0112898